सत्संगासि धरीं, कुसंग न करीं, आत्मैक्यता [1]मोहरीं,
चित्तातें अवरीं, कुकर्म न करीं, वेदोदितें आचरीं, ।
सप्रेमें श्रवणादरीं अनुदिनीं गातां सुखें अंतरीं,
हे टीका वरदायिनी झडकरी अज्ञान हो! संहरी. ॥ १२३

---

## भगवंताची आरती.

जयदेव जयदेव जय भगवन् भूमन् ।
अनंतसद्गुण षड्गुण निर्गुण निखिलात्मन् ॥ ध्रुवपद. ॥
कुंभो मृदि सद्वत् सा नासति तस्मिन्
त्वयि चिन्मात्रे विश्वं न त्वं विश्वस्मिन् ।
न च मृदि घट एवं पश्यसि तत्त्वस्मिंन्
अघटितघटनैश्वर्यमिति तव सर्वस्मिन् ॥ जयदेव० ॥ १ ॥
चिच्छक्त्या स्वस्मिन् जानन् कल्पितवान्
सर्वाकारः सर्वः सर्वज्ञो भगवान् ।
स्थाणुः कल्पकतनुरिव कल्पितमपि च भवान्
एवं गुणविज्ञानः साक्षी त्वं भगवान् ॥ जयदेव० ॥ २ ॥
रागी शुक्तिज्ञो न हि मायारजते
वैराग्यं जगदेवं त्वयि भगवत्यजिते ।
गुणवति भगवति इत्थं चेतसि नो विजिते
स्याद्वैराग्यं भाग्यं तव सत्सुखमूर्जिते ॥ जयदेव० ॥ ३ ॥
त्वत्कर्मैव जगत्तद्ब्रह्मैव त्वं
सघृणसममथ नाथ तव शुद्धत्वम् ।
धर्मोऽसौ न पृथक् कनके कटकत्वं
यद्यस्योपादानं तत्तात्विति तत्त्वम् ॥ जयदेव० ॥ ४ ॥
विश्वं भगवद्यशो यद्भगवद्रचितं
तत्तत्तद्यश एवं यद्यत्कृतमुचितम् ।
अवतारेषु च भो तव यद्यश उदितं
खलु तत्पूतैरखिलं यश इति संविदितम् ॥ जयदेव० ॥ ५ ॥

---

१. प्राप्त होई.

मायामात्रं जगन्माया श्रीरेव
सुत इव जायायां त्वं जीवो देव ।
श्रीधर इति विश्वंभर इति वासुदेव
बिभर्षि वक्षसि लक्ष्मीं देवाधिदेव ॥ जयदेव० ॥ ६ ॥
भवदवतारा अनंत साकारा यद्वत्
त्वय्यपरोक्षपरोक्षभूतान्यपि तद्वत् ।
त्वदात्मतत्त्वं एषु कलशेष्वनु मृद्वत्
वामनमन इति भूसन्निह भगवति विद्वत् ॥ जयदेव० ॥ ७ ॥

---

# निगमसार.

(ओंव्या.)

## अध्याय पहिला.

जय जय कल्याणनिलया ! । जय जय करुणावरुणालया ! । जय जय सर्वा सर्वाश्रया ! । परममंगला ! गोविंदा ! ॥ १ ॥ जय जय भगवत्तमा ! । जय जय सर्वोत्तमा ! । जय जय देवतासार्वभौमा ! । अनादिपुरुषा ! ॥ २ ॥ तूं साकार निराकार, । तूं प्रत्यक्ष विश्वाकार, । सर्वात्मभावें नमस्कार । सर्वेश्वरा ! तूतें. ॥ ३ ॥ तूं शेषशायी परमेश्वर, । तूंचि अवघें चराचर, । ग्रंथ आरंभिला 'निगमसार' । तो तूंचि कीं. ॥ ४ ॥ सकळ निगमाचें सार, । ब्रह्म अद्वैत निर्धार, । तेव्हां हा ग्रंथ करणार । तूंचि कीं. ॥ ५ ॥ तूंचि झालासि वामन, । तूंचि व्यापिलें त्रिभुवन, । तोचि तूं चिदानंदघन । विश्वात्मा. ॥ ६ ॥ जय जय परमपुरुषा ! । जय जय सर्वविशेषा ! । जय जय मायानिषेधशेषा ! । सच्चिदानंदा ! ॥ ७ ॥ ज्याच्या सत्पदीं विश्व भासे, । ज्याच्या चित्पदीं विश्व दिसे, । आनंदपदें विश्व उल्लसे । तो श्रीगुरु सच्चिदानंद. ॥ ८ ॥ श्रीसच्चिदानंदगुरू, । ब्रह्मविद्येचा कल्पतरू, । करुणामृताचा सागरू, । वेदांतवेद्य गोविंद. ॥ ९ ॥ जो भेटला मलयाचळीं, । मार्गीं पाक करितेकाळीं, । आधीं स्फुरला हृदयकमळीं । सच्चित्पदार्थ विचारितां. ॥ १० ॥ उपनिषदार्थ पाहतां, । आत्मा ब्रह्म हें तत्त्वतां, । परि अनुभवा नये ऐशी चिंता । ज्या दिवसांत अत्यंत. ॥ ११ ॥ ऐशी उत्कंठा अंतरीं । तों सत्पदें स्फुरला हरी, । कालत्रयीं विद्यमान तरी, । आत्मा ब्रह्म म्हणूनी. ॥ १२ ॥ कालत्रयीं विद्यमान, । आत्मा ब्रह्म या अनुसंधान, । चित्पदें पाहतां ज्ञान ।

तरी आत्मा ब्रह्म होय कीं. ॥ १३ ॥ ऐसा अन्वय जरी स्फुरला, । तरी गुरुत्वाकारणें उरला, । संदेह मागुती शिरला । न कळतां व्यतिरेकें. ॥ १४ ॥ जेथें सर्व वृत्ति शून्य, । तें सद्रूप ब्रह्म चैतन्य, । तैसें न कळे तोंवरी धन्य । नव्हे ऐसें वाटलें. ॥ १५ ॥ तथापि सत्पदें पाहतां । आपणासि वडे ब्रह्मता, । परि आनंद कैसा न कळे तत्त्वता । मनीं ऐसा विचार. ॥ १६ ॥ ऐसें विचारितां मनीं, । तों ऐकों आली हास्यध्वनी, । पाहतों जंव परतोनी । वस्त्र भगवें देखिलें. ॥ १७ ॥ अवलोकिलें मुखा, । तंव मस्तकीं नाहीं शिखा, । मुखचंद्र देखतां सुखा । भरतें जैसें समुद्रासी. ॥ १८ ॥ कृपादृष्टीं अवलोकुनी, । 'काय विचारितां हो! मनीं?' । म्हणोनि पुसतां धांवोनी । श्रीचरणां लागलों. ॥ १९ ॥ 'स्वामी! आत्मा आपुला । ब्रह्म कैसा हें न कळे मला. । विचारितां अनुभवा आला । सच्चित्पदें कांहींसा. ॥ २० ॥ परि आनंद नाहीं कळला, । आणि वृत्तिवेगळा न दिसे मला, । न तुटे संदेहशृंखला । श्रीगुरुविणें. ॥ २१ ॥ जो अंतःकरणीं स्फुरला, । तोचि या रूपें प्रगटला, । आतां कृतार्थ मजला । करावें स्वामी!' ॥ २२ ॥ ऐसें बोलोनि चरणीं । मस्तक ठेवूनि अंतःकरणीं, । तो नित्यमुक्त चक्रपाणी । जगद्गुरु वरिला गुरुत्वें. ॥ २३ ॥ मस्तकीं ठेवोनि कर । सकळ उपनिषदांचें सार । पंचकोशीं करूनि निर्धार । केला ब्रह्मात्मतेचा. ॥ २४ ॥ 'मथावया क्षीरसागर । पूर्वी केला अजितावतार, । मथिला निगमरत्नाकर । परमहंसरूपें तेव्हां. ॥ २५ ॥ सांख्य, योग, वेदांत, । तिन्ही शास्त्रांचा सिद्धांत, । श्रुतिमुखें दों मुहूर्तांत । उपदेशिला. ॥ २६ ॥ सांख्यें आत्मत्वनिर्धार, । योगें वृत्तिशून्यसाक्षात्कार, । साकार तितुकें निराकार । वेदांतगुह्य. ॥ २७ ॥ गीता पुराणें श्रुती । सांख्ययोग जो कां बोलती, । तोचि सिद्धांत इतर रीती । तया शास्त्रांच्या निषेधिल्या. ॥ २८ ॥ सांख्ययोगावांचुनी । शुष्क वेदांत करोनी, । तत्त्वसिद्धि नव्हे म्हणोनी । सांगीतलें रहस्य. ॥ २९ ॥ आधींच आकाशादि उत्पत्ती । ऐसें बोलती वेदांती, । येथें घ्यावी सांख्यरीती । प्रमाणानुभवसंमत. ॥ ३० ॥ चित्तवृत्तीचा निरोध । करितां स्फुरे आत्मबोध, । तो साक्षात्कार वेदसिद्ध । वेदांतीं याचा अनादर. ॥ ३१ ॥ सांख्य योग दोन्ही । वेदांतीं दूषिले म्हणोनी, । त्याचें रहस्य न कळोनी । उपेक्षिती. ॥ ३२ ॥ प्राधान्य प्रकृतीचें देखिलें । याकरितां सांख्य दूषिलें, । गीतापुराणीं जें उपपादिलें । तत्त्व संख्येस तें मुख्य. ॥ ३३ ॥ योगजन्य साक्षात्कार । बोलिले नाहीं भाष्यकार । त्याचा अभिप्रायविचार । जाणती विरळ कोणी. ॥ ३४ ॥ ब्रह्माद्वैतबोध । हृदयीं ज्यास बिंबे शुद्ध, ।

तो करावया वृत्तिनिरोध । प्रवर्तलें सहज. ॥ ३५ ॥ ते जरी बोलती योग-रीती । तरी ज्ञानसिद्धि दुर्लभ दिसती, । न करिते शास्त्रीं प्रवृत्ती । कोणी तेव्हां. ॥ ३६ ॥ ज्यास होईल आत्मज्ञान । तो जरी न करील योगसाधन, । जन्मांतरीं त्या अनुसंधान । योगसिद्धि पावेल. ॥ ३७ ॥ अनादिसंसारप्रवाहीं । ज्ञानावांचूनि सुटका नाहीं, । एक जन्म त्यास कांहीं । न म्हणवे विलंब.' ॥ ३८ ॥ ऐसे विविध निर्धार । बोलिले करुणासागर, । ते अनुभवाचे चमत्कार । पुढें बोलिजेतील. ॥ ३९ ॥ क्षणामाजी सचराचर । मज वाटलें माझें शरीर, । साकार तितुकें निराकार । तेंचि समयीं. ॥ ४० ॥ जैसा उगवतां दिनकर । कांहींच नुरे अंधकार, । उपदेशाचा बडिवार । ऐसा देखिला. ॥४१॥ तों गमनाभिमुख देखिले, । म्यां दोन्ही चरण मस्तकीं धरिले, । तों कृपेंकरून बोलिले, । 'आतां उरलें तें काय? ॥ ४२ ॥ आम्हीच आत्मत्वें प्रगटलों, । नाहीं बोलिलें तेंही बोलिलों, । अंतर्यामीं आम्हीच उरलों । निषेधिला क्षरभाग. ॥ ४३ ॥ आम्ही करितों गमन, । तुवां ओळखिला आनंदघन, । नित्य तन्मय असों दे मन । तोचि मी. ॥ ४४ ॥ तुज विद्या भार्गवी वारुणी । उपदेशिली हे अंतःकरणीं, । दृढ धरूनि गोविंदचरणीं । प्रीति धरणें आत्मत्वें. ॥ ४५ ॥ शुकादिक जीवन्मुक्ती, । मुक्तीहुनी गोड मानिली भक्ती, । सर्वथा हृदयीं आसक्ती । बाह्यसुखाची न धरणें. ॥ ४६ ॥ विज्ञानकोशीं अभ्यास । जो सांगीतला तयास, । सर्वथा न करणें आळस । हे आज्ञा आमुची. ॥४७॥ पूर्वीं भृगूसी वरुणें । कृपा केली सकरुणें, । त्यासी पंचकोशाचे विवरणें । अनुभवा आलें. ॥ ४८ ॥ याकरितां श्रुती । हे भार्गवीवारुणीविद्या म्हणती । ते आम्ही तुजप्रती । उपदेशिली. ॥ ४९ ॥ उपदेशाचे बहु प्रकार, । परि ऐसा आत्मत्वाचा निर्धार, । आणि अभ्यासाचे चमत्कार । अन्यत्र नसती. ॥ ५० ॥ परब्रह्मीं हीचि स्थिती । प्रकर्षें म्हणुनी बोलती श्रुती, । इतर ब्रह्मविद्येची स्तुती । ऐशी न करिती वेद. ॥ ५१ ॥ भवभयें येतील शरणें । त्यांसी हे विद्येचा उपदेश करणें, । आपण तरोनी तारणें । हें ज्ञानियासी आवश्यक.' ॥ ५२ ॥ ऐसें बोलोनि चालिले, । ते उभे नाहीं राहिले. । नेत्र झांकोनि अवलोकिले । हृदयामाजी. ॥ ५३ ॥ घटिकामात्र केलें ध्यान, । मग उघडिले लोचन, । आत्मलाभानुसंधान । वाटला नाहीं वियोग. ॥ ५४ ॥ ऐसा श्रीगुरूचा महिमा । ज्याच्या प्रतापासि नाहीं सीमा. । वर्णितां पडलें निगमा । मौन जेथें. ॥ ५५ ॥ तें गुरुत्व तेव्हां प्रगटलें । मलयपर्वतीं जें कां

भेटलें, । ज्याचिया कृपनें फिटलें । संसारभय. ॥ ५६ ॥ श्रीगुरुमहिमा श्रुती । जेथें बोलों न शकती । तेथें इतर वैखरीची गती । कोणीकडे? ॥ ५७ ॥ याकारणें भेटी जाली । तितुकी कथारूपें वर्णिली. । हेही अवतारलीला देखिली । परमहंसरूपें. ॥ ५८ ॥ ध्रुवें ज्या रूपें देखिला, । तोही अवतार लेखिला, । अवतारमाळेंत गुंफिला । श्रीभागवतीं. ॥ ५९ ॥ जें निराकार निर्गुण । तेंचि शुद्धसत्त्वें ईश्वरपण, । त्यासही आकार करचरण । नाहींत ऐशा श्रुती. ॥ ६० ॥ भक्तवात्सल्यादि धर्म । तथापि तें परब्रह्म । ज्या ज्या रूपें जें जें कर्म । तो तो अवतार. ॥ ६१ ॥ हा अवतार परमहंसरूप । अविद्याहरण येथें प्रताप । मंगलाचरण कथास्वरूप । हेंचि आरंभीं. ॥ ६२ ॥ त्याचि रूपाचें ध्यान । त्याच्या उपदेशाचें अनुसंधान । त्याचे आज्ञेकरूनि निदान । ब्रह्मविद्येचें. ॥ ६३ ॥ उपदेशाचा प्रकार । आत्मत्वाचा निर्धार, । संतांसी संतोषकर । ग्रंथ आरंभिला. ॥ ६४ ॥ चंद्र दूर समुद्रापासोनी, । त्याचि चंद्रासि देखोनी । सिंधूसी संतोषेंकरूनी । भरतें दाटे. ॥ ६५ ॥ संतकृपेचेंचि फळ । हे ग्रंथरचना सकळ, । संतचि देखोनि केवळ । संतोषती. ॥ ६६ ॥ ग्रंथाचें नाम '**निगमसार**', । वेदांमाजी तोचि विस्तार, । संक्षेपेंकरोनि तो प्रकार । बोलिजेल. ॥ ६७ ॥ विद्या भार्गवीवारुणी । उपदेशकर्ता चक्रपाणी । '**निगमसार**'.ही त्याचीच वाणी, । तोचि आत्मा वामनाचा. ॥६८॥ न करितां शब्दविस्तार, । ब्रह्मस्थितीचा निर्धार, । बोलिले अनुभवचमत्कार । अनुभवरसिकांकारणें. ॥ ६९ ॥ आकृतीनें वामन । आणि आक्रमिलें त्रिभुवन, । त्याचेंच हें संक्षेपवचन । अर्थ गंभीर. ॥ ७० ॥ सत्पद आणि चित्पद । विचारितां श्रीमुकुंद । गुरुरूपें सच्चिदानंद । प्रगट जाला. ॥ ७१ ॥ त्यासि करोनि नमस्कार । ग्रंथ आरंभिला 'निगमसार', । ज्याच्या श्रवणें भवसागर । मृगजळप्राय. ॥ ७२ ॥ भक्ति, वैराग्य, तिसरें ज्ञान, । इतुकींचि मोक्षाचीं साधनें, । परि या तिहींसी जीवन । आत्मतत्त्व. ॥ ७३ ॥ नव्हे तें ज्ञान, नव्हे ती भक्ती, । अथवा नव्हे ती विरक्ती, । जोंवरी नाहीं अभिव्यक्ति । आत्मतत्त्वाची. ॥ ७४ ॥ सर्वदा वेदांताचें श्रवण । तथापि न कळे आपण कोण, । अधिक वाढलें मीपण । आत्मत्व न कळतां. ॥ ७५ ॥ टाकूनि जाती सकळ । परि मनीं विषयाची हळहळ, । जों न कळे सुखाचें मूळ । विषयवासना तंव न तुटे.

---

१. वाणीचा.

॥ ७६ ॥ उदकावीण मासोळी । सुखावीण मन तळमळी, । कोणे एके तरी जळीं । जळचरें असावें. ॥ ७७ ॥ सुखसमुद्रींची मासोळी । विषयकर्दमीं तळमळी, । ते टाकितां शुष्कस्थळीं । वांचेचि ना. ॥ ७८ ॥ समुद्रांत बुडविजे मासा । तो कर्दमातें नाठवी जैसा, । नाठवी विषयाच्या विलासा । आत्मसुखें जो तृप्त. ॥ ७९ ॥ आत्मज्ञानावांचोनि भक्ती । देवासि मागे भुक्तिमुक्ती, । पाहतां प्रीतीची अभिव्यक्ती । आपणानिमित्त देवाची. ॥ ८० ॥ निमित्तेंकरूनी भजन । तें शरीर शिरावीण, । सत्वर नव्हतां कल्याण । तेंचि देवता अप्रिय. ॥ ८१ ॥ प्रीतीनें करी भजन । मुक्ति कीं मुक्ति इच्छी मन, । इच्छूनियां धनमान । सप्रेम नृपही सेविती. ॥ ८२ ॥ सकळांहूनि अधिक देव, । तरी तो निर्मळ भक्तिभाव, । देवापरीस आवडे जीव, । भक्तियोग तो कैसा? ॥ ८३ ॥ याकारणें आत्मस्थिती । कळलिया ज्ञान वैराग्य भक्ती । तोचि परमात्मा कैवल्यमूर्ती । तोचि सच्चिदानंद. ॥ ८४ ॥ सेवितां एकाचि अमृता । तृप्ति आरोग्य अमरता, । कळतां एक आत्मा तत्त्वता । ज्ञान भक्ति वैराग्य. ॥ ८५ ॥ अन्न भक्षितां ग्रासोग्रासीं । अधिक संतोष मानसीं । तैसी आत्मत्वाच्या अभ्यासीं । ज्ञान भक्ति वैराग्य. ॥ ८६ ॥ एक आत्मा कळल्यावरी । स्वयें आपण चराचरीं । आणीक जाणावयाची उरी[1] । उरेचि ना. ॥ ८७ ॥ मन धांवे जेथवरी । आत्मा सबाह्य अभ्यंतरीं । मनचि पांगुळ होय परी । आत्मा त्याही पुढें. ॥ ८८ ॥ ऐसा आत्मा अनंत, । विश्व तितुकें अंतवंत; । विश्वाबाहेरी आणि आंत । स्वयें ज्ञान आपण. ॥ ८९ ॥ सत्तामात्र आपण । विश्व अवघें आपणावीण, । न दिसे, न असे, ऐसी खूण । बाणे तयासी. ॥ ९० ॥ जें जयावीण न दिसे । तें तयावीण न असे, । रज्जूवरी सर्प भासे । न दिसे न असे त्याविण. ॥ ९१ ॥ आकारमात्र पंचभूतीं । तीं तों आपणांविण न दिसती, । आत्मत्वें वेगळीं नसती । सर्वेही सर्वज्ञ आपण. ॥ ९२ ॥ ब्रह्म तें आपण केवळ । आपणामाजी सृष्टि सकळ । आपणाकरितां विश्व सकळ । लय अंतीं आपणांत. ॥ ९३ ॥ सृष्टि स्थिति प्रळय । आपणामाजी होय जाय, । आतां जाणणें उरलें काय । सर्वज्ञासी? ॥ ९४ ॥ आतां जनाच्या नाना बुद्धी । त्यांच्या प्रत्ययाची ज्ञानसिद्धी, । तो परमेश्वराचा उपाधी । अन्यत्र नसे. ॥ ९५ ॥ ते नित्यमुक्ताची व्यक्ती, । तेथें अलुप्त विद्याशक्ती । ज्ञानियासी तेही अभिव्यक्ती[2] । अभ्यासबळें होय. ॥ ९६ ॥ ऐशा

---

१. अवशेष. २. स्पष्टता.

अनेक ईश्वरशक्ती, । त्या इच्छितां अंतरे मुक्ती, । यास्तव सिद्धीची आसक्ती । न धरिती ज्ञानी. ॥ ९७ ॥ प्रबळ ज्यांचा अभ्यास, । सिद्धि सुलभ तयांस, । जे सिद्धीस करिती आयास । ते मोक्षास अंतरती. ॥ ९८ ॥ जो ज्ञानी निष्काम । त्यासि सिद्धीचें काय काम? । जो सर्वदा आत्माराम । ब्रह्मानंदीं निमग्न! ॥ ९९ ॥ अभेद जेव्हां ईश्वरीं । सृष्ट्यादि कर्मे हाचि करी ! तोही कदाचित् इच्छा धरी । तरी सिद्धि दासी तयाच्या. ॥ १०० ॥ जे परमेश्वराची व्यक्ती । ते पावला विद्याशक्ती । जीकरितां कैवल्यमुक्ती । इतर सिद्धि किमर्थ? ॥ १०१ ॥ जे विद्याशक्ती । ईश्वराची नित्यमुक्ती । इतर शक्ति त्या युक्ति । सृष्ट्यादिरचनेच्या. ॥ १०२ ॥ सार्वभौम राजाची मुद्रा । वंद्य जैसी चतुःसमुद्रां, । विद्या तैसी आणखी क्षुद्रा । शक्ति ईश्वराच्या. ॥ १०३ ॥ ते मुद्रा ज्याअधीन । तो प्रधान राजासमान, । तैसें ज्यास आत्मज्ञान । तोचि परमेश्वर. ॥ १०४ ॥ सकळ राज्याचा धणी । तोचि देह भोगी पट्टराणी, । इतर राजाज्ञेची शिराणी । तीस किमर्थ. ॥ १०५ ॥ विद्या ईश्वराचा देह । तिनें तुटला भेदसंदेह । इतर सिद्धीचा स्नेह । मग किमर्थ? ॥ १०६ ॥ जेथें नित्यमुक्तपण । तेथें सर्वशक्तीचें अनुसरण, । तेव्हां विद्याशक्तीच कारण । ईश्वरत्वीं. ॥ १०७ ॥ सहज जेथें विरक्ती । तो न इच्छी कांहीं शक्ती, । इच्छा तेथें मुक्ती । न बोलवे. ॥ १०८ ॥ जेथें ज्ञान आणि विरक्ती । तेथें सर्वशक्ति बोळंगती । तथापि ज्ञानी न पाहती । त्यांजकडे. ॥ १०९ ॥ त्यांस प्रारब्धाचा करणें क्षय । सिद्धि घेऊनि कराव्या काय? । जो सिद्धि मिरवूं जाय । तो ज्ञानी न म्हणवे. ॥ ११० ॥ भूत भविष्य वर्तमान । हें कालत्रयाचें ज्ञान, । पावले अनेक मुनिजन । तपेंही करोनी. ॥ १११ ॥ ऐसे थोर थोर मुनि । तेही मोहिले मायेकरोनी, । तत्त्वज्ञानेंचि तरले ज्ञानी । मायासमुद्र. ॥ ११२ ॥ सर्वज्ञता जेथें श्रुती । ज्ञानियाची वर्णिती । या सिद्धींची तेथें न करिती । वार्ताही. ॥ ११३ ॥ ज्यास कळला मृत्पिंड एक । मृन्मयपदार्थ कळले अनेक, । मृत्तिका सत्य इतर कौतुक । शब्दमात्राचें. ॥ ११४ ॥ सुवर्णाचा भणी एक । तैसेच सकळ अलंकारादिक । ज्यास कळलें खरें कनक । तो अलंकारसृष्टींत सर्वज्ञ. ॥ ११५ ॥ ऐसें सामोपनिषदीं । बोलिलें ऐसेंच सकळ वेदीं । तत्त्व कळलें तोचि पदीं । बैसला सर्वज्ञतेच्या. ॥ ११६ ॥ ऐसेंच बृहदारण्यकीं । मैत्रेयीप्रति याज्ञवल्की । म्हणे, 'एक आत्मा कळतांचि कीं । सर्व कळलें'. ॥ ११७ ॥ वसिष्ठादि मुनी । ते राहिले ऋषि म्हणोनी । यास्तव काळवशें करोनी । सिद्धि प्रगट करिती. ॥ ११८ ॥ ज्ञानियांसि प्रारब्ध सारणें, । किंवा जनासि उद्धरणें, । त्यासि सिद्धि

अवलंबणें । किमर्थ? ॥ ११९ ॥ तथापि ही तो मनीं धरी, । तरी सिद्धि त्यासि नसती दुरी । हात जोडोनी किंकरी । नित्य उभ्या. ॥ १२० ॥ ऐसा सर्वज्ञा आत्मज्ञानी । वासुदेव अवघा म्हणोनी । आत्मरत अद्वैतभजनीं । तोचि भक्त. ॥१२१॥ जड चैतन्य सर्वही । चराचर आकार जितुका कांहीं । वासुदेवावांचोनि नाहीं । तोचि भक्त. ॥१२२॥ निर्निमित्त आपली आवडी । जे न विटे कोणे घडी । तोचि वासुदेव ऐशी गोडी । तोचि भक्त. ॥१२३॥ सहज आत्मयाची प्रीती । तोचि आत्मा सर्वभूतीं । ऐशी सर्वदा ज्याची स्थिती । तोचि भक्त. ॥१२४॥ आत्माचि ब्रह्म निराकार । तोचि नित्यमुक्त परमेश्वर । साकारीं देखे निराकार । तोचि भक्त. ॥ १२५ ॥ शुद्धसत्त्व ब्रह्मचि केवळ । साकार दिसे भक्तवत्सल । गुणत्रयाचा विटाळ । जेथें नसे. ॥ १२६ ॥ तोही भक्तांचे दृष्टी दिसे । परि तेथें आकार नसे । जे भजती जैसे, तैसें । फळ दे कल्पवृक्ष. ॥१२७॥ सर्वत्र सम हें निश्चित, । तथापि परमात्मा आत्मरत । म्हणोनि आत्मज्ञानी भक्त । आवडती अतिशयें. ॥ १२८ ॥ आत्मत्वें सकळांची आवडी । परि कोणी नेणती हे गोडी, । आत्मज्ञानी एक घडी । ते गोडी न विसरे. ॥ १२९ ॥ जीवेश्वर दोघे आत्मरत । त्यांत जीव तितुके भ्रांत, । भ्रांति फिटतां सहज अत्यंत । परस्परें प्रीति आयती. ॥ १३० ॥ बहुतां स्त्रियांचा पती । समान सकळांची प्रीती, । परि नवोढा तितुक्या नेणती । तरुणी भोगिती सर्वदा. ॥ १३१ ॥ याकारणें सकळांहुनी । भक्त अधिक आवडती ज्ञानी, । तो माझा आत्मा म्हणोनी । गीतेंत बोलिला श्रीकृष्ण. ॥ १३२ ॥ जे भेदें भजती । ते भक्तीचें रहस्य नेणती । निर्निमित्त आपुली प्रीती । त्यासि जाणती देहत्वें. ॥ १३३ ॥ ऐसीच आत्मज्ञानाविण । वैराग्याची न कळे खूण, । सुखचि होतां आपण । प्रीति न धरी विषयांची. ॥ १३४ ॥ अमृत रसनेवरी पडे । मग त्यास कांजी नावडे, । तेव्हां वासनेचा माग मोडे । मन बुडे जेव्हां स्वरूपीं. ॥ १३५ ॥ आत्मज्ञानावेगळें । जरी वैराग्य धरिलें बळें । उदक आवरितांही ढाळें । धांवे नीच भूमीसी. ॥ १३६ ॥ याकरितां सर्व प्रयत्नें । गुरुमुखें घ्यावें आत्मज्ञान । जो श्रीसच्चिदानंदघन । परमहंसरूपें बोलिला. ॥ १३७ ॥ ज्या ज्ञानाच्या पराक्रमें । वामन जाला त्रिविक्रम । उत्तराध्यायीं उपक्रम । भार्गवीवारुणीचा. ॥१३८॥ श्रीगुरुरूपावतरण । तेंचि येथें मंगळाचरण । म्हणावा हा याकारणें । मंगळाध्याय. ॥ १३९ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदेंभूलोकभाषावतारे । प्रथमोऽध्यायः ॥ १४० ॥

---

१. त्रिभेवर. २. संस्कृतांतून देशभाषेंत उतरणें.

## अध्याय दुसरा.

मनुष्यदेहीं चक्रपाणी । अवतरला ऐसें पुराणीं, । तैसी हे उपनिषद्वाणी । मनुष्यभाषेंत अवतरली. ॥ १ ॥ रामकृष्णादि अवतारीं । मनुष्यासारिखी क्रीडा करी । तरी वैकुंठनायक हरी । मनुष्य नव्हे. ॥२॥ तैसाचि हा 'निगमसार' । उपनिषदांचा अवतार । दिसे भूलोकभाषानुसार, । प्राकृत तथापि न म्हणावा. ॥ ३ ॥ भूमीस येतां हरी । स्वर्ग उतरे भूमीवरी, । ब्रह्मात्मबोध 'निगमसारीं'। निगम[1] येथें प्रगटले. ॥ ४ ॥ जेथें उभा पृथ्वीपती । तेथें सर्व संपदा दिसती, । सिंहासनावांचूनि नसती । ऐसें न म्हणवे. ॥ ५ ॥ ज्या घरीं नांदे नृपती । राजचिन्हें तेथेंचि वसती, । थोर लहान न म्हणती । त्या घरासी. ॥ ६ ॥ अनुभवा येईल जेथें ब्रह्म । तेथेंचि वसती सकळ निगम, । प्राकृत संस्कृत भाषाश्रम । अर्थ दोहींत सारिखा. ॥ ७ ॥ आतां श्रीसच्चिदानंदचरण । स्मरोनियां अंतःकरण । येथूनि करिजेल निरूपण । ब्रह्मविद्येचें. ॥ ८ ॥ चैतन्य, जड, एकांत एक, । जैसें दूध आणि उदक । त्याचा करावा विवेक । हें सांख्यशास्त्र. ॥ ९ ॥ सांख्यें दुग्ध वेगळें केलें । परंतु सत्यत्वें उदक उरलें, । वेदांतेंकरूनि तेंही झालें । मृगजळप्राय. ॥ १० ॥ योगीं तेंही मृगजळ । न दिसे जेथें केवळ । सुखसागरीं निश्चळ । लहरी चित्ताची. ॥ ११ ॥ ऐसे तीनी अभिनव । पंचकोशीं अनुभव । उपनिषदांचें वैभव । ब्रह्मविद्या. ॥ १२ ॥ जागृतींत आणि स्वप्नीं । आत्मा एक, अवस्था दोनी, । विद्या अविद्याशक्तींकरूनी । ज्ञान आणि अज्ञान. ॥ १३ ॥ जो जागृतींत तोचि स्वप्नीं । आत्मयास नसती भाव दोनी । तैसा विद्येअविद्येकरूनी । आत्मा तोचि. ॥ १४ ॥ पडतां निबिड अंधकार । आपुलें आपणा न दिसे शरीर, । तथापि आपणासि नर । जाणताहे. ॥ १५ ॥ हें अविद्येचें लक्षण, । मग सूर्य जैसा प्रकाशे पूर्ण, । देखे आपणासि आपण । तैसी विद्या. ॥ १६ ॥ आयती दृष्टि आयतें शरीर । उगवे सूर्य नासे अंधकार, । आपणासि आपण सादर । पाहों लागे. ॥ १७ ॥ बुद्धि आत्मा यथापूर्व । ब्रह्मविद्या प्रगटे अपूर्व, । अज्ञानतम जातां सर्व । ब्रह्म आत्मा आपण. ॥ १८ ॥ आत्मा तों उघडा अखंड । लटिकीं मायापटळें उदंड । पिंड आणि ब्रह्मांड । शुक्तिरजतन्यायें[2]. ॥ १९ ॥ रज्जु पाहतां उघडा असे । त्यावरी लटिकाचि सर्प भासे, । दृष्टीं दिसोन दोर न दिसे । तैसा आत्मा. ॥ २० ॥ ऐसेंचि कोशपंचक । एकांत एक जैसें कंचुक[3] ।

---

१. वेद. २. शिंप पाहून जसा रुप्याचा भास होतो, त्याप्रमाणें. ३. अंगरखा.

त्याचा अन्वय आणि व्यतिरेक । करतां ब्रह्म आपण. ॥ २१ ॥ अन्वय ह्मणजे दुग्ध उदक । जैसें मिश्रित एकांत एक, । त्याचें वेगळें करणें व्यतिरेक । तत्त्वज्ञ म्हणती. ॥ २२ ॥ अन्नप्राणमनोमय । विज्ञान आनंद हें द्वय । अन्वय-व्यतिरेकें निश्चय । ब्रह्मात्मतेचा. ॥ २३ ॥ अन्न, प्राण, कोश दोनी । रचिले अविद्येंचि करूनी । विज्ञान, आनंद म्हणोनी । विद्यामय. ॥ २४ ॥ मधील कोश मनोमय । तेथें विद्या अविद्या शक्तिद्वय, । याकरितां तेथें निश्चय । आत्मत्वाचा. ॥ २५ ॥ या अनादि दोघी शक्ती । मनोमय कोशीं यांची वस्ती, । याकरितां मनाच्या योगें श्रुती । बोलिल्या बंधमोक्ष. ॥ २६ ॥ एकेचि कोशीं दोघी असती । गुणकाळभेदें प्रगट होती, । जैशा जागृति स्वप्न सुषुप्ती । गुणकाळभेदें. ॥ २७ ॥ तामस पंचभूतसृष्टी । त्या देहीं आत्मत्वदृष्टी । म्हणोनि प्रबळ जिचे पोटीं । तमोगुण ते अविद्या. ॥ २८ ॥ अविद्येचीं रूपें दोनी । आवरण आणि विक्षेप म्हणोनी । आवरण तमोगुणेंकरूनी । विक्षेप रजोगुणें. ॥ २९ ॥ आपण आहें कवण । ऐसें जें न कळणें । जाणोनि नेणतें होणें । तें आवरण. ॥ ३० ॥ 'जिव्हा माझी कोणती?' । जिव्हेनेंचि उन्मत्त पुसती, । तैसा, 'आत्मा कोण,' म्हणती । अविवेकरूनी. ॥ ३१ ॥ 'मी देह' ऐसी प्रतीती । शेवांत नाहीं हें देखती, । मागुती 'मी देह' ऐसें म्हणती । हें अविद्या आवरण. ॥ ३२ ॥ विक्षेप म्हणजे इंद्रियद्वारा । वृत्ति होती विषयाकारा । रजोगुण वासनेचा वारा । तरंग करी मानसीं. ॥ ३३ ॥ सत्त्वसमुद्र अंतःकरण, । वासना वायु रजोगुण, । तो विक्षेप, आणि आवरण । तमोगुणाचें. ॥ ३४ ॥ जरी तमाचें आवरण । आणि विक्षेप रजोगुण, । तरी 'मी' म्हणोनि जाणणें । सत्त्वयोगें. ॥ ३५ ॥ एवं त्रिगुणमयी अविद्या । शुद्धसत्त्वीं वसे विद्या, । दोघी माया अनाद्या । मनोमय कोशीं. ॥ ३६ ॥ त्या विद्येचा धणी । एक लक्ष्मीकांत चक्रपाणी । जीव तमाच्या आवरणीं, । सत्त्वांत त्याचें प्रतिबिंब. ॥ ३७ ॥ तो गुरुरूपें प्रकटे । तरीच अविद्याभ्रांति फिटे, । अनादि शृंखला तुटे । कर्माची. ॥ ३८ ॥ दोन्ही उपाधि निरसिले, । निर्गुणत्वीं दोघे भेटले । तथापि संदेह फिटले । विवेकरूनी. ॥ ३९ ॥ ते विद्या शुद्ध सत्त्वगुण । त्रिगुण अविद्या आवरण । दोहींस जाणे अंतःकारण । गुणभेदें. ॥ ४० ॥ अविद्या असे तोंवरी । जों गुरुरूपें न भेटे हरी । एका मनोमयीं दोघी परी । गुणकाळभेदें प्रकटती. ॥ ४१ ॥ सत्त्वगुणें जागृती । रजें स्वप्न

---

१. मद्यपी. २. प्रेतामध्यें.

तसें सुषुप्ती, । काळभेदें मनीं प्रकटती । तैसी विद्या अविद्या. ॥ ४२ ॥ आत्मा जैसा अवस्थातीत । तैसाचि विद्याअविद्यारहित, । नित्यबद्ध नित्यमुक्त । उपाधिभेदें. ॥ ४३ ॥ आत्मा अधिष्ठान, दोवी शक्ती । विवर्तरूपें अनादि असती, । दोघी एकत्र कैशा वसती । हा संदेह निरसिला. ॥ ४४ ॥ गुण-काळभेदेंकरूनी । अवस्थांचा दृष्टांत देवोनी । दोहींवेगळा आत्मा म्हणोनी । हा संदेह निरसिला. ॥ ४५ ॥ ऐसा मनोमय कोश । म्हणोनि येथेंचि उपदेश । या कोशाचा आत्मा आदेश । ऐसी श्रुति. ॥ ४६ ॥ येथें आत्मा कळल्यावरी । विविध अभ्यासाच्या कुसरी । विज्ञानकोशीं त्याउपरी । वर्णिल्या. ॥ ४७ ॥ सकळ निषेधांचें शेष । जें कां ब्रह्म निर्विशेष । तेथें अंतःकरण निर्दोष । आनंदमय ते समयीं. ॥ ४८ ॥ आनंदमयीं तों ब्रह्मत्व । परि अनुभवीं तदा-कार सत्त्व, । याकरितां त्यासी कोशत्व । अनुभव तेथें शुद्धाचा. ॥ ४९ ॥ या प्रकारें कोशपंचक । पंचविधता एकांत एक । त्याचा अन्वय व्यतिरेक । बोलिजेल. ॥ ५० ॥ प्रथम कोश अन्नमय । तो अन्नरसें उत्पन्न होय, । त्या अन्नाचा उदय । पृथ्वीपासूनी. ॥ ५१ ॥ पृथ्वी उदकापासूनी । उदकासि उपजवी अग्नी । अग्नीस वायु तो आकाशापासुनी । त्याचें मूळ तो आत्मा. ॥ ५२ ॥ याकारणें श्रुती । आत्म्यापासूनि उत्पत्ती । पृथ्वीपर्यंत बोलती । तीपासूनि अन्न. ॥ ५३ ॥ अन्नें शुक्रशोणित होय । त्याचें शरीर तें अन्नमय, । श्रुति सृष्टीचा अन्वय । ऐसा बोलती. ॥ ५४ ॥ ऐसेंचि वेदांती वर्णिती । सांख्यपुराणें आणीक बोलती । अहंकारापासूनि उत्पत्ती । आकाशादिकांची. ॥ ५५ ॥ श्रुतींत दोनी प्रकार । आत्मशब्दें अहंकार । श्रुतिही याकारणें द्वि-प्रकार । आत्मपदें बोलते. ॥ ५६ ॥ आकाश त्या आत्मयापासूनी । याही आत्मयापासाव म्हणोनी । या रीती दों आत्मपदेंकरूनी । सूचविला अवघा सृष्टिक्रम. ॥ ५७ ॥ तो आत्मा तें महाकारण । हा आत्मा अहंकार त्रिगुण । हेंचि जाणावें उपलक्षण । महत्तत्त्व प्रकृतींचें. ॥ ५८ ॥ सांख्यशास्त्राची रीती । वेदांतशास्त्रीं न अंगिकारिती, । आकाश झाला म्हणती । आत्मयापासुनी. ॥ ५९ ॥ 'मन अन्नमय', ऐसी श्रुती । अन्नशब्दें भूतें घेती, । भूतसत्त्वांशें उत्पत्ति म्हणती । मन्वादिकांची. ॥ ६० ॥ मनीं कल्पिलें जळ । केलें तैसें खोल उथळ । सृष्टि अवघी मायामूळ । काय विरुद्ध मानावें? ॥६१॥ तत्त्वसृष्टि हे मायिक । तेथें मतें अनेक । पाहतां अवघीं एक । माया मिथ्या याकरितां. ॥६२॥ मायामात्र अवघे प्रकार । कारण येथें तत्त्वनिर्धार । तथापि सांख्यपुराण-

---

१. भेदरहित. २. मुख्य वस्तु. ३. नदीमध्यें असणारा उदकाचा भोंवरा. ४. मार्गबोधक.

मतविचार । विशद आणि सुबोध. ॥ ६३ ॥ ऐसेंच सर्वज्ञशिखामणी । श्रीगुरुरूपें चक्रपाणी । बोलिला उपनिषद्वाणी । याचि रीती. ॥ ६४ ॥ म्हणोनि सांख्यपुराणरीती । बोलिजेल तत्त्वांची उत्पत्ती, । ब्रह्माद्वैत अनुभवस्थिती । वेदांतशास्त्रें. ॥ ६५ ॥ आतां बोलिजेल सृष्टिक्रम । परब्रह्म तें निर्धर्म, । तेथें माया जैसा उगम । किरणीं मृगजळाचा. ॥ ६६ ॥ सूर्यकिरणीं जळ । नाहीं परंतु मध्यान्हकाळ । होतांचि उदककल्लोळ । लटिकेचि दिसती. ॥ ६७ ॥ काळाचाही काळ । तें ब्रह्म म्हणावें केवळ । जेथें उत्पन्न होऊनि सकळ । लय पावे. ॥ ६८ ॥ कालत्रयाचा कंद । परब्रह्म सच्चिदानंद । तेथें काळशक्तीचा स्पंद । प्रथम झाला. ॥ ६९ ॥ माया विवर्त अधिष्ठान केवळ, । दृष्टांत किरणीं मृगजळ, । परि मृगजळास मध्यान्हकाळ । निमित्त, ऐसा पूर्वपक्ष. ॥ ७० ॥ वृक्षीं प्रगटे फळ । तेथेंही निमित्त काळ, । काळीं माया फळाची वेळ । ते वेळही काळचि कीं. ॥ ७१ ॥ सूर्यें प्रकाशिले नयन । नयनीं देखिलें त्रिभुवन । सूर्यास प्रकाशक साधन । दुसरें नसे. ॥ ७२ ॥ रविकिरणीं भासे जळ । त्यासि निमित्त मध्यान्हकाळ । सूर्यचि करितां मध्यान्ह वेळ । उभय कारणत्व एकाली. ॥ ७३ ॥ जगदुपादान, ब्रह्म केवळ । तेंचि ब्रह्म निमित्त काळ, । काळचि काळशक्तीचें मूळ । तेथें संदेह काय? ॥ ७४ ॥ मृगजळा उपादान किरण । मध्यान्हकाळ निमित्तकारण । काळशक्तीस काळचि आपण । उपादान आणि निमित्त. ॥ ७५ ॥ अधिष्ठान जरी नसता काळ । तरी हा पूर्वपक्ष होता अचळ, । काळ न म्हणवे ब्रह्म केवळ । तरी अद्वैत प्रळयीं न बोलवे. ॥ ७६ ॥ प्रलयकाळीं ब्रह्म अद्वैत । तेव्हां काळ तोचि तेथें द्वैत । द्वैतचि म्हणावें तरी निश्चित । श्रुति अद्वैत बोलती. ॥ ७७ ॥ आतांहि ऐसेंचि अद्वैत । व्यवहारमात्र असे द्वैत । याही व्यवहाराचा अस्त । ते समयीं. ॥ ७८ ॥ ते काळीं अद्वैत होतें । ऐसें म्हणतांचि द्वैत येतें, । काळमात्रचि तेव्हां उरतें । ते बीज काळशक्तीचें. ॥ ७९ ॥ किरणासि इच्छा नसे । तथापि मध्यान्हीं उदक भासे । तैसी काळशक्ति ब्रह्मीं दिसे । तोचि सृष्टिकाळ. ॥ ८० ॥ कां हो! माया प्रगटते । जिवास संसारा आणिते । ऐसें म्हणती ते नेणते । हा वस्तुमहिमा सहज. ॥ ८१ ॥ वृक्षीं अकस्मात फळ । किरणीं अकस्मात मिथ्या जळ । ईश्वर नव्हे इचें मूळ । ईश्वरत्वही ईकरितां. ॥ ८२ ॥ जरी ईश्वर माया निर्मिता । तरी तो निर्दय म्हणों येता । ब्रह्म निर्धर्म तत्त्वता । हे अवस्तु. ॥ ८३ ॥ कवींपासूनि कोठ-

---

१. स्फुरण. २. ज्या पदार्थाचें रूप कांहीं घडतें, तो पदार्थ त्याचें उपादान.

पर्यंत । ऐसा ईस नसे आदि अंत, । ब्रह्म आहे निर्निमित्त । शक्तिही तैसीच त्याची. ॥ ८४ ॥ आतां किरणीं जडपण । मृगजळ भासे इच्छेविण । ब्रह्मचैतन्य याकारण । इच्छा म्हणणें पूर्वपक्ष. ॥ ८५ ॥ इच्छा चैतन्य एक म्हणतां । सुषुप्तीत न दिसे जागें होतां । भेद म्हणतां प्रळयीं वार्ता । नव्हती मायेची. ॥ ८६ ॥ शक्ति प्रगट जाल्यावरी । त्यासि इच्छा मानावी तरी । सृष्टीची इच्छा करी । तोचि ईश्वर. ॥ ८७ ॥ तो सर्वज्ञ ईश्वर । मायेकरूनि सचराचर । जिवाच्या पूर्वकर्मानुसार । सृष्टि करूं इच्छितो. ॥ ८८ ॥ ईश्वरासि इच्छा झाली । ऐसें म्हणतां ब्रह्मीं लागली । विना चैतन्य कैसी उपजली? । हाही पूर्वपक्ष. ॥ ८९ ॥ निर्धर्मे चुंबकपाषाण । संनिधानेंचि लोहा भ्रमण । तैसी माया सचेतनपणें । मिरवे ब्रह्मीं. ॥ ९० ॥ दीपें दृष्टि प्रकाशली । तिणें विविध रचना देखिली । दीपासिही पाहों लागली । पाहणें धर्म दृष्टीचा. ॥ ९१ ॥ तैसा ईश्वरोपाधि निर्मळ । जाणे विकार केवळ । तथापि जैसें मृगजळ । सूर्यकिरणीं. ॥ ९२ ॥ तरी ईश्वर कैंचा? अवघी प्रकृती । ऐसें निरीश्वर सांख्य बोलती, । तथापि ते जरी वस्तु असती । तरी तैसेंचि होतें. ॥ ९३ ॥ स्वयें तीस नाहीं सत्ता । जे सत्ता तें ब्रह्म तत्त्वता । परि सत्तेस नसे सधर्मता । सधर्मता ते प्रकृति. ॥ ९४ ॥ शूर भांडोनि गड घेती । स्वामी त्यांचा पृथ्वीपती, । जेथें सत्ता तेथें स्थिती । ईश्वरत्वाची. ॥ ९५ ॥ ब्रह्मचि ईश्वर तत्वता । तोचि ईश्वर सर्वकर्ता । ब्रह्म ईश्वर ऐसी वार्ता । प्रकृतियोगें. ॥ ९६ ॥ जो ईश्वर तेंचि ब्रह्म । तोचि सधर्म तोचि निर्धर्म । आतां सकर्म, प्रलयीं अकर्म, । योगनिद्रा ते त्याची. ॥ ९७ ॥ सधर्म तेव्हांहि निर्धर्म । सकर्म तेव्हांही अकर्म । हे अवघे प्रकृतीचे धर्म । तो सत्तामात्र. ॥ ९८ ॥ ईश्वरें इच्छा केली । ते ब्रह्मीं स्पर्शली । हे स्थूळदृष्टीची बोली । निरसिली तत्त्वें. ॥ ९९ ॥ पंचकोशांचें विवरण । तत्प्रसंगें सृष्टिप्रकरण, । माया कारण, तिचें कारण । परब्रह्म, ऐसा सिद्धांत. ॥ १०० ॥ ब्रह्म तें परम कारण, । परि तें अधिष्ठान निर्गुण, । सविकार कार्याचें लक्षण । माया कारण म्हणावी. ॥ १०१ ॥ 'मा' म्हणिजे संस्कृतीं 'नाहीं,' । 'या' म्हणजे 'जें जें कांहीं,' । दोनी नामाक्षरें तींही । मिथ्यारूप निरोपिती. ॥ १०२ ॥ शिंपीमाजी रुपें नसे । परि नसोनि जें कां दिसे, । ब्रह्म प्रपंचाकार भासे । हे माया. ॥ १०३ ॥ ब्रह्म अधिष्ठान, जैसा दोर, । माया विवर्त सर्पाकार. । अधिष्ठान विवर्त याचा विचार । इतुकाचि. ॥ १०४ ॥

१. मूळाधार. २. वेंटाळें.

सृष्टि स्थिति संहार । विवर्ताचे तीन प्रकार । अधिष्ठान सर्वदा निर्विकार । परमात्मा. ॥ १०५ ॥ ईश्वरत्व मायेची करणी । तथापि तो तिचा धणी, । तिच्याच योगें चक्रपाणी । साक्षी तिचा. ॥ १०६ ॥ जिव्हेनेंचि जिव्हा म्हणावी, । जिव्हेनेंचि जिव्हा जाणावी, । जाणता प्रवर्तक गोसांवी । आत्मा तिचा. ॥ १०७ ॥ प्रजांच्याच धनावरी । पृथ्वीपति राज्य करी, । पाळण शासन दोहीं प्रकारीं । तोचि धनी प्रजांचा. ॥ १०८ ॥ जैसे लोहाचेच घण । लोह पिटावयाचें साधन । परि दोन्हीं ते आधीन । लोहकारासी. ॥ १०९ ॥ मायायोगेंचि ईश्वर । जोंवरी द्रष्टा निरंतर, । सृष्टि स्थिति संहार । तोंचिवरी. ॥ ११० ॥ जोंवरी द्रष्टा असे । तोंवरी रज्जूंत सर्प भासे, । सूर्यकिरणांत जैसे । उदककल्लोळ. ॥ १११ ॥ जरी द्रष्टा न पाहे । किरणीं उदक कोठें आहे? । दृष्टींतही तें न राहे । मध्यान्ह टळतां. ॥ ११२ ॥ मध्यान्हकाळ टळला । किरणी जळाभास मोडला । सूर्यस्थानीं द्रष्टा उरला । तेंचि ब्रह्म. ॥ ११३ ॥ कांहीं तरी दृष्टी पडे । तोंपर्यंत द्रष्टृत्व घडे, । दृष्टि असोनि द्रष्टृत्व मोडे । दृश्य नसतां. ॥ ११४ ॥ दृश्य असे तरी पाहणें । तेंचि दृष्टीस दृष्टीपणें । अन्यथा द्रष्टा असे आपण । निर्धर्मकत्वें. ॥ ११५ ॥ मध्यान्ह टळल्यावरी । मृगजळ भासे परी । भासकशक्ति किरणांतरीं । अद्वितीयत्वें असे. ॥ ११६ ॥ योगनिद्रा ते समयीं । परमेश्वराची महाप्रलयीं । मागुती मध्यान्ह होय जयीं । भासे माया मृगजळ. ॥ ११७ ॥ प्रलयाचा अवधि सरला । सृष्टिकाळ प्रवर्तला । मायाफळाचा मोहर आला । काळवृक्षीं काळशक्ती. ॥ ११८ ॥ असत्य फळ सत्य वृक्षासी, । कैसें तरी दृष्टांत एकदेशी । ब्रह्मीं माया तों तैसी । किरणीं जैसें मृगजळ. ॥ ११९ ॥ तेव्हां अनादिमायेचा द्रष्टा । काळरूपें प्रगटला स्रष्टा । पाहोनि जीवांच्या अदृष्टा । सृष्टि करूं इच्छिली. ॥ १२० ॥ जीवीं पूर्व कर्म भोगावें । तें तों अन्यथा न घडावें । कर्मानुसार फळ द्यावें । हें रूप काळाचें. ॥ १२१ ॥ काळशक्तीचें मूळ । तें बीजचि निर्विशेष काळ । जेव्हां काळशक्तीचा कल्लोळ । सविशेष काळ तो आतां. ॥ १२२ ॥ कर्मानुरूप फळ द्यावें । काळचक्ररूपें फिरावें । सृष्टि स्थिति संहार नांवें । तिन्ही त्याचीं. ॥ १२३ ॥ मेघ धांवतां आकाशीं । चंद्र धांवतो दिसे दृष्टीसी, । तैसें काळशक्तीच्या विलासीं । निर्विशेष काळ. ॥ १२४ ॥ कर्माचें फळ द्यावया । काळा

---

१. गोस्वामी, इंद्रियांचा धनी. २. ठोकण्याचें. ३. लोहाराच्या. ४. लहरी, लाट.

तेथें न दिसे दया । मग काळशक्ति तेचि माया । काळ जो तोचि ईश्वर. ॥१२५॥ कर्मफळही भोगवावें । आणि त्या जिवां उद्धरावें । ऐशा कारुणास्वभावें । ईश्वरत्व धरिलें. ॥ १२६ ॥ तेव्हां वेद प्रगटले । जयजयकारें गर्जले । 'स्वामी उद्धरीं' म्हणों लागले, । 'या जीवांसी. ॥ १२७ ॥ यांच्या अविद्या प्रबळा । तुज अधीन शक्ति सकळा । अविद्या नासुनी कैवल्यफळा । दे या जीवांसी. ॥ १२८ ॥ जैसा निजेला क्षितिपती, । बंदीजन पाहाटे येती । त्यांची ऐकता स्तुति । जागा होय. ॥ १२९ ॥ केवळ ऐसेंचि न घडे । प्रळयीं वेदवाणीही दडे, । काळशक्तीनें दृष्टि उघडे । प्रथम निःश्वास वेद तेव्हां.' ॥ १३० ॥ जागाचि निजेला भूपती । तेव्हां ऐकोनि वेदस्तुति । काळ तोचि करुणामूर्ती । ईश्वरत्वें प्रकटला. ॥ १३१ ॥ कारणाचें कारण । परमात्मा सकरुण । त्याचें येथें निरूपण । कारणाध्याय वास्तव. ॥ १३२ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदंभूलोकभाषावतारे । द्वितीयोऽध्यायः ॥ १३३ ॥

---

## अध्याय तिसरा.

ज्याची करितां स्तुती । भागल्या अवघ्या श्रुती, । त्याची वर्णिल कोण कीर्ती । अनंत महिमा अतर्क्य ? ॥ १ ॥ आतां ऐकोनि वेदांची प्रार्थना । करुणा आली जनार्दना । करावया सृष्टिरचना । आरंभ केला. ॥ २ ॥ अनादि जीवकर्मांची सांखळी । देखोनि ईश्वरें आदिकाळीं । सृष्टि करावयाची इच्छा केली । क्षोभविली माया. ॥ ३ ॥ शुद्ध सत्त्व जे शक्ति आपली । क्षोभवितां त्रिगुणशक्ति झाली, । नदी डेव्हळितां उठली । तरंगमाळा. ॥ ४ ॥ तें तत्त्व सृष्टीचें मूळ । तेथें रजोगुण प्रबळ । तें सूत्र तेथूनि तत्त्वें सकळ । प्रधान जेथें क्रियाशक्ति. ॥ ५ ॥ तेथेंचि सत्त्व ही ज्ञानशक्ति । त्याची अधिक अभिव्यक्ति । याकरितां त्यासि म्हणती । महत्तत्त्व. ॥ ६ ॥ महत्तत्त्वीं सत्त्व निर्मळ । त्यांत प्रतिबिंबलें चैतन्य केवळ । महत्तत्त्व अहंकाराचें मूळ । तो तेथें उपजला. ॥७॥ जें महत्तत्त्व आधीं झालें । त्यांत चैतन्य प्रतिबिंबलें । तो ब्रह्मा ब्रह्मांड रचलें । शरीर ज्याचें. ॥ ८ ॥ त्याचेचि वेगळाले । महत्तत्त्वाचे अंश झाले । प्रतिबिंब चैतन्य पावलें । तें जीवत्व. ॥ ९ ॥ ब्रह्मा महत्तत्व म्हणोनी । या महत्तत्त्वाचा अभिमानी । त्या महत्तत्त्वापासुनी । अहंकार. ॥ १० ॥ महत्तत्त्वाचा सत्त्वांश । अहंकारीं अशेष प्रकाश । त्यांत प्रतिबिंबे चिदाकाश । तो महारुद्र. ॥ ११ ॥

---

१. वेदांपासून देशभाषेंत उतरलेलें. २. हालवितां, डळमळवितां.

त्या अहंकाराधापासुनी । अहंकार हे म्हणोनी । अहंकाराभिमानी । रुद्र देव. ॥ १२ ॥ उपजला अहंकार । ज्याकरितां जीवसंसार । तयाचेही तीन प्रकार । सात्त्विक राजस तामस. ॥ १३ ॥ इंद्रियांची उत्पत्ती । राजसापासोनि म्हणती । सात्त्विकापासोनि उपजती । देव आणि मन. ॥ १४ ॥ तामसापासोनि उत्पत्ती । शब्द तन्मात्रेंचि म्हणती, । शब्दापासोनि भूतें होती । आकाशादिकें. ॥ १५ ॥ श्रोत्र त्वचा हीं दोनी । चक्षु जिव्हा घ्राण हीं तिन्ही । हीं पंच ज्ञानेंद्रियें म्हणोनी । संज्ञा पावलीं. ॥ १६ ॥ शब्द स्पर्श रूप रस । आणि गंध या विषयांस । जाणती, यास्तव यांस । ज्ञानेंद्रियें म्हणती. ॥ १७ ॥ विश्व अवघें हे पांच विषय । यास्तव प्रपंच नामधेय । त्यांसि जाणती पंचेंद्रिय । ज्ञान संज्ञा यास्तव. ॥ १८ ॥ वाचा आणि हात पाय । गुद आणि गुह्येंद्रिय । कर्मेंद्रिय संज्ञा होय । या पांचांतें. ॥ १९ ॥ इंद्रियें राजसापासोनी । दहा देव यांचे अभिमानी । सात्त्विकापासोनि देव म्हणोनी । जे कां बोलिले. ॥ २० ॥ दिग्देवता श्रोत्राभिमानी, । त्वचेचा वायु, सूर्य नयनीं, । जिव्हेचा वरुण, अश्विनी देव दोनी । घ्राणेंद्रियांचे. ॥ २१ ॥ वाचे अग्नि, इंद्र हातीं, । पायीं उपेंद्र दैवत म्हणती, । गुदीं नैर्ऋत, आणि प्रजापती । गुह्येंद्रियाचा. ॥ २२ ॥ विराटाचे इंद्रियगण । हे देव अंगें आपण । यास्तव यांसि दैवतपण । इंद्रियांचें. ॥ २३ ॥ मन सात्त्विकापासोनी । चंद्र मनाचा अभिमानी । तो विराटाचें मन म्हणोनी । श्रुति बोलती. ॥ २४ ॥ रुद्र अहंकार त्याचा म्हणती । ब्रह्मा बुद्धि ऐसें वर्णिती । इतर अहंकार बुद्धीप्रती । हे दोघे देव. ॥ २५ ॥ ऐसे हे तेरा देव । चित्ताभिमानी वासुदेव, । सत्त्वाचें नांव वसुदेव । वास तेथें देवाचा. ॥ २६ ॥ चित्तांत आत्मयाचा वास । यास्तव चैतन्य म्हणती त्यास । त्याकरितां होती विलास । मनबुद्ध्यादिकांसी. ॥ २७ ॥ तो विराटाचा आत्मा बिंब, । जीव आत्मयाचें प्रतिबिंब, । सकळ तत्त्वांस अवलंब । अधिष्ठानरूपें. ॥ २८ ॥ सर्व देह म्हणजे समष्टी, । एक देह म्हणावा तो व्यष्टी, । विराटदेह सर्वदेहसृष्टी, । त्याचा आत्मा परमात्मा. ॥ २९ ॥ समष्टिरूप देह ज्याचा । तो राजा व्यष्टिदेहाचा, । बिंब त्याचा आत्मा साचा । व्यष्टिदेहीं प्रतिबिंब. ॥ ३० ॥ स्थूलदेहाची देवता । तो विराट याचिकरितां, । लिंगदेहाभिमानी तत्त्वतां । हिरण्यगर्भ लिंगदेह त्याचें. ॥ ३१ ॥ विराटाचा इंद्रियगण । त्यासि या इंद्रियांचें दैवतपण । नृप इंद्रियांनुगुण । जैसीं इंद्रियें लोकांचीं. ॥ ३२ ॥ जिकडे राजा पाहे । सर्वांची दृष्टि तिकडे वाहे, । ज्यास ज्या नांवें बोलताहे । तदनुसार वाचा सर्वांची. ॥ ३३ ॥ राजगमन ज्या

देशाप्रती । पाय सर्वांचे तिकडे चालती । राजा ज्यावरी शस्त्र घे हातीं । त्यावरी हात सर्वांचे. ॥ ३४ ॥ सूर्य विराटाचा नयन, । मेरूभोंवरी त्याचें गमन, । त्याच्या उदयें लोचन । प्रकाशती लोकांचे. ॥ ३५ ॥ सूर्य उगवे ज्या ज्या देशीं । लोक देखती त्या त्या देशासी । इत्यादि दृष्टांत एकदेशी । देवांआधीन इंद्रियें. ॥ ३६ ॥ ज्या इंद्रियासि जो देव । त्याकरितां त्यासि विषयानुभव । तीं विराट इंद्रियें वास्तव । स्थूलदेहींच असती. ॥ ३७ ॥ स्थूलावांचोनि इंद्रिय । न भोगी आपुला विषय । स्वप्नींही स्थूळ एक होय । भोग तेव्हां इंद्रियासी. ॥ ३८ ॥ लिंगदेहीं वसती इंद्रियें । आंत कल्पिती स्वविषय । तथापि भोग त्यांचा न होय । विनास्थूळ. ॥ ३९ ॥ वृक्षांत इंद्रियें असती । परंतु विषयभोग ते नेणती । स्पर्श मात्र तेही भोगिती । त्वगिंद्रियाकरितां. ॥ ४० ॥ स्थूलदेहींचीं इंद्रियें । हीं इंद्रियें नव्हती स्वयें । हीं गोलकें इंद्रियें । लिंगदेहीं. ॥ ४१ ॥ स्थूळींचे देवही समर्थ । इंद्रियां भोगविती पदार्थ । उपेक्षिती तेव्हां अनर्थ । अंधमूकबधिरत्व. ॥ ४२ ॥ राजा न पाहे ज्याकडे । त्यावरी दृष्टि कोणाची न पडे । त्या इंद्रियां भोग न घडे । विराट इंद्रियें उपेक्षितां. ॥ ४३ ॥ राजदृष्टीस नावडे । कोण पाहाती त्याकडे ? । तो एकादे सांधीस पडे । निर्बंधें. ॥ ४४ ॥ अंध झालें स्थूळ । आंत देखतो सकळ । वास्तव इंद्रियांचें मूळ । लिंगशरीर. ॥ ४५ ॥ तामस अहंकारापासोनी । स्थूळ उत्पन्न म्हणोनी । तामसविषय स्थूळें करोनी । भोगिती. ॥ ४६ ॥ प्रकृति महदहंकार । आणि इंद्रियें द्विप्रकार । जे जनासि परस्परें अगोचर । इंद्रियांसी. ॥ ४७ ॥ पंचेंद्रियांसि गोचर । तो प्रपंच पंचप्रकार । उरला तामस अहंकार । तेथोनि उत्पत्ति त्यांची. ॥ ४८ ॥ तामसापासाव शब्द झाला । शब्द आकाशातें व्याला । शब्दचि त्याचा गुण बोलिला । बीज जैसें फळांत. ॥ ४९ ॥ आकाशापासूनि स्पर्श झाला । तो स्पर्श वायूतें व्याला । तोचि त्याचा गुण बोलिला । बीज जैसें फळांत. ॥ ५० ॥ वायूपासूनि रूप झालें । तें अग्नीतें व्यालें । रूपचि गुणत्वें देखिलें । जैसें बीज फळांत. ॥ ५१ ॥ अग्नीपासूनि रस झाला । तो रस जळातें व्याला । रसचि त्याचा गुण बोलिला । बीज जैसें फळांत. ॥ ५२ ॥ जळापासाव गंध झाला । गंध पृथ्वीतें व्याला । तोचि गंध घ्राणें हुंगिला । गुण तियेचा. ॥ ५३ ॥ जें ज्याचें कारण । तेंचि कारण त्याचा गुण । याबेगळें साधारण । गुण पूर्विल्या तत्त्वाचे. ॥ ५४ ॥ शब्द एकला गगनीं । शब्द स्पर्श दोघे पवनीं । शब्द स्पर्श रूप तिन्ही । अग्निगुण. ॥ ५५ ॥ शब्द स्पर्श

रूप रस । हे चारि गुण उदकास । पांच पृथ्वीत करिती वास । शब्द स्पर्श रूप रस गंध. ॥ ५६ ॥ प्रकृतीपासूनि पृथ्वीवरी । चोवीस तत्त्वें ऐसे परी । उत्पन्न झालीं याप्रकारीं । एक एकापासोनी. ॥ ५७ ॥ प्रकृति महदहंकार । मन इंद्रियें दश द्विप्रकार । पांच गुण पंचभूतविस्तार । ऐसीं तत्त्वें चोवीस. ॥ ५८ ॥ ईश्वरें तत्त्वें निर्मिलीं । तत्त्वांचीं दैवतें मिळालीं । ब्रह्मांड न करवे तेव्हां गेलीं । शरण सर्वेश्वरासी. ॥ ५९ ॥ ईश्वरशक्ति प्रकटली । तत्त्वें एकत्र तेव्हां मिळालीं । ब्रह्मांड होऊनि त्यासि झालीं । सप्तावरणें. ॥ ६० ॥ मग जीवकर्में अवलोकिलीं । प्रारब्धरूपें शरीरें केलीं । पंचभूतांचीं निर्मिलीं । तीं हीं स्थूलें. ॥ ६१ ॥ दशेंद्रिय तन्मात्रापंचक । ऐसीं पंधरा मन एक । मिळोनि षोडशकलात्मक । लिंगदेह. ॥ ६२ ॥ त्यांत मनाचे चार प्रकार । चित्त बुद्धि मन अहंकार । सत्त्वांश उदकीं परमेश्वर । प्रतिबिंबरूपें प्रवेशला. ॥ ६३ ॥ पुरुषतत्त्व याला म्हणती । चोवीस तत्त्वें ते प्रकृती । ऐसीं पंचवीस संख्या करिती । व्यासकपिलादिक. ॥ ६४ ॥ पुरुष एक दुसरी प्रकृती । सात प्रकृतीच्या विकृती । विकृतीचे विकार होती । ते सोळा. ॥ ६५ ॥ महत्तत्व अहंकार । तन्मात्रा पंचप्रकार । या सात विकृती यांचे विकार । मन भूतें इंद्रियें हे सोळा. ॥ ६६ ॥ मृत्तिका तैसी प्रकृती । मृत्पिंड तैसी विकृती । घट तैसे विकार होती । घटाकाश तैसा पुरुष. ॥ ६७ ॥ अवघीं तत्त्वें मिळोनी । सत्त्व रज तम गुण तीनी । ज्ञान कर्म अज्ञान म्हणोनी । वेगळींही लेखिलीं. ॥ ६८ ॥ शुद्धचैतन्य धर्महीन । विषयज्ञानीं सत्त्वसाधन । म्हणोनि सत्त्व म्हणावें ज्ञान । स्वयें अंग तेज. ॥ ६९ ॥ कांच प्रकाशक आपण । तो म्हणावा दर्पण । तथापि द्रव्यांतरयोगगुण । त्यांत प्रकाशती प्रतिबिंबें. ॥ ७० ॥ त्यांत द्रव्याचा योग नसे । तेव्हां कांचांत कांहीं न दिसे । तथापि कांचचि असे । स्वप्रकाश. ॥ ७१ ॥ वृत्तिज्ञानासि साधन । म्हणोनि सत्त्व म्हणावें ज्ञान । चिच्छक्ति ऐसें अभिधान । याकरितांचि सत्त्वासी. ॥ ७२ ॥ कर्म वासनालक्षण । तेथें प्रधान रजोगुण । क्रोध अज्ञान मूढपण । हीं कार्यें होती तमोगुणाचीं. ॥ ७३ ॥ वेगळें लेखित त्रिगुणास । तत्त्वें होती अठ्ठावीस । ईश्वरासहित एकुणतीस । जीव वेगळा लेखितां. ॥ ७४ ॥ जीवेश्वरऐक्यें पंचवीस । तैसा अभेदगुण तत्त्वांस । जड तत्त्वें चोविस । पंचविसावें चैतन्य. ॥ ७५ ॥ जीवासि अनादि संसार । तो नेणे मोक्षाचें द्वार । म्हणोनि नित्यमुक्त ईश्वर । सव्विसावें गुरुत्व. ॥ ७६ ॥ या जीवांचा उद्धार । करावया सर्वेश्वर । प्रकटला कृपासागर । श्रीगुरुरूपें. ॥७७॥

अनादि मायेचा धणी । अनादि वेद ज्याची वाणी । तें गुरुत्व चक्रपाणी । सव्विसावें. ॥ ७८ ॥ प्रतिबिंब बिंबा भेद नसे । उपाधिभेदें मिथ्या भासे । पंचवीस सव्वीस ऐसे । दोनी पक्ष वास्तव. ॥ ७९ ॥ ऐसें तत्त्वनिरूपणें । बोलती सांख्य पुराणें । याहून न्यूनाधिक्यपणें । इतर पक्षही असती. ॥ ८० ॥ परंतु कारण महाकारणें । यांस देहत्व कल्पणें । कारणास कार्य म्हणणें । हें अयुक्त. ॥ ८१ ॥ कोणी कार्यें कोणी कारणें । तत्त्वें आपणांत आपण । परि देहासही कारण पण । कदापि न घडे. ॥ ८२ ॥ देहास कारण म्हणावें । तेव्हां कार्य कोणतें जाणावें । कारण महाकारण देहभावें । कार्येंचि झालीं. ॥ ८३ ॥ दोहीं कारणांसि देहभाव । तेव्हां कारणासि नुरे ठाव । देह कार्य. ऐसें सर्व । शास्त्रानुभवी बोलती. ॥ ८४ ॥ देह कार्य, भूतें कारणें । तींहीं कार्यें तन्मात्रागणें । अहंकाराच्या कारणपणें । तन्मात्रासही कार्यत्व. ॥ ८५ ॥ अहंकारही कार्य होय । महत्तत्त्वीं कारणत्व जाय । तेंही कार्य त्याची माय । मूळप्रकृति कारण. ॥ ८६ ॥ विकार तितुके तिचे गुण । वास्तव म्हणावी ते कारण । तिचेंही कारणपण । महाकारणासी. ॥ ८७ ॥ कारण महाकारण दोनी । हेही म्हणावे देह म्हणोनी । तेव्हां कारण कोठूनी । या दों देहांस आणावें. ॥ ८८ ॥ अलंकाराचें कारण । तें तों केवळ सुवर्ण । त्यासही अलंकार म्हणणें । तैसें हें. ॥ ८९ ॥ वेदशास्त्र पुराणें । कारण महाकारण देहपणें । न बोलती तें प्रमाण । युक्तिविरुद्ध कल्पना. ॥ ९० ॥ देहद्वय अधिक कल्पणें । तरी न म्हणावें कारण महाकारण । देहद्वयचि शास्त्रपुराणें । स्थूळ सूक्ष्मभावें बोलती. ॥ ९१ ॥ स्थूळदेह एकला पुरे । परि तो उपजे आणि मरे । नाना देहीं संचरे । लिंगदेह याकारणें. ॥ ९२ ॥ लिंगदेहीं सर्वतत्त्वें । पंचभूतेंही सूक्ष्मत्वें । परि भोग न घडे अल्पत्वें । स्थूळशरीर वास्तव. ॥ ९३ ॥ ऐसें बोलती पुराणें । व्यर्थ अधिक देह कां वाढवणें । तथापि कारण महाकारण । यांसि न म्हणावें देह. ॥ ९४ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती । अवस्थेप्रति एक देह म्हणती । तरी या तिनी बुद्धीच्या वृत्ती । ऐसें शास्त्र. ॥ ९५ ॥ सूर्यें प्रकाशलें घर । तेथेंचि रात्रीं पडे अंधकार । त्याकारणें गृहांतर । कां कल्पावें? ॥ ९६ ॥ सत्त्वगुण जैसें जळ । त्यांत चैतन्य रविमंडळ । प्रतिबिंबलें जें निर्मळ । सत्त्वजळ तोंवरी जागृती. ॥ ९७ ॥ तमोगुण देहीं प्रबळे । घटजळीं जैसा कर्दम डहुळे । तेव्हां प्रतिबिंब नाढळे । न कळे कांहीं सुषुप्तींत. ॥ ९८ ॥ कांहीं गढुळ कांहीं नितळ । ऐसें जेव्हां सत्त्वजळ । ते

स्वप्नावस्था प्रबळ । वासनारूपें रजोगुण. ॥ ९९ ॥ प्रतिबिंबाची दिसे दीप्ती । त्याकरितां स्वप्नीं प्रतीती । सत्त्वजळाची गढूळस्थिती । विवेक थोटा यास्तव. ॥ १०० ॥ स्वयें आहे सज्जन । स्वप्नीं करी अगम्यागमन । रजतमबळें अनुसंधान । न स्फुरे विवेकाचें. ॥ १०१ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति । या दों देहींच तीनी वर्तती । एके बुद्धीच्याच तीनी वृत्ती । गुणभेदेंकरूनी. ॥ १०२ ॥ घटस्थानी स्थूळ । लिंगदेह त्यामाजी जळ । त्यांत प्रतिबिंबलें तें केवळ । प्रतिबिंब परमेश्वराचें. ॥ १०३ ॥ तो जीव तीनी अवस्थाही । ऐशा भोगितो याचि दों देहीं । उणें न पडतां कांहीं । अधिक कल्पना किमर्थ. ॥ १०४ ॥ ऐसेंचि तुर्येकारणें । देह कल्पिती महाकारण । तेथें आत्मयासी साक्षीपण । ऐसें म्हणती. ॥ १०५ ॥ जे साक्षित्वें पाहती । त्यांस हे दोनी देह नसती । देहाचें देहत्व निरसती । तेव्हां साक्षी. ॥ १०६ ॥ सर्प नव्हे हा दोर । ऐसा साक्षित्वाचा विचार । त्या साक्षित्वास देहव्यवहार । अप्रमाण आणि अयुक्त. ॥ १०७ ॥ रज्जूस सर्प मानावें । स्वरूपीं देहत्व ऐसें म्हणावें । सुषुप्तींत कोणी जाणावें । हा कारणदेह म्हणोनी? ॥ १०८ ॥ सुषुप्तींत जैसें मूढपण । प्रळयीं ऐसेंचि विस्मरण । प्रळयींही याचि प्रमाणें । देह कल्पावा. ॥ १०९ ॥ प्रळयीं उपाधीचा लय । तेव्हां जीव ब्रह्मचि होय । सुषुप्तींत सत्त्व तमोमय । बिंब तैसेंचि प्रतिबिंब. ॥ ११० ॥ दृष्टीस जोंवरी रज्जु दिसे । तोंचिपर्यंत सर्प भासे । अंधकारीं कांहीं न असे । तैसी सुषुप्ती. ॥ १११ ॥ आतां जेव्हां जागें व्हावें । तेव्हां कारणदेहास आठवावें । या दों देहींच मूढभावें । बुद्धि कां हो! न मानावी? ॥ ११२ ॥ शुक्तीस केली रुप्याची भ्रांती । तैसी द्रष्टयासि देहप्रतीती । सुषुप्तींत नसतां कांहीं स्मृती । देहकल्पना अयुक्त. ॥ ११३ ॥ शास्त्रें अनुभवें दोनींच देह । तुर्येंत त्याचाही तुटे संदेह । धरूनि देहत्वाचा स्नेह । तुर्येस देह मानावा. ॥ ११४ ॥ जें शस्त्र बेडी तोडी । तेंही शस्त्र म्हणावें बेडी । हे तों देहात्मतेची खोडी । गोडी न सोडी देहाची. ॥ ११५ ॥ स्थूळ सूक्ष्म देह दोनी । बोलिले व्यासादिक मुनी । कारण देहद्वय म्हणोनी । वृथा कल्पना किमर्थ. ॥ ११६ ॥ असो. आतां देहद्वय । ईश्वरें केलें मायामय । त्यांत प्रवेशला स्वयें अद्वय । तें उत्तराध्यायीं निरूपण. ॥ ११७ ॥ सांख्य आणि पुराण रीती । तत्त्वें वर्णिलीं यथामती । याकरितां म्हणावा संतीं । तत्त्वसंख्याध्याय हा. ॥ ११८ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदभूलोकभाषावतारे । तृतीयोऽध्यायः ॥ ११९ ॥

## अध्याय चवथा.

सकळ जीवांचें जीवन । परमात्मा चैतन्यघन । सूर्य सकळांचे नयन । प्रकाशी एकला. ॥ १ ॥ महदादि तत्त्वें निरूपिलीं । त्यांत प्रतिबिंबें वेगळालीं । एका बिंबाचीं प्रतिबिंबलीं । तीं तीं झालीं सचेतन. ॥ २ ॥ जें जें सचेतन झालें । तें तें दुसऱ्या तत्त्वास व्यालें । त्याकरितांचि सामर्थ्य आलें । जडासी. ॥ ३ ॥ आधींच जीं तत्त्वें उपजलीं । तीं तत्त्वें देवत्व पावलीं । त्यांच्या अंशेंकरूनि झालीं । सकळ भूतें. ॥ ४ ॥ तत्त्वदेवतें जीं जालीं । तीं जेव्हां एकत्र मिळालीं । ईश्वरशक्तीनें पावलीं । अवयवता विराटाची. ॥ ५ ॥ कोणी मन बुद्धि अहंकार । कोणी इंद्रियें द्विप्रकार । अवघीं मिळोनि आकार । विराटमूर्तीचा. ॥ ६ ॥ प्रतिबिंब अवघे देव । तेथें बिंब तो वासुदेव । शुद्ध सत्त्व जें वसुदेव । चित्त वर्णिलें विराटाचें. ॥ ७ ॥ जो विराटमूर्तीचा आत्मा । तो सर्वभूतीं परमात्मा । तोचि झाला जीवात्मा । तें या अध्यायीं निरूपण. ॥ ८ ॥ चित्तांत आत्मयाचा वास । म्हणोनि चैतन्य म्हणावें त्यास । तो विराटाचा आत्मा उदास । बाह्य सुखदुःख नातळे. ॥ ९ ॥ याकरितां जो स्वयें बिंब । वरकड चैतन्य तें प्रतिबिंब । ज्यास भोक्तृत्वें अवलंब । उपाधीचा. ॥ १० ॥ सर्वभूतीं श्रुती । दोनी सुपर्ण जे कां वर्णिती । जीवेश्वर संज्ञा पावती । चैतन्य दोघे ऐसे. ॥ ११ ॥ जीवास सुखदुःखाचा स्पर्श । म्हणोनि प्रतिबिंबत्वें प्रकाश । अन्यथा आत्मा स्वप्रकाश । उभयत्र सारिखा. ॥ १२ ॥ ऐसेंचि बोलती श्रुती । प्रवेश प्रतिबिंबत्वें वर्णिती । मायिक सुखदुःखसंगती । शुद्धासि न घडे. ॥ १३ ॥ प्रतिबिंब कोणी न मानिती । दुःखचि मिथ्या ऐसें म्हणती । मिथ्या तथापि अनुभविती । जीव ऐसेंचि कळेना. ॥ १४ ॥ रज्जूंत लटिका सर्पाकार । देखोनि कांपे शरीर । शिंपीसी देखोनि रजताकार । लाभें संतोष मानिती. ॥ १५ ॥ स्वप्नीं मिथ्या सुंदरी । मिथ्या शरीरें भोग करी । त्या सुखें याही शरीरीं । स्रवे रेत. ॥ १६ ॥ जरी खळलें रेत । स्वप्न मिथ्या हें निश्चित । रज्जुसर्पेंही अकस्मात । कोणी वस्त्रांत मुतती. ॥ १७ ॥ मिथ्यासुखें रेतस्खलन । मिथ्या भयें कंपायमान । जोंपर्यंत अज्ञान । तोंवरी सत्य सुखदुःख. ॥ १८ ॥ दुःखाचा नसे अनुभव । तरी कां मुक्ति मागती जीव । वेदशास्त्रांचाही संभव । कशा कारणें ? ॥ १९ ॥ जेथें अज्ञान तेथें दुःख । जेथें ज्ञान तेथें सुख । ईश्वराचें प्रतिमुख । जीव म्हणती यास्तव. ॥ २० ॥ जडासि न घडे दुःखानुभव । ईश्वरासि दुःखाचा अभाव । याकरितां प्रतिबिंब जीव । परमेश्वराचा. ॥ २१ ॥ असो. आतां

ईश्वरें । स्थूळसूक्ष्मभेदें शरीरें । केलीं प्रारब्धानुसारें । जीवांच्या. ॥ २२ ॥ तत्त्वदेवता मिळाल्या । आपुलाल्या तत्त्वीं तिघाल्या । विराट चेतवूं नाहीं शकल्या । मग प्रवेशल्या जीवात्मा. ॥ २३ ॥ जीवविती जडासी । म्हणोनि जीव म्हणावें त्यासी । मुख्य जीवत्व परमेश्वरासी । बिंब सर्वां प्रतिबिंबाचा. ॥ २४ ॥ प्रतिघटीं जैसें आकाश । तो परमात्मा स्वप्रकाश । परि तो असंग त्याला स्पर्श । नसे मिथ्या घटाचा. ॥ २५ ॥ घटस्थानीं स्थूळ । मनोमय लिंगदेह जळ । अंतःकरण सत्त्व निर्मळ । चिदाकाश तेथें प्रतिबिंबे. ॥ २६ ॥ तें शुद्धसत्त्व अव्यक्त । महत्तत्त्वीं सत्त्व मिश्रित । ते बुद्धि तद्द्वारा चित्त । अहंकारासी अवलंबी. ॥ २७ ॥ चित्ताचें स्फुरण होतां । बुद्धि अवलंबी अहंता । अहंता देहेंद्रियाची माता । संतानासि अभिमानी. ॥ २८ ॥ देहासि मानी मीपणें । अहंतेपासूनि देह तो निर्माण । तें निर्विकार आपण । सचेतन करी विकारासी. ॥ २९ ॥ सर्वां घटीं चिदाकाश । घट जळाचा नेणे स्पर्श । जो प्रतिबिंबरूपें प्रकाश । तो भोक्ता विकारांचा. ॥ ३० ॥ प्रतिबिंबही निराकार । हे प्रकृतीचे विकार । परि विकारांचे प्रकार । त्या चैतन्यें प्रकटती. ॥ ३१ ॥ द्रव्य उन्मत्त जैसें कांहीं । विकार दृष्टीं दिसत नाहीं । प्रवेशतां पुरुषाचे देहीं । आपुले छंद दाखवी. ॥ ३२ ॥ तैसें प्रकृतीचें जडपण । विनाचैतन्य न दिसती गुण । पुरुषसंयोगें लक्षणें । प्रकटती विकाराचीं. ॥ ३३ ॥ चैतन्य तों व्यापक असे । योगवियोग मानावे कैसे । कोणी म्हणतील ऐसें । तरी ऐका. ॥ ३४ ॥ व्यापकास विधेचा योग । न घडे अविद्याविकारसंग । रज्जु जाणेल त्याचें अंग । सर्पभयें कांपेना. ॥ ३५ ॥ प्रतिबिंब आहे एकदेशी । योग वियोग बोलिजे त्यासी । सुषुप्तिकाळीं विकारासी । नेणे कांहीं. ॥ ३६ ॥ निद्रावृत्ति तमोगुण । परि ते वृत्तीची नेणे खूण । हें सुषुप्तीचें लक्षण । पूर्वाध्यायीं निरूपिलें. ॥ ३७ ॥ सुषुप्तीचें साक्षीपण । तें बिंबयोगेंचि बोलणें । यासि साक्षित्वाचें जाणणें । तेव्हां न म्हणावें. ॥ ३८ ॥ हें सुषुप्तीचें लक्षण । अनुभवें दिसतें आपण । जागें होतां कांहीं न कळणें । स्वयें आठवी. ॥ ३९ ॥ ऐसें बोलती श्रुति । सांगोपनिषदीं प्रतिपादिती । सुषुप्ति प्रळयीं ऐक्य बोलती । ब्रह्मीं जीवासी. ॥ ४० ॥ एकत्र होतां नाना रस । ते जाणों न शकती आपणास । सुषुप्तिप्रळयीं ऐक्य जिवास । हे दृष्टांत श्रुतिसिद्ध. ॥ ४१ ॥ 'तरी कां हो मोक्ष न

वडे ?' । ऐसें बोलती ते वेडे । बुद्धीस आत्मा दृष्टि न पडे । मोक्ष नव्हे तोंवरी. ॥ ४२ ॥ स्वयें हा ब्रह्मचि आहे । परंतु बुद्धीनें हें न पाहे । याकरितां बद्ध तो राहे । सुषुप्तिप्रळयीं. ॥ ४३ ॥ ब्रह्मीं अविद्या नासती । तरी अधिष्ठानीं हे विवर्त नसती । दोरे मिथ्या सर्प मरती । हें तों न म्हणवे. ॥ ४४ ॥ सर्प झाला न कळतां दोर । ब्रह्म नेणतां संसार । रज्जुज्ञानें सर्पपरिहार । ब्रह्मज्ञानेंचि मोक्ष. ॥ ४५ ॥

श्रुति—सुषुप्तिकाले सकले विलीने तमोऽभिभूते सुखरूपमेति ॥

टीका—सुषुप्तिप्रलयकाळीं । चैतन्यउपाधि होती वेगळी । ते समयीं विकारांची कळी । न उमले. ॥ ४६ ॥ व्यापक घटीं आकाश । त्यास विकाराचा न घडे स्पर्श । जळीं प्रतिबिंबला आकाश । तो जळयोगें डळमळी. ॥ ४७ ॥ वायुवेगें हाले जळ । तेव्हां प्रतिबिंब चंचळ । तैसें विकाराचें फळ । भोगी प्रतिबिंब चैतन्य. ॥ ४८ ॥ ब्रह्मांडमठीं चिदाकाश । तो विश्वोपाधि सर्वेश । सर्वघटीं असोनि स्पर्श । नसे घटा जळाचा. ॥ ४९ ॥ प्रतिबिंबासही स्पर्श नसे । तथापि जळ चांचल्यें दिसे । अहंकारीं तैसें गवसे । प्रतिबिंब चैतन्य. ॥ ५० ॥ प्रतिबिंबें प्रकाशे अहंकृती । देहेंद्रियावरी तेथोनि दीप्ती । मीपणावीण हें होती । सुषुप्तींत शवतुल्यें. ॥ ५१ ॥ कांस्यपात्रांतील जळ । प्रतिबिंबलें रविमंडळ । त्या प्रतिबिंबाची झळझळ । चंचळ दिसे भिंतीवरी. ॥ ५२ ॥ देहेंद्रियें जैसी भिंती । उदकपात्रें अहंकृती । तेथें चैतन्यें प्रतिबिंबती । एकाचीं अनेक. ॥ ५३ ॥ पात्रीं उदक सत्त्वगुण । ज्यास म्हणावें अंतःकरण । तेथें त्याच्या निर्मळपणें । चैतन्य प्रतिबिंबे. ॥ ५४ ॥ त्या सत्त्वाची बाह्यवृत्ती । पराग्वृत्ती तीस म्हणती । ती सांगातें प्रतिबिंबदीप्ती । प्रकाशी रजतमा. ॥ ५५ ॥ रजोगुण वासना इंद्रियें । तमोगुण तितुके विषय । तामसदेह भूतमय । सत्त्वें इतुकीं प्रकाशती. ॥ ५६ ॥ त्याचें प्रकाशक जीवन । त्यांत प्रतिबिंबलें जें ज्ञान । इंद्रियें विषय अनुसंधान । पराग्वृत्तीनें. ॥ ५७ ॥ आपणासि परतोनि पाहती । तीस प्रत्यग्वृत्ती ऐसें म्हणती । तेव्हां दोनी ऐक्य पावती । बिंब प्रतिबिंब. ॥ ५८ ॥ घटीं उदक तैसें सत्त्व । त्यांत आकाश प्रतिबिंबत्व । परतोनि पाहतांचि तत्त्व । व्यापकाकाश गवसे. ॥५९॥ अत एव शुद्ध सत्त्वगुण । तेंचि म्हणावें अंतःकरण । होतां मिश्र सत्त्वाचें स्फुरण । चित्त अवलंबी अहंकारा. ॥ ६० ॥ चित्त बुद्धि मन अहंकार । अंतःकरणाचे चारी प्रकार ।

अहंकारामुळें संसार। प्रतिबिंब भोगी. ॥ ६१ ॥ मीपण चेतवी इंद्रियांतें। इंद्रियें घेती विषयांतें। अहंकार धरूनि चैतन्य असतें। अंतःकरणीं. ॥ ६२॥ देहानुरूप विकार। द्रव्यानुरूप वेडेचार। भांगी धोतरा नाना प्रकार। सेवितां तद्रूप पुरुष. ॥ ६३ ॥ मार्जार होतां उंदीर मारी। सिंह होतां हस्ती विदारी। देहानुरूप दिसे विकारी। चैतन्य श्रुती अलिप्त. ॥ ६४ ॥ प्रतिबिंबत्वें एकदेशी। तरी व्यापकत्व त्यासी। मुंगी मशक जगदेहासी। व्यापी कर्मानुसार. ॥ ६५ ॥ जेवढा घट तेवढें जळ। तितुकें प्रतिबिंबें नभस्थळ। तैसें चिदाकाश केवळ। स्थूळ सूक्ष्मदेहीं. ॥ ६६ ॥ घट वाढे पसरे जळ। प्रतिबिंब व्यापी तितुकें स्थळ। जों जों वाढे देह स्थूळ। तों तों व्यापी चैतन्य. ॥ ६७ ॥ चंद्रकांतिमय शिळेचा कळश। त्यास चैतन्यचंद्राचा स्पर्श। जों जों वाढे घटाकाश। तों तों जळें पूर्ण करी. ॥ ६८ ॥ अखंड चैतन्य चंद्रबिंब। उदकानुरूप प्रतिबिंब। स्थूलसूक्ष्मदेहावलंब। जीवासि ऐसा. ॥६९॥ स्थूळासि जों जों वृद्धि होय। सूक्ष्म वाढे मनोमय। वाढे जैसें चंद्रकांतीं तोय। प्रतिबिंब चंद्र तों वाढे. ॥ ७० ॥ क्षेत्रज्ञ ऐसें व्यापी क्षेत्र। प्रतिबिंब व्यापी जैसें पात्र। लहान थोर योनि विचित्र। नखशिखाग्र व्यापी त्या देहां. ॥७१॥ कोणी जीव परमाणुत्व म्हणती। ते भेद साधितां दांत खाती। जे ब्रह्म अद्वैत न मानिती। भेदवादी. ॥ ७२ ॥ जीवास अणुत्व बोलती पुराणें। तीं भेदवादीं धरिती प्रमाणें। अभिप्रायाचीं विवरणें। ते नेणती. ॥ ७३ ॥ उपाधि अणुत्व पावती। तितुकींच प्रतिबिंबें व्यापिती। त्याहूनि सूक्ष्म न दिसती। परमाणूही. ॥ ७४ ॥ परमाणु म्हणावे जीव। तरी नखशिखाग्र दुःखानुभव। एक काळीं न घडे यास्तव। हा पक्ष पुराणींच दूषिला. ॥ ७५ ॥ नाना योनींत फिरती। ते नरदेहींच कर्मे सारिती। बंध मोक्ष दोनी प्राप्ती। मनुष्यदेहीं. ॥ ७६ ॥ ऱ्या अथवा वाइटा। सर्वत्र जावया येथोनि वाटा। आणि मोक्षाचा दारवटा। मनुष्यदेह. ॥ ७७ ॥ केलीं नाना शरीरें। संतोष मानिला नाहीं ईश्वरें। नरदेह देखोनि आदरें। संतोषला. ॥ ७८ ॥ येथें ब्रह्मविद्येची प्राप्ती। ब्रह्म आत्मत्वें अवलोकिती। याकरितां करुणामूर्ती। संतोषला. ॥७९॥ आपणासि जाणावें आपण। हेंच नरदेहाचें थोरपण। माझें तुझें हें अवलक्षण। सर्वां देहीं. ॥ ८० ॥ आत्मविद्येचें निरूपण। तेथें पंचकोशाचें विवरण। अन्नमयकोशाकारणें। वर्णिला सृष्टिक्रम. ॥ ८१ ॥ अन्नें शुक्रशोणितें होती। त्याच्या योगें देह उत्पत्ती। याकरितां स्थूळास म्हणती। अन्नमय. ॥ ८२ ॥ अन्नमयकोशादि विवरण। उत्तराध्यायीं निरूपण। सृष्टिक्रम इतुकियाकारणें।

निरूपिला. ॥ ८३ ॥ प्रकृति वर्णिली पूर्वाध्यायीं । पुरुष या अध्यायाचे ठायीं । जो पुरुषोत्तम शेषशायी । प्रतिबिंब त्याचें हे पुरुष. ॥ ८४ ॥ पुरें शरीरें तेथें वास । जीवास पुरुष म्हणती त्यास । त्याचे वर्णिले येथें विलास । पुरुषाध्याय यास्तव. ॥ ८५ ॥ संक्षेपें वर्णिला सृष्टिक्रम । वामन जेथें त्रिविक्रम । सर्वांपुरीं पुरुषोत्तम । स्वयें नांदे. ॥ ८६ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदभूलोकभाषावतारे । चतुर्थोऽध्यायः ॥ ८७ ॥

---

## अध्याय पांचवा.

**श्रुति—श्रीसच्चिदानंदलक्षणम् । जगत्प्रतिबिंबदर्पणम् ।**
**श्रीवासुदेवाख्यसमर्पणम् । तस्मिन्नमोऽस्तु ॥**

टीका—श्रीसच्चिदानंदचरणीं । सफळ झाली उपनिषद्वाणी । जो नित्यमुक्त चक्रपाणी । अनादि गुरु परमात्मा. ॥ १ ॥ प्रतिपदेचा चंद्रमा । शब्दें वर्णिती त्याचा महिमा । दाखवूं जातां त्याची सीमा । शाखेचवरी. ॥ २ ॥ शाखेपर्यंत शब्द जाती । तेही स्वयें जाऊं न शकती । सर्वज्ञाच्या मुखें पावती । तैसे देव. ॥ ३ ॥ सर्वज्ञ चंद्रातें देखतो । तो चंद्रमहिमा वर्णितो । दाखवूं जातां शब्दास नेतो । शाखेचवरी. ॥ ४ ॥ तैसा नित्यमुक्त चैतन्यघन । त्यास भूतभविष्याचें ज्ञान । अनादि वेद त्याचें वदन । तो ब्रह्मविद्याप्रवर्तक. ॥ ५ ॥ अनुभव आपुला बोलतो । दाखवूं जातां शब्द कुंठतो । निःशब्दीं बुद्धीस पाववितो । सर्वज्ञ म्हणोनी. ॥ ६ ॥ याकरितां वेद सफळ । तोचि गुरुत्वाचें मूळ । अन्यथा निःशब्द केवळ । वेदें सहसा न कळे तें. ॥ ७ ॥ आदी वेदार्थरचना । उपदेशिली चतुरानना । ते आली संतांच्या वदना । परंपरेनें. ॥ ८ ॥

**श्रुति—यो ब्रह्माणं विदधाति पूर्वं यो वै वेदांश्च प्रहिणोति तस्मै ।**
**तं ह देवमात्मबुद्धिप्रकाशं मुमुक्षुर्वै शरणमहं प्रपद्ये ॥**

टीका—ज्याणें ब्रह्मा निर्मिला । वेदविद्या दिधली त्याला । तोचि मुमुक्षूसि एकला । देव ऐसी श्रुती. ॥ ९ ॥ अनुभवियाचा अनुभव । ब्रह्मविद्येचें वैभव । विश्वात्मा वासुदेव । श्रीसच्चिदानंद गुरुनाथ. ॥ १० ॥ आतां तयाच्या श्रीचरणीं । मस्तक ठेवोनि उपनिषद्वाणी । ब्रह्मविद्या भार्गवी वारुणी । निरूपिजेल. ॥ ११ ॥ हे अनादि विद्या निरूपिली । ते उपनिषद्-

ब्रह्मवल्ली । तेचि भृगूसि वरुणें दिधली । तेव्हां भार्गवी वारुणी. ॥ १२ ॥ जैसा अनादि आनंदघन । तो देवकीचा नंदन । भार्गवी वारुणी अभिधान । तैसें अनादिविद्येसी. ॥ १३ ॥ भृगु वरुणाचा पुत्र । शिष्यत्वें जाला कृपापात्र । तें गुरुशिष्यांचें चरित्र । भृगुवल्ली बोलिली. ॥ १४ ॥ ब्रह्मवल्ली भृगुवल्ली । दोहींसि एकवाक्यता आली । तेव्हां हे विद्या बोलिली । भार्गवी वारुणी. ॥ १५ ॥ ब्रह्मवल्लींत प्रतिकोश । प्रथम आत्मत्वें उपदेश । दुसरियाचा करितां प्रकाश । निषेध पूर्वकोशाचा. ॥ १६ ॥

श्रुति—अन्नं ब्रह्मेति व्यजानात् । प्राणो ब्रह्मेति व्यजानात् ।
मनो ब्रह्मेति व्यजानात् । विज्ञानं ब्रह्मेति व्यजानात् ।
आनंदो ब्रह्मेति व्यजानात् ॥

टीका—तैसें भृगूनें प्रथम । अन्नमयकोश मानिला ब्रह्म । प्राण ब्रह्म ऐसा अवगम । तेव्हां निषेध अन्नाचा. ॥ १७ ॥ मनचि ब्रह्म ऐसें कळतां । निषेधिली प्राणात्मता । विज्ञान ब्रह्म ऐसें जाणतां । मनोब्रह्मता निषेधिली. ॥ १८ ॥ आनंद ब्रह्म ऐसें कळतां । भृगूसि बाणली पूर्णता । पुनःपुन्हा प्रश्नाची वार्ता । तेव्हां कुंठली. ॥ १९ ॥ ऐसी हे भृगुवल्ली । इचा विस्तार ते ब्रह्मवल्ली । यास्तव येथें आरंभिली । ब्रह्मवल्ली वारुणी. ॥ २० ॥ प्रकृतीपासूनि आरंभिली । सृष्टि पृथ्वीपर्यंत आली । पृथ्वीपासूनि उत्पत्ति जाली । औषधिद्वारा अन्नाची. ॥ २१ ॥ हे जे सृष्टि बोलिली । ते प्रथम मनोमयचि झाली । तेव्हां चतुराननें निर्मिली । स्त्री एक पुरुषासहित. ॥ २२ ॥ मनु स्वायंभुव म्हणोनि । तो पुरुष शतरूपा कामिनी । त्या दोघांपासूनी । मानवी मिथुनसृष्टी. ॥ २३ ॥ स्त्रीपुरुषीं भक्षिलें अन्न । शोणित शुक्र तेथें उत्पन्न । देहोत्पत्तिसाधन । तें झालें ॥ २४ ॥ अन्नरसाचें शरीर । अन्नमयकोश एतत्प्रकार । तें मी म्हणोनि अहंकार । अभिमान वाहे. ॥ २५ ॥ मी देह ऐसें न मानितां । आपण आपणातें जाणता । तरी या संसाराची वार्ता । ऐकों न येती. ॥ २६ ॥ इतुकेंचि बंधाचें मूळ । तेंचि निरसावें मृगजळ । तथापि द्रष्टा तोचि केवळ । जो मी देह म्हणतों. ॥ २७ ॥ प्रतीति तेथें असत्य । ज्याला प्रतीति तो सत्य । याकरितां श्रुतीही अगत्य । देहात्मत्व वर्णिती. ॥ २८ ॥ आणि तत्त्व आपण । हे शिष्यें धरावी खूण । आत्मत्वाचें लक्षण । येचिठायीं. ॥ २९ ॥ ब्रह्मात्मत्व साधावयाप्रती । साधन हे शिष्यप्रतीती । म्हणोनि याचा आत्मा श्रुती । येथें हाचि बोलिली.

॥ ३० ॥ कोशास पक्ष्याची आकृती । उपमा पांचां भेदें वर्णिती । शिर एक पक्ष दोन म्हणती । एक आत्मा एक पुच्छ. ॥ ३१ ॥ मी हें शरीर ऐसी । प्रतीति आहे शिष्यासी । तेंचि अंगीकारितां त्यासी । तत्त्व आपण हें वाटलें. ॥ ३२ ॥ या कोशाचें हें शिर । याचे पक्ष दोनी कर । याचा आत्मा हें शरीर । हे प्रतीति शिष्यासी. ॥ ३३ ॥ हा देहचि आपण । येथें आत्मत्वाचें लपणें । लपाला ठायीं पाडणें । हे कुशलता. ॥ ३४ ॥ देह आपण हे प्रतीती । रज्जूच सर्प ऐसी स्थिती । याकरितां येथें श्रुती । अनंतत्व बोलिली न म्हणावें. ॥ ३५ ॥ प्रतिकोशातें श्रुती । आत्मा ऐसें म्हणती । पुढिल्या कोशीं दाखविती । पूर्वकोशाचें अनात्मत्व. ॥ ३६ ॥ अवघेंचि आहे ब्रह्म । ज्ञानाज्ञान धर्माधर्म । बंधमोक्ष कर्माकर्म । ऐसें वर्म श्रुतीचें. ॥ ३७ ॥ अनादिबंधातें हरणें । अनादिमोक्षातें वरणें । दुःखनाश सुखाचे कारणें । विद्या तेही ब्रह्म. ॥ ३८ ॥ दुःख हरावयाकारणें । श्रुतीस लागलें प्रगट होणें । तेव्हां आत्मानात्म निरूपणें । त्यास अगत्य. ॥ ३९ ॥ आतां मी देह हे प्रतीती । येथूनि हरिती वेदश्रुती । पांचवें अंग पुच्छ म्हणती । तेथें हे बुद्धि निरसेल. ॥ ४० ॥ हेंचि पुच्छ याचें म्हणती । तेथें प्रतिष्ठा ऐसी श्रुती । प्रतिष्ठा म्हणिजे प्रकर्षें स्थिती । शेवटीं उरे तें पुच्छ. ॥ ४१ ॥ उत्पत्ति याची अन्नमय । अन्नेंचि वाढला हा निश्चय । शेवटींही अन्नचि होय । श्वानशृगालगृध्रांचें. ॥ ४२ ॥ या अभिप्रायें श्रुती । हेंचि याचें पुच्छ म्हणती । यापुढें नाहीं आणीक स्थिती । तेचि प्रतिष्ठा वास्तव. ॥ ४३ ॥ प्राणी जेव्हां मरे । देह सगळाचि तेव्हां उरे । मी देह ऐसें न स्फुरे । तेव्हां आत्मा देह कैसा! ॥ ४४ ॥ येथें शिष्य समजला । देह आपण नव्हेसा झाला । देह मिथ्यात्व पावला । येथें श्रुति सूचविती. ॥ ४५ ॥ देहादि अवधा प्रपंच । यास वाटला होता साच । तें सत्यत्व जालें अहाच । देह वेगळा समजतां. ॥ ४६ ॥ श्रीगुरु तो निगममूर्ती । त्याच्या वाचाचि वेदश्रुती । शिष्यासि येथें उपदेशिती । क्षरभागाचें मिथ्यात्व. ॥ ४७ ॥ रज्जूस साप म्हणणें । हें तों भ्रांतीचें लक्षण । तैसेंचि देह म्हणसी आपण । हे भ्रांती ॥ ४८ ॥ देहावेगळा आपण । हे तों आली तुजला खूण । मी देह ऐसें मीपण । तें आतां कोठें? ॥ ४९ ॥ ऐसेंचि पाहे सकळ । दृश्य तितुकें भ्रांतिमूळ । किरणीं दिसे जैसें जळ । अज्ञानदृष्टी. ॥ ५० ॥ दोर कळतां सर्प नासे । देहात्मता आतां नसे । देह दिसे तरी तो भासे । नसोनि जैसें मृगजळ. ॥ ५१ ॥ आतां तो मनोमय कोशीं । आत्मा कळेल उपदेशीं । न कळोनि

कळला आपणासी । देहावेगळा पाहतां. ॥ ५२ ॥ तूं झालासि देहावेगळा । न दिसोनि तो दिसतो निराळा । देह दिसे देहाच्या डोळां । तरी तूज काय? ॥ ५३ ॥ स्वप्नदर्शी स्वप्न दिसे । जागृतींत तंव कांहीं न दिसे । देहदृष्टीस देह दिसे । तरी तुज काय. ॥ ५४ ॥ जरी तुजला दिसतो देह । तूं तो नव्हेसि निःसंदेह । आतां टाकोनि त्याचा स्नेह । आत्मा कोण तो पाहें. ॥ ५५ ॥ मृतशरीरीं नसे प्राण । जरी म्हणसी प्राण आपण । हे नव्हे आत्मत्वाची खूण । तथापि वर्णिती आत्मत्वें. ॥ ५६ ॥ नाना देहांसि जाणें । तेथें सांगाती हाचि प्राण । परंतु तोही जडपणें । आत्मा नव्हे. ॥ ५७ ॥ देहात्मभाव निरसिला । तेव्हां तामस अहंकार गेला । प्राणमयकोशीं राजस उरला । मनोमयीं सात्विक. ॥ ५८ ॥ प्राणलिंग देहाची वसती । लिंगदेहीं इंद्रियें असती । राजसापासोनि उत्पत्ती । इंद्रियांची. ॥ ५९ ॥ तो प्राण नसतां देहीं । देहीं आत्मता नाहीं । याकरितां प्राणही । आत्मा वाटे. ॥ ६० ॥ याचि करितां श्रुती । प्राणमय कोश आत्मा म्हणती । मी प्राण ऐसी प्रतीती । राजस अहंकाराची. ॥ ६१ ॥ मी प्राण ऐसा निर्धार । इंद्रियांत राजस अहंकार । क्रियाशक्ति इंद्रियव्यापार । रजोगुणें. ॥ ६२ ॥ मी म्हणोनि मीपण । हें तुज वाटतें आपण । निद्रिताचा घोरे प्राण । परि मी म्हणोनि तो नेणे. ॥ ६३ ॥ तैसाचि नव्हसी इंद्रियें । इंद्रियाचें रूप करिती विषय । त्या दोहींस रूप होय । तें तुजकरितां. ॥ ६४ ॥ रूप नेत्राचा विषय । रूप देखतां नेत्रत्व होय । नेत्रावांचूनि रूप काय । म्हणावा पदार्थ? ॥ ६५ ॥ शब्द घेतो तोचि कर्ण । कर्ण न कळे शब्देंविण । शब्दासही शब्दपण । कैंचें कर्णावांचुनी? ॥ ६६ ॥ एवं विषय इंद्रियें सकळ । एकाकरितां एक सफळ । दोहींचें प्रकाशमूळ । तो तूं आत्मा. ॥ ६७ ॥ तुजवांचूनि इंद्रिय । कैसें घेईल आपला विषय । विषय तोही भास होय । तुजकरितां. ॥ ६८ ॥ घट नेत्र दोहींवरी । दीपप्रकाश असे तरी । त्या दोहींचें रूप करी । तैसा आत्मा. ॥ ६९ ॥ दीप आहे माजघरीं । घट ठेविला अंधकारीं । नेत्रीं प्रकाश असे परी । घट दृष्टीस न पडे. ॥ ७० ॥ घट असे दीपप्रकाशीं । पडळें व्यापिलें दृष्टीसी । दृष्टि दिसावया घटासी । सामर्थ्य कैंचें? ॥ ७१ ॥ जो इंद्रियांतें चेतवी । तोचि विषयांतें भासवी । तो दोहींचा गोसांवी । दोहीं वेगळा. ॥ ७२ ॥ तैसेंचि कर्मेंद्रियांचें करणें । क्रियाशक्ति रजोगुणें । कोण तें कर्म तुजविणें । कर्मेंद्रियें करावें. ॥ ७३ ॥ तुजकरितां इंद्रियें जिती । तुजकरितां प्राण उठती । तुजकरितां विषय भासती । तूं

स्वतंत्र. ॥ ७४ ॥ एवं विषय इंद्रियें प्राण । यांसि न म्हणावें आपण । आतां मनाचें मनपण । वेगळें तें हें. ॥ ७५ ॥ मनीं सात्त्विक अहंपण । तें मन वाटे मीपण । मनोमयकोश याकारणें । प्रवर्तला. ॥ ७६ ॥ अन्नमय आत्मा बोलिला । प्राणमयकोशीं तो निरसला । तोही निरसूं आरंभिला । मनोमयकोशीं. ॥ ७७ ॥ एक निरसितां अन्नमय । पंचभूतांचा निरास होय । प्राण विषय इंद्रिय । निषेध यांचा प्राणमयीं. ॥ ७८ ॥ पंच भूतें दश इंद्रियें । पंचतन्मात्रा तेचि विषय । उरलें तत्त्वचतुष्टय । निषेध त्याचा मनोमयीं. ॥ ७९ ॥ प्रकृति महत्तत्त्व अहंकार । मन चौथें याचा विचार । पाहतां चारी प्रकार । वेगळे नसती. ॥ ८० ॥ चित्त बुद्धि मन अहंकार । चहूंचे चारी प्रकार । जडचैतन्याचा करितां विचार । अचेतनें हीं स्वयें अवघीं. ॥ ८१ ॥ प्रथम सूत्रात्मा त्रिगुण । तो क्रियाशक्तिरूपें प्राण । मुख्य वायूसि दैवतपण । सूत्राचें. ॥ ८२ ॥ महत्तत्त्वीं गणना तयास । तथापि झाला त्याचा निरास । अनात्मत्व आलें प्राणास । तेव्हां तोही निषेधिला. ॥ ८३ ॥ प्रकृतीपासूनि पृथ्वीवरी । चोवीस जड तत्त्वें परी । चित्त बुद्धि या अंतरीं । संख्येतें न येती. ॥ ८४ ॥ याकारणें प्रकृति अव्यक्त । तेचि अंतःकरण चित्त । महत्तत्त्व जेथें सत्त्वमिश्रित । ते बुद्धी. ॥ ८५ ॥ मूळप्रकृति अव्यक्त । विष्णु वासुदेव दैवत । अंतःकरण आणि चित्त । दोनी भेद सत्त्वाचे. ॥ ८६ ॥ मूळ प्रकृतीचा द्रष्टा । व्यापक विष्णु वासुदेव स्रष्टा । महत्तत्त्वादि प्रकृति यथेष्टा । तीपासूनी. ॥ ८७ ॥ कोणी म्हणती तमोगुण । सुषुप्तींत ज्याचें मूढपण । तें मूळप्रकृती कारण । परि हें नव्हे. ॥ ८८ ॥ प्रकृति प्रगटली प्रथम । निर्धर्मी तेव्हां द्रष्टृत्वधर्म । तीसही म्हणतां तम । द्रष्टृत्व न घडे द्रष्टयासी. ॥ ८९ ॥ आधीं प्रगटलें तम । मग ईश्वर सर्वोत्तम । ऐसेंही बोलती निगम । परि हें न कळे तात्पर्य. ॥ ९० ॥ जोंवरी द्रष्टा नाहीं सत्त्वें । तोंवरी कैसीं प्रगटती तत्त्वें । द्रष्टा होतांचि सर्पत्वें । निर्गुण रज्जु भासला. ॥ ९१ ॥ प्रपंच मानावा सत्य । तेव्हां ऐसेंचि मानावें अगत्य । द्रष्टयावीण हें असत्य । दिसेल कैसें? ॥ ९२ ॥ द्रष्टृत्व न घडे तमें । शुद्धसत्त्वें हाचि नेम । जों द्रष्टा नाहीं सर्वोत्तम । तोंवरी उपजेल तम कैसें? ॥ ९३ ॥ जें शुद्धसत्त्व आधीं झालें । काळशक्तिरूपें प्रगटलें । काळरूपें जें कां वर्णिलें । पूर्वी प्रथम द्रष्टृत्वें. ॥ ९४ ॥ तेव्हां त्रिगुणसूत्र झालें । तम तेथें प्रगटलें । जें कां तम पुढें व्यालें । भूततन्मात्रासी. ॥ ९५ ॥ त्या तमें अवघे गुण । आच्छादले अचेतनपणें । तमोरूप सत्त्व तेव्हां आपण । काळ ईश्वरत्वें

प्रगटला. ॥ ९६ ॥ आधीं तमाची उत्पत्ती । मग ईश्वर प्रकटला म्हणती । तया तात्पर्यें श्रुती । बोलती ऋग्वेदींच्या. ॥ ९७ ॥ शुद्धसत्त्व जे प्रकृती । त्रिगुण तीपासूनि होती । ते प्रकृतीनें विश्वपती । विश्वात्मा आपण. ॥ ९८ ॥ तिचे अंश अंतःकरणें । विष्णु जेथें व्यापकपणें । तोचि विष्णु आपण । देव त्याचा. ॥ ९९ ॥ तो विराटाचा आत्मा बिंब । चित्तांत त्याचें प्रतिबिंब । ज्या चित्तासि अवलंब । अहंकाराचा. ॥ १०० ॥ चित्त बुद्धि मन अहंकार । अंतःकरण चारी प्रकार । महत्तत्त्वाचा करितां विचार । बुद्धीच महत्तत्त्व. ॥ १०१ ॥ ब्रह्मा महत्तत्त्वाभिमानी । तोचि बुद्धीचा देव म्हणोनी । महत्तत्त्वें करूनी । बुद्धीच जाणावी. ॥ १०२ ॥ महत्तत्त्व आणि प्रकृती । या दोहीं वेगळीं अनुभवा न येती । या करितां मानिलीं संतीं । बुद्धि चित्त हीं दोनी. ॥ १०३ ॥ यावेगळी कवण । प्रकृति महत्तत्त्वाची खूण । चोविस तत्त्वांचें लक्षण । अनुभवी ऐसें बोलती. ॥ १०४ ॥ सत्त्व तेंचि चित्त । तेथें पुरुष नं सत्त्व अव्यक्त । अव्यक्तापुढें पुरुष निश्चित । कांहीं न बोलवे त्यापुढें. ॥ १०५ ॥ इंद्रियांपासूनि श्रुती । एकापुढें एक बोलती । अव्यक्तापुढें पुरुष म्हणती । तेथूनि जाली मर्यादा. ॥ १०६ ॥

श्रुति—इंद्रियेभ्यः परा ह्यर्था अर्थेभ्यश्च परं मनः ।
मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धेरात्मा महान् परः ॥
महतः परमव्यक्तमव्यक्तात्पुरुषः परः ।
पुरुषान्न परं किंचित्सा काष्ठा सा परा गतिः ॥

टीका—इंद्रियांपुढें विषय । मन त्यापुढें जाय । त्यापुढें बुद्धीचा निर्णय । अहं बुद्धि म्हणोनी. ॥ १०७ ॥ सूत्रात्मा महत्तत्त्व । दोहींचें बोलिलें एकत्व । तेचि बुद्धि जेथें सत्त्व । निश्चय करी रजतमाचा. ॥ १०८ ॥ त्याहीपुढें श्रुती । अव्यक्ततत्त्व म्हणती । अव्यक्त म्हणजे प्रकृती । तीपलीकडे पुरुष. ॥ १०९ ॥ पुरुषासहित पंचवीस । प्रकृतीपर्यंत चोवीस । चोविसाव्यातें पंचविसाव्यास । कारण महाकारणास जाणावें. ॥ ११० ॥ एवं वीस तत्त्वें निषेधिलीं । चारी तत्त्वें जी उरलीं । तीं हींचि चारी बोलिलीं । चित्त बुद्धि मन अहंकार. ॥ १११ ॥ चारी मिळोनि अंतःकरण । मनोमयकोश या लक्षण । प्राण निषेधितां जें मन आपण । ऐसें वाटे. ॥ ११२ ॥ मनासि मानी आपण । हें सात्त्विकअहंकाराचें लक्षण । आत्मा आणि अंतःकरण । वेगळीं न कळतां. ॥ ११३ ॥ चित्त बुद्धि मन मीपण । तेव्हां चारी म्हणावीं आपण । यांत एकाचें उरलें स्फुरण ।

जरी कां सुषुप्तींत. ॥ ११४ ॥ चित्ताचें चिंतन सरे । बोद्धव्य बुद्धीचें न उरे । संकल्प विकल्प कांहीं न स्फुरे । तेव्हां मनासी. ॥ ११५ ॥ मी म्हणोनी मानी आपणा । तेव्हां नेणे त्या मीपणा । आतां आत्मा म्हणसी कवणा । या चोविसां तत्त्वांत? ॥ ११६ ॥ सुषुप्तींत नाठवे कांहीं । जरी म्हणसील आत्मा नाहीं । तरी जागा होऊनि तूंचि तेंही । सुख तेथील आठविसी. ॥ ११७ ॥ सुखें निजलों अत्यंत । कांहींच न कळे निद्रेंत । अवलंबूनि मन बुद्धि चित्त । तूंचि ऐसें आठविसी. ॥ ११८ ॥ लावितां कांचेचे उपनेत्र । हिरवें दिसे आपुलें गात्र । उपनेत्र काढितां तेचि नेत्र । हिरवें कांहीं न देखती. ॥११९॥ चित्त बुद्धि मन अहंकृती । तुज याकरितां बाह्यप्रतीती । सुषुप्तींत हीं मूढत्व पावती । गुणातीत उरसी तूं तेव्हां. ॥ १२० ॥ तथापि जोंवरी मन । नोळखे चैतन्यघन । तोंवरी न तुटे बंधन । संसाराचें. ॥१२१॥ मन तो मनोमयकोश । तेथें आत्मत्वाचा उपदेश । आतां त्या कोशाचा प्रकाश । उत्तराध्यायीं. ॥१२२॥ क्षरभाग अवघा निरसला । अक्षर पुरुष तोचि उरला । जडचैतन्यविवेक झाला । या अध्यायीं. ॥ १२३ ॥ ऐसा हा विवेकाध्याय । इतुकाच आत्मत्वनिश्चय. । क्षरभागाचा निषेध होय । शेष उरला तोचि आत्मा. ॥ १२४ ॥ तथापि उपदेशाचा चमत्कार । श्रीगुरुकृपेचा बडिवार । शब्दावांचूनि निर्धार । ब्रह्मात्मतेचा. ॥ १२५ ॥ याउपरी उपदेशाध्याय । तेथें याचा होईल निश्चय । वर्णिजेल कोशमनोमय । उत्तराध्यायीं. ॥ १२६ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदभूलोकभाषावतारे । पंचमोऽध्यायः ॥ १२७ ॥

---

## अध्याय सहावा.

श्रुति—श्रुतदुष्टजगद्विलक्षणं तद्बिंबप्रतिबिंबदर्पणम् ।
कृतमेतदहो तदर्पणं सगुणं ब्रह्म सरोरुहेक्षणम् ॥

टीका—जें शब्दें न सांगवे । तेहि ठायीं चित्त पावे । प्रताप कोणें वर्णावे । श्रीगुरूचे? ॥ १ ॥ काय उतराई व्हावें? । काय थोरपण वर्णावें? । मनें जेथवरी धांवावें । त्याहीपुढें. ॥ २ ॥ आठवूं जाय मन । तें मन होय उन्मन । आतां कोणतें साधन । उतराई व्हावया? ॥ ३ ॥ सर्वदा सर्वात्मभावें । श्रीचरणासि शरण जावें । उतराई नव्हे म्हणावें । श्रीगुरुनाथा. ॥ ४ ॥ दों दों जिव्हांचीं वदनें । सहस्र ऐसीं आननें । तोही शेष शेवटीं मौनें । स्वरूप त्याचें लक्षितो. ॥ ५ ॥ अनंतगुण अनंतमूर्ती । वर्णील कोण त्यांची कीर्ती? । आत्मत्वें

हृदयीं स्फूर्ती । तेंचि लक्षिती ऋषिवर्य. ॥ ६ ॥ त्या स्वरूपाचा प्रकाश । करी श्रीगुरूचा उपदेश । त्याकारणें मनोमयकोश । श्रुति बोलती. ॥ ७ ॥ आतां मनोमयकोश । येथें श्रीगुरूचा उपदेश । मनावांचूनि न घडे प्रकाश । अनुभवाचा. ॥ ८ ॥ सुषुप्तींत आत्मा निराळा । मनोपाधीहूनि वेगळा । त्याच्या अनुभवाची जाणावी कळा । त्याचि मनेंकरूनी. ॥ ९ ॥ चारी वेद पांचवा उपदेश । पांचां भेदें मनोमयकोश । येथें स्वरूपाचा प्रकाश । म्हणोनी. ॥ १० ॥ शिर यजुर्वेद म्हणोनी । ऋग्वेद सामवेद पक्ष दोनी । उपदेशआत्मा तो गुरुवचनी । अथर्वणवेद तें पुच्छ. ॥ ११ ॥ गळयावर तें शिर । तेथें मुखाचा आकार । हा अमुक म्हणोनि निर्धार । मस्तकेंचि होय. ॥ १२ ॥ शिर याकरितां प्रधानांग । तो यजुर्वेद येथें अंतरंग । भार्गवी वारुणी जेथें सांग । ब्रह्मविद्या बोलिली. ॥ १३ ॥ ओळखावयासि जैसें शिर । करावया आत्मस्वाचा निर्धार । पंचकोशांचा विस्तार । या यजुर्वेदीं. ॥ १४ ॥ हेचि भृगूसी वरुणें । विद्या दीधली सकरुणें । यजुर्वेद याकारणें । प्रधानांग शिर येथें. ॥ १५ ॥ जडभाग अवघा निरसितां । साक्षित्वें उरे आत्मता । ते निषेधशेष तत्त्वतां । यजुर्वेदीं. ॥ १६ ॥ कळलें कीं जळ नसे । तथापि जळ तैसेंचि भासे । किरणीं भासही न दिसे । मध्यान्ह टळतां. ॥ १७ ॥ ज्ञान झालें तरी ज्ञानी । मिथ्या विश्व देखती नयनीं । स्थितिकाळ आहे म्हणोनी । प्रळयीं कांहींच न उरे. ॥ १८ ॥ निषेधिलें अवघें शेष । आत्मा कळला निषेधशेष । ऐसाच प्रलयावशेष । ऋग्वेदीं वर्णिला. ॥ १९ ॥ जडनिषेधें आत्मा स्फुरे । प्रलयकाळीं तोचि उरे । तेव्हां मिथ्याभासही सरे । हें स्पष्ट ऋग्वेदीं. ॥ २० ॥ ब्रह्मीं प्रपंचाचा उदय । ब्रह्मींच याचा लय । तरी आतांही ब्रह्म होय । प्रपंच ऐसें कळावें. ॥ २१ ॥ आदीं अंतीं जें कनक । अलंकार मध्यें अनेक । अलंकारांतरीं एक । सुवर्ण अवघें. ॥ २२ ॥ याकारणें सृष्टि संहार । कळले असावे दोनी विचार । ऋग्वेदीं प्रलयप्रकार । तो पक्ष उजवा याकोशीं.॥२३॥ सृष्टि यजुर्वेदीं बोलिली । ते पूर्वीं येथें वर्णिली । प्रकृतीपासूनि आरंभिली । अन्नमयकोशपर्यंत. ॥ २४ ॥ अन्नमयकोशापासुनी । प्रकृतीपर्यंत परतोनी । उपसंहार होउनी । ब्रह्मचि उरे. ॥ २५ ॥ ब्रह्मयाचीं वर्षे शत । सरतां, ब्रह्मांडाचा अंत । मानवी शत वर्षेपर्यंत । पडेल तेव्हां अवर्षण. ॥ २६ ॥ प्रलयकाळींचा दिनकर । तावील प्राणांत कर । त्या संतापें चराचर । आहळों लागे. ॥ २७ ॥ भूमि धान्यासी गिळी ती । पेरिलीं जेव्हां न उगवती । प्राण

तेव्हां नुरती । अजगाय देहाचे. ॥ २८ ॥ देह देहाचीं अन्नें होतीं । अन्नीं अन्नमय लय पावती । पुरिल्या पेरिल्या अन्नांसे गिळिती । भूमि ठायींचेठायीं. ॥ २९ ॥ पाताळाहुनी शेष । उगळील अग्निरूपें विष । तो अग्नि जाळील निःशेष । सकळ लोकांतें. ॥ ३० ॥ प्रळयमेघ तेव्हां उदंड । शतवर्षे वर्षती अखंड । एक एक धार जैसी सोंड । महागजाची. ॥ ३१ ॥ विराट त्या उदकीं विरे । पृथ्वीगंध तन्मात्रा उरे । तो गंध उदकीं संचरे । उदक रसरूपें अग्नींत. ॥ ३२ ॥ रूपद्वारा अग्नीस । वायूंत लय त्याचा स्पर्श । हरील जेव्हां आकाश । आकाशीं लय वायूचा. ॥ ३३ ॥ रुद्र अहंकार तामस । हरील आकाशाच्या शब्दास । अहंकारीं अवकाश । लय तेव्हां. ॥ ३४ ॥ इंद्रियांचा समुदाय । राजसअहंकारीं पावे लय । मनदेवता यांचा होय । लय सात्विक अहंकारीं. ॥ ३५ ॥ त्रिविध अहंकार उरती । ते महत्तत्वीं लय पावती । महत्तत्त्व सूत्र याच्या शक्ती । गिळोनि ते उरती तिनी गुण. ॥ ३६ ॥ प्रकृतींत ते लया जाती । तेव्हां उरे शुद्ध प्रकृती । तिच्याच योगें विश्वपती । तिचा द्रष्टा ते समयीं. ॥ ३७ ॥ महत्तत्त्वाचा लय । तो जीवोपाधिलयसमय । बिंबीं तेव्हां ऐक्य होय । प्रतिबिंबासी. ॥ ३८ ॥ ज्ञानें उपाधि नासती । त्यास नसे पुनरावृत्ती । ज्याचे उपाधि लय न पावती । पुढें त्यासि संसार. ॥ ३९ ॥ सृष्टि स्थिति संहार । त्रिकाळरूपी परमेश्वर । योगनिद्रेचा अवसर । देखता झाला. ॥ ४० ॥ अखंडानंदवैभव । नित्य निजसुखाचा अनुभव । तथापि साक्षी वासुदेव । काळत्रयाचा. ॥ ४१ ॥ अविद्येचें साक्षीपण । तथापि नित्यस्वरूपस्फुरण । शुद्ध विद्याच अंतःकरण । परमपुरुषाचें. ॥ ४२ ॥ अविद्याप्रपंच ज्याचा सरला । तो त्यासहित नाहींसा झाला । अभाव साक्षी होऊनि उरला । ते समयीं. ॥ ४३ ॥ तें साक्षित्वही सोडिलें । सधर्मकत्वातें मोडिलें । निर्धर्मकत्व उरलें । आपणातें. ॥ ४४ ॥ साक्षित्वाचा [1]समीर । जे समयीं केला स्थिर । सुखसमुद्र आइतें शरीर । ब्रह्मविद्या लहरीचें. ॥ ४५ ॥ ते प्रळयाची स्थिती । ऋग्वेदसंहितेच्या श्रुतीं । आतां सृष्टिकाळीं वर्णिती । सर्वज्ञमुखें प्रगटतां. ॥ ४६ ॥

श्रुति—नासदासीन्नो सदासीत्तदानीम् ॥

टीका—सत् असत् दोनी प्रकार । त्यांत अविद्याविश्व विस्तार । स्थूल सूक्ष्म नानाकार । कांहींच नव्हतें ते काळीं. ॥ ४७ ॥ काळाचाहि काळ । परब्रह्म केवळ । गिळूनी अवघा ब्रह्मांडगोळ । निर्विशेष काळ तो उरला. ॥ ४८ ॥

---

१. वायु.

तो काळ न म्हणावा केवळ । तरी दुसरा तेव्हां प्रळयकाळ । सृष्टिक्रमीं हा प्रांजळ । निर्णय बोलिला. ॥ ४९ ॥ हें ऋग्वेदीं प्रलयशेष । तेंचि यजुर्वेदीं निर्विशेष । माया निरसितां अवशेष । मनोमयकोशीं. ॥ ५० ॥ दोहीं शेषांचा अभेद । बोलिले ऋग्वेद यजुर्वेद । झाला सर्वसंशयछेद । ब्रह्म आत्मा कळावया. ॥ ५१ ॥ ऐसा ऋग्वेद पक्ष उजवा । आतां सामवेद तो डावा । जेथें सर्वात्मतेचा बरवा । अनुभव. ॥ ५२ ॥ जेथें नानात्वाचा निषेध । दृष्टांतमुखें नानात्वबाध । जीवेश्वराचा एकत्व बोध । छांदोग्यउपनिषदीं. ॥ ५३ ॥ यजुर्वेद-ऋग्वेद एक मत । सृष्टिप्रलयें अद्वैत । तैसेंचि स्थितिकाळीं निश्चित । अद्वैत सामवेदीं. ॥ ५४ ॥

श्रुति—नेह नानास्ति किंचन ।

यथा खलु सौम्यैकेनैव मृत्पिंडेन सर्वं मृन्मयं विज्ञातं स्यात् ।
वाचारंभणं विकारो नामधेयं मृत्तिकेत्येव सत्यम् ॥

टीका—ब्रह्मीं नानात्व हें नाहीं । आणि दिसतें जें कांहीं । दृष्टांतमुखें कल्पित तेंही । नाहींसेंच जेथें. ॥ ५५ ॥ एक मृत्तिकाच सत्य । घटादि तें अवघें असत्य । विकार नाम मानावें अगत्य । तरी घट मोडितांच तें कैंचें. ॥ ५६ ॥ ऐसे अनेक दृष्टांत । स्थितिकाळींहि अद्वैत । सामवेदीं बोलिलें निश्चित । तो पक्ष दुसऱ्या कोशाचा. ॥ ५७ ॥ ऐसा कोश मनोमय । अंगत्रयें वेदत्रय । तरी सर्वांग व्यर्थ होय । एक आत्मा तो नसतां. ॥ ५८ ॥ वेदत्रयार्थ शिकला । आणि आत्मा नाहीं ओळखिला । या शवाचा अभिमान वाढला । सर्वज्ञ मी म्हणोनी. ॥ ५९ ॥ आत्मा ब्रह्म म्हणोनी । वेद बोलती प्रतिवचनी । परि तो जाणती कृपेंकरूनी । श्रीगुरुच्या. ॥ ६० ॥ तें गुरुमुखें केवळ । कळतांची आम्ही वेद सफळ । म्हणोनि म्हणे श्रुती प्रांजळ । कीं उपदेश आत्मा या कोशीं. ॥ ६१ ॥

श्रुति—आदेश आत्मा ॥

टीका—गुरुमुखें तत्त्वनिर्धार । श्रुति बोलली ऐसा प्रकार । आणीक येथें चमत्कार । कीं शब्दें न सांगवे आत्मा. ॥ ६२ ॥ अहंकारशब्दाचें मूळ । तयाही परतें सत्त्व निर्मळ । त्या सत्त्वें स्फुरे केवळ । तें शब्दें न सांगवे. ॥ ६३ ॥ तें सत्य, तें ज्ञान, । ऐसें सर्वज्ञ बोले वचन । परि दाखवूं जातां चैतन्यघन । शब्द मागें परतती. ॥ ६४ ॥ एक चंद्रातें देखतो । त्याचें स्व-

रूप उपपादितो । दाखवूं जातां शब्द राहतो । शाखेवरी. ॥ ६५ ॥ शब्देंचि शब्द निरसिला । निःशब्द आत्मा तोचि उरला । यास्तव येथेंचि बोलिला । स्वयें आत्माचि उपदेश. ॥ ६६ ॥ बाळचंद्र दृष्टीस दिसे । शब्दास अवलंब तेथें नसे । तरी परंपरेनें दाविती जैसे । तैसा उपदेश. ॥ ६७ ॥ चंद्र दाविती परी । शब्द न पावे चंद्रावरी । वृक्षशाखा चंद्रासी दूरी । तेथें दाविती. ॥ ६८ ॥ पाहतो वृक्षाची शाखा । अकस्मात देखे चंद्राची रेखा । पाहतां शब्दाचा लेखा । शाखेचिवरी. ॥ ६९ ॥ तो उपदेश तों चंद्राचा । शाखेपासूनी परते वाचा । एवं उपदेश आत्मतेचा । तोचि आत्मा. ॥ ७० ॥ अहंकृतीची शाखा । तेथवरी शब्दाचा लेखा । सत्त्वदृष्टीनें ओळखा । आत्मचंद्रमा गुरुमुखें. ॥ ७१ ॥ श्रुतिमुखें सर्वज्ञ ईश्वर । आत्मज्ञानाचा ऐसा प्रकार । बोलिला त्याचा अर्थविचार । त्यानेंचि ऐसा निरोपिला. ॥ ७२ ॥ मनोमयकोशीं श्रुती । आत्मा तोचि उपदेश म्हणती । त्याची ऐसी अर्थस्थिती । निरूपिली. ॥ ७३ ॥ शेवटील अंग उरलें । अथर्वण वेद तें पुच्छ केलें । लोकोद्धारार्थ शोभों लागलें । शास्त्र जेव्हां. ॥ ७४ ॥ वेद पाहतां तों तिन्ही । म्हणती त्रैविद्या म्हणोनी । अथर्वणवेद त्यांतूनी । मंत्ररूपें निवडिला. ॥ ७५ ॥ तो एकला पुच्छ म्हणतां । सर्व वेदांसि पुच्छता । शोभा मात्र पुच्छाकरितां । पक्षियांसी. ॥ ७६ ॥ आत्मा आणि पक्ष शिर । नसतां न चले पक्षिशरीर । पुच्छावीणही गगनचर । सुखें असती. ॥ ७७ ॥ पुच्छें कांहीं कार्य नसे । परि पक्षियासी शोभा दिसे । तैसी वेदविद्या वसे । अलंकारमात्र. ॥ ७८ ॥ त्यासि शोभेची इच्छा नसे । तथापि पक्षी सुंदर दिसे । तैसी वेदविद्या उल्लसे । ज्ञानियाची. ॥ ७९ ॥ अनुभवी आणि शास्त्रसिद्ध । जैसें सोनें आणि सुगंध । त्याच्या शास्त्रें तुटती बंध । इतरांचे. ॥ ८० ॥ चंद्रीं अमृत आणि प्रभा । ज्ञानियासी तैसी शास्त्रशोभा । स्वयें पावोनि वेदगर्भा । उद्धरी जनांसी. ॥ ८१ ॥ वर्णिला मनोमयकोश । जेथें आत्मा स्वयें उपदेश । श्रुतिरहस्याचा ऐसा प्रकाश । या रहस्याध्यायीं. ॥ ८२ ॥ जेथें शब्द मागें सरला । शिष्य शेषत्वें उरला । उपदेशें तोचि अनुभव झाला । आत्मा गुरु सच्चिदानंद. ॥ ८३ ॥ आतां जीव परमेश्वर । यांचा ऐक्यत्वनिर्धार । अभ्यासाचे प्रकार । उत्तराध्यायीं. ॥ ८४ ॥ उपाधीवेगळा आपण । हें आत्मत्वाचें लक्षण । इतुकें झालें निरूपण । या अध्यायीं. ॥ ८५ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदभूलोकभाषावतारे । षष्ठोऽध्यायः ॥ ८६ ॥

---

## अध्याय सातवा.

सकळ निषेधांचें शेष । परमात्मा निर्विशेष । तरी चराचर अशेष । न दिसे तयावेगळें. ॥ १ ॥ नानाकारें भूषणें । निषेधितांही तें सुवर्ण । जो कनकार्थी आपण । न टाकी अलंकारासी. ॥ २ ॥ सर्वाधार निराधार । सर्वाकार निराकार । सर्वात्मभावें नमस्कार । त्या सर्वेश्वरासी. ॥ ३ ॥ कोशत्रयीं जडउपाधी। निरसितां आत्मत्वसिद्धी । हे तों त्वंपदाची शुद्धी । मनोमयकोशीं. ॥ ४ ॥ गेला त्रिविध अहंकार । झाला आत्मत्वनिर्धार । अनादि अविद्यासंस्कार । तों गेला नाहीं. ॥ ५ ॥ रज्जु दृष्टीं देखतो । परि पूर्वसंस्कारें भितो । किरण कळलें तरी देखतो । भास उदकाचा. ॥ ६ ॥ तत्पदवाच्य परमेश्वर। ज्यानें व्यापिलें चराचर । अनुभवा येतां तैसे प्रकार । पूर्वसंस्कार मोडती. ॥ ७ ॥ त्वंपदें बोलिला जीवात्मा । तत्पदेंकरूनि परमात्मा । उपाधि दोहींचा अनात्मा । उभयनिषेधें ब्रह्मत्व. ॥ ८ ॥ घटीं मठीं जो अवकाश । तो पाहतां महदाकाश । तैसा आत्मा स्वप्रकाश । दोहीं ठायीं. ॥ ९ ॥ दोहीं उपाधींच्या निरासें । ब्रह्मानुभव बोलती ऐसें । तथापि विद्येवांचूनि कैसें । अनुभवा येईल एकत्व. ॥१०॥ विद्यारूप शुद्ध सत्त्व । तेंचि ब्रह्मीं ईश्वरत्व । यावेगळें तों ब्रह्मत्व । अनुभवा नये. ॥ ११ ॥ तरी तें काय शून्य । ऐसें म्हणती ते जघन्य । तेंचि शुद्ध चैतन्य । परंतु नव्हे सधर्मक. ॥ १२ ॥ चैतन्य मानावें सत्त्व । तरी सुषुप्तींत त्यासि मूढत्व । याकरितां आत्मतत्त्व । तेंचि चैतन्य. ॥१३॥ सुषुप्तींत सत्त्वाचा लय । तेव्हां अनुभवाचा नसे उदय । सत्त्वावांचूनि अनुभव होय । तरी मोक्ष प्रळयीं सर्वांस. ॥१४॥ सुषुप्ति आणि प्रलय । तेव्हां दोहीं उपाधींचा लय । तैसा निरसतां उपाधीद्वय । न बोलवे अनुभवातें. ॥१५॥ आणि ते निरसिल्यावीण । नये अनुभवाची खूण । तरी या निषेधाचें लक्षण । तें ऐसें. ॥ १६ ॥ अविद्येनें जीवत्व पावला । तो उपाधि पूर्वी निरसिला । मनोमयीं निषेध केला । क्षरमार्गाचा. ॥ १७ ॥ सरलें तें अक्षरत्व । ऐसा अनुभव तेंचि सत्त्व । ज्या सत्त्वें देखिलें तत्त्व । तेंचि विद्या. ॥ १८ ॥ ऐसी जीवात्मशुद्धी । जे विद्येनें शुद्धबुद्धी । ते विद्या ईश्वरोपाधी । ती करितां अनुभव. ॥ १९ ॥ सर्वज्ञत्वादि गुण। सृष्ट्यादि सामर्थ्यलक्षण । नित्यमुक्त ईश्वरपण । हेंही अवघें मायिक. ॥ २० ॥ नित्यबद्ध जो त्रिगुण । अविद्या विक्षेप आवरण । परतंत्र इत्यादि लक्षणें । जीवांचीं. ॥ २१ ॥ ऐसे दोनी उपाधी । परस्पर दिसती विरोधी । दोनी

---

१. निंब.

निरसितां बुद्धी । ब्रह्म ओळखे. ॥ २२ ॥ तेथें अविद्या नसे । ईश्वरत्वही निरसे। तथापि विद्या उरली दिसे । अनुभवासी. ॥ २३ ॥ तेज आणि तिमिर । यांसि विरोध परस्पर । तथापि नासून अंधकार । तेज उरलें. ॥ २४ ॥ तथापि जीवेश्वरपण । न दिसती दोनी लक्षणें । दोनी निरसोनि विद्या आपण । अनुभवीं उरली. ॥ २५ ॥ अनुभवीं विद्या असे । जरी ईश्वरत्व तेथें न दिसे । अविद्या नासूनि उल्लसे । ब्रह्मविद्या. ॥ २६ ॥ स्वरूपाकार जाली बुद्धी । तेंचि स्वरूप निरुपाधी । निर्विशेष जाणे समाधी । विद्यारूप तें सत्त्व. ॥ २७ ॥ समाधि ऐसा निर्विशेष । दुसरा समाधि सविशेष । तेथें प्रपंच निःशेष । ब्रह्मचि दिसे. ॥ २८ ॥ निर्विशेषाचा अभ्यास । सविशेषाचा विलास । अभ्यास दोनी ज्ञानियास । या विज्ञानमयीं कोशीं. ॥ २९ ॥ अभ्यासें बाणे स्थिती । अभ्यासें सुखाची प्राप्ती । जे अभ्यास निषेधिती । ते शब्दज्ञानी दांभिक. ॥ ३० ॥ कोणी म्हणती ब्राह्मण । मी ब्राह्मण न म्हणे आपण । तरी त्याचें ब्राह्मणपण । स्वतःसिद्ध. ॥ ३१ ॥ मी अहेव ऐसें मनीं । जरी नाठवी कामिनी । तरी सुवासिनी ते म्हणोनी । मंद ऐसें ही बोलती. ॥ ३२ ॥ नित्यमुक्त जो कां आपण । तो सदा शुद्ध ब्राह्मण । विश्वामित्रें विप्र होणें । साधनावांचूनि न घडे. ॥ ३३ ॥ आत्मा नव्हे बद्धमुक्त । हे उपाधि दोनी विभक्त । निषेध अभ्यासाचा अयुक्त । सर्वज्ञ ऐसें न बोलती. ॥ ३४ ॥ विस्मरण अथवा स्मरण । दोनीही वेगळें ब्रह्म आपण । दोनी बुद्धीस तिणें । ब्रह्माकार व्हावें अभ्यासें. ॥ ३५ ॥ मी देह कीं मी ब्रह्म म्हणे । तिसरी गोष्टी बुद्धि नेणे । ब्रह्म विस्मरणें बाणे । आयती देहात्मता. ॥ ३६ ॥ गृहस्थ जाला संन्यासी । मन आठवी पूर्वस्त्रियांसी । रेत स्खलतां तयासी । प्रायश्चित्त. ॥ ३७ ॥ मोडावया पूर्वसंस्कार । संन्यासियानें वारंवार । मी संन्यासी हें निरंतर । आठवावें. ॥ ३८ ॥ ज्ञान झालें जयास । तो न करी अभ्यास । पूर्वसंस्कार त्यास । मागुती अविद्येचे. ॥ ३९ ॥ आवरणरूपें गेली । विक्षेपरूपें अविद्या उरली । न करितां अभ्यास संचरली । हृदयीं बहुतांच्या. ॥ ४० ॥ आतां ते वायां न जाय । केव्हां तरी विद्येचा उदय । मागुती होईल हा निश्चय । परि मुमुक्षु[1] ऐसें न मानिती. ॥ ४१ ॥ बुभुक्षु[2] म्हणावा तरी । कीं अन्न वाढितांही त्वरा करी । मोक्ष इच्छील काळांतरीं । तो मुमुक्षु न म्हणावा. ॥ ४२ ॥

---

१. मुक्तीची इच्छा करणारा. २. भक्षणाची इच्छा करणारा.

अन्न मिळालें परी। क्षुधा नसे अंतरीं। ज्ञान होऊन अभ्यास न करी। न भक्षी अन्न तो जैसा. ॥ ४३ ॥ विना अभ्यास बुद्धिभ्रंश। हृदयीं न राहे उपदेश। आठवितांही होती प्रवेश। संदेहाचे. ॥ ४४ ॥ हृदयीं ज्याच्या संशय। त्यास सिद्धि होईल काय। अभ्यासावांचुनी होय। अनर्थ ऐसा. ॥ ४५ ॥ कारण येथें अभ्यास। त्यास आधीं दृढ विश्वास। जोंवरी ये अनुभवास। ब्रह्मानंद. ॥ ४६ ॥ ब्रह्मानंदीं चित्त बुडे। योगभ्रंश तेव्हां न घडे। तोंपर्यंत आलीकडे। श्रद्धा असावी. ॥ ४७ ॥ केला आत्मत्वनिर्धार। तेंचि ब्रह्म ऐसा आदर। असावा म्हणोनी श्रद्धा शिर। या विज्ञानकोशाचें. ॥ ४८ ॥ शिर जैसें शरीरासी। तैसी श्रद्धा विज्ञानकोशीं। आत्मत्व कळलें उपदेशीं। तें ब्रह्मत्वें भजावें. ॥ ४९ ॥ गुरुकृपेनें झाला धन्य। कळलें साक्षी चैतन्य। चित्त तेथें वृत्तिशून्य। तेव्हां आनंदमयकोश. ॥ ५० ॥ जो पूर्वयोगभ्रष्ट पुरुष। त्यास कळतां निषेधशेष। तत्काळ त्यास निर्विशेष। वृत्तिशून्य अनुभव. ॥ ५१ ॥ जो ये जन्मीं शुद्धचित्त। तत्त्व कळलें निश्चित। मनोवृत्ती अत्यंत। नावरती निरोधितां. ॥ ५२ ॥ वृत्तीसहित आत्मज्ञान। तें विशिष्ट ज्ञान विज्ञान। विज्ञानमय या अनुसंधानें। श्रुति बोलती हा कोश. ॥ ५३ ॥ सगुणनिर्गुणभावें। ईश्वरास आत्मत्वें भजावें। सर्वत्र सर्वभूतीं पाहावें। ऐसी श्रद्धा मुख्य येथें. ॥ ५४ ॥ हाचि आत्मा परिपूर्ण। हाचि अनंत कल्याणगुण। श्रुति वर्णिती ईश्वरपणें। उपाधिभेदें. ॥ ५५ ॥ ईश्वराचाचि विद्यांश। जाणें ब्रह्मत्वाचा प्रकाश। ऐसें जाणोनि बुद्धिप्रवेश। सर्वात्मकत्वीं करावा. ॥ ५६ ॥ सर्वत्र आत्मा अनन्य। विद्योपाधि साक्षी चैतन्य। ऐशा अनुभवें होऊनि धन्य। जतन करावी हे श्रद्धा. ॥ ५७ ॥ क्षेत्र निषेधलें जडपणें। क्षेत्रज्ञ उरला आपण। साक्षित्वें क्षेत्र जाणणें। इतुकेंचि आपुलें स्वरूप. ॥ ५८ ॥ ज्या क्षेत्रीं आपुला वास। जाणावें मात्र त्या क्षेत्रास। ऐसेंचि जाणे तो चराचरास। तरी वास सर्वत्र आपुला. ॥ ५९ ॥ मीपण जेव्हां निरसिलें। तेव्हांचि देहात्मत्व गेलें। साक्षित्व मात्र उरलें। ऐसाचि साक्षी सर्वत्र. ॥ ६० ॥ याही देहास जाणणें। ऐसेंचि सर्व देहांतें पाहणें। तरी एक देही आपण। मानावें कां हो! ॥ ६१ ॥ जाणतो एका शरीरा। तैसाचि जाणतो सचराचरा। वृथा धरूनि अहंकारा। मी देह कां हो! मानावें. ॥ ६२ ॥ शरीर मी ऐसी प्रतीति। हे तों रज्जु सर्पाची भ्रांती। जे प्रतीति आतां दिगंतीं। हुडकितांही न सांपडे. ॥ ६३ ॥ जी एक शरीरीं ज्ञाता। माझ्या ज्ञानें मी जाणता। हा भेद तुटला,

तत्त्वता । ज्ञाताचि झालों. ॥ ६४ ॥ ज्ञाताचि जालों मी ज्ञान । देह वेगळा हें अनुसंधान । आतां जेथें जेथें मन । तेथें तेथें मीच कीं. ॥ ६५ ॥ आत्मा ब्रह्म, श्रद्धा ऐसी । तरी पावेल या अनुभवासी । याकरितां या कोशासी । प्रधान अंग ते श्रद्धा. ॥ ६६ ॥ ज्ञान होतांचि ऐसा भाव । न घडे म्हणसी तरी हा अनुभव । ऐसेंचि गीतेंत वासुदेव । चतुर्थाध्यायीं बोलिला. ॥ ६७ ॥ अर्जुना! तें तत्त्व जाणसी । मग मोह ऐसा न पावसी । ज्ञानें सर्वभूतांसी । देखसी आपणामध्यें. ॥ ६८ ॥ हा तो माझा अनुभव । तूं म्हणसील मी जीव । तरी तेव्हां ऐक्यभाव । मजशीं आपुला देखसी. ॥ ६९ ॥ याकारितां श्रद्धा शिर । वेदरूपी परमेश्वर । बोलिला याकारणें आदर । धरावा मी ब्रह्म म्हणोनी. ॥ ७० ॥ मी ब्रह्म ऐसा आदर । तरीच होईल हृदयीं स्थिर । जरी पाहील सचराचर । आपणांत आपण त्यामध्यें. ॥ ७१ ॥ हा ईश्वराचा अनुभव । विद्याशक्तीचें वैभव । त्याच्या ऐक्येंकरूनि जीव । या पदवीस पावला. ॥ ७२ ॥ भूत भविष्य वर्तमान । आणि बुद्धिप्रत्ययाचें ज्ञान । सृष्ट्यादिसामर्थ्यसाधन । हें ईश्वराचें ईश्वरत्व. ॥ ७३ ॥ ज्या विद्याशक्तीकरूनी । ब्रह्म आपण म्हणोनी । नित्यमुक्त जाणे दोनी । सधर्मनिर्धर्मकत्व. ॥ ७४ ॥ तेचि ईश्वराची विद्या । अंधकाररूप त्याची अविद्या । तीस नासूनि ती अनाद्या । सूर्य जैसा प्रकाशतो. ॥ ७५ ॥ ज्या विद्येच्या गुणें । ईश्वरासि नित्यमुक्तपण । ते विद्येनेंचि निर्गुणें । प्रकाशलें यासी. ॥ ७६ ॥ तैं तेथें देखिला होता । तोचि येथें देखिला आतां । देश काळ दोनी टाकितां । तोचि पुरुष. ॥ ७७ ॥ तैसें एक निर्गुण । दोनी उपाधींचीं लक्षणें । निरसितां जीवेश्वरपण । अनुभवा आलें तें ब्रह्म. ॥ ७८ ॥ उपाधि दोनी टाकणें । अधिष्ठान दोहींचें उरवणें । हीस म्हणती शास्त्रनिपुण । 'जहदजहल्लक्षणा'. ॥ ७९ ॥ निरसितां दोनी उपाधी । ब्रह्मात्मतेचि झाली सिद्धी । ऐशा स्वानुभवीं परिनिष्ठबुद्धी । तेचि पक्ष या कोशाचे. ॥ ८० ॥ एक पक्षी पक्षद्वय । उपाधि दोनी ब्रह्म अद्वय । पक्षद्वयाच्या नांवें निश्चय । ऐसाचि एकत्वाचा. ॥ ८१ ॥ ऋत आणि सत्य म्हणोनी । पक्षद्वयासी नांव ठेवुनी । श्रुती बोलती पदें दोनी । अर्थ दाविती एक. ॥ ८२ ॥ ऋत आणि सत्य म्हणोनी । सत्याचींच नांवें दोनी । उपाधि मिथ्या येणेंकरूनी । येथें सूचविलें. ॥ ८३ ॥ सर्पाचें नसे गात्र । रज्जूंत सर्प नाममात्र । ऋत सत्य नांवें उभयत्र । अर्थ एक तो सत्य. ॥ ८४ ॥ जीव ईश्वर नांव मात्र । ब्रह्मचि सत्यत्वें उभयत्र । एवं प्रपंचास नाहीं गात्र । स्थूळ

सूक्ष्म अवघा उपाधी. ॥ ८५ ॥ जीवेश्वर दोघे एक । हे उपाधि लटिके अनेक । ऐसें कळतां दिसे व्यापक । त्रिभुवनीं आत्मा. ॥ ८६ ॥ घटमठां दोहींवेगळा । महदाकाश असे सगळा । उपाधि लटिका हा निराळा । आत्मा सत्य. ॥ ८७ ॥ घटमठ दोनी प्रकार । नाममात्र मृत्तिकाविकार । तैसा नव्हे निराकार । आकाश सर्वदा सारिखा. ॥ ८८ ॥ शिर आणी पक्ष दोनी । कोशास वर्णिलीं अंगें तिनी । परंतु अंगें आत्म्यावांचुनी । निर्जीव दिसती. ॥ ८९ ॥ हा जो बोलिला अनुभव । यास योगाचें वैभव । पाहिजे जैसा अंगासि जीव । योग तैसा ज्ञानियांसी. ॥ ९० ॥ सविशेषनिर्विशेषपण । योगाचीं दोनी लक्षणें । तीं एक एकाविण । सिद्ध नव्हती. ॥ ९१ ॥ चित्तवृत्तीचा निरोध । हा निर्विशेषयोग शुद्ध । पतंजलीनें केला प्रसिद्ध । योगशास्त्रीं. ॥ ९२ ॥ तो योग कोशाचा । आत्मा म्हणती वेदवाचा । कराया अभ्यास त्याचा । तोचि आत्मा या कोशीं. ॥ ९३ ॥ त्या योगाचा अभ्यास । करितां अत्यंत आयास । योगसिद्धि शुकादिकांस । भक्तियोगें. ॥ ९४ ॥ ब्रह्म सर्वत्र पाहणें । सगुण तितुकें निर्गुण । सर्वात्मभावें शरण । शुकादिक. ॥ ९५ ॥ भक्तियोग जो म्हणावा । तोचि सविशेषयोग जाणावा । विश्वरूपें आत्मा भजावा । तोचि योग. ॥ ९६ ॥ विशिष्टज्ञान विज्ञानें । वृत्तीसहित आत्मज्ञान । कोशासि याचि अनुसंधानें । विज्ञानमय ऐसें बोलती. ॥ ९७ ॥ शिर आणि पक्ष दोनी । या तिहीं अंगेंकरूनी । हाचि अर्थ उपपादुनी । योग आत्मा बोलिला. ॥ ९८ ॥ महत्पुच्छ म्हणोनी । शेवटील अंग त्याहींकरूनी । सर्वात्मकत्वें भजनीं । तात्पर्य वेदाचें. ॥ ९९ ॥ या सर्वांगाचें जीवन । निर्विशेष योगाचें साधन । तेथें निश्चळ नव्हे मन । सर्वात्मभजनावांचुनी. ॥ १०० ॥ सर्वात्मभावें भजन । विश्वरूपाचें ध्यान । तो देह त्याचें जीवन । निर्विशेषयोग तो आत्मा. ॥१०१॥ या योगाचें साधन । विश्वात्मकत्वें भजन । कोशाचें नांव विज्ञान । याचि करितां. ॥ १०२ ॥ जेथें सर्व वृत्ति शून्य । अनुभवीं उरे आत्मचैतन्य । साधक जेव्हां ऐसा धन्य । तेव्हां आनंदमयकोश. ॥ १०३ ॥ या योगाचें साधन । तें विज्ञानकोशाचें जीवन । या साधनें सर्वात्मभजन । सिद्धि होय. ॥ १०४ ॥ आतां वृत्तीचा वियोग । तोचि जाणावा पूर्ण योग । चित्तासि आत्मयाचा संयोग । सहज आहे. ॥ १०५ ॥ चित्त कोण आत्मा कोण । हें आपुलें पाहावें आपण । दोघांचें वेगळेंपण । सुषुप्तींत. ॥ १०६ ॥ सुषुप्तींत चित्त लीन । तेव्हां कांहीं नसे चिंतन । जीवोपाधीचें जीवन । प्रति-

बिंब बिंबीं ते समर्थी. ॥ १०७ ॥ तमोगुणीं सत्त्वगुण । आत्मा तेव्हां निर्गुण । सत्त्वगुणें ज्याचें स्फुरण । मनोमयकोशीं गुरुमुखें. ॥ १०८ ॥ उदक जोवरी निर्मळ । तों प्रतिबिंबे रविमंडळ । चिखल डहुळे होय गढुळ । न दिसे तेव्हां प्रतिबिंब. ॥ १०९ ॥ कर्दम जेव्हां तळीं बसे । प्रतिबिंब आश्वतें गवसे । जागृतींत योग तैसा असे । चित्त आत्मा दोघांचा. ॥ ११० ॥ संयोग होतांचि उठती । नाना प्रकारींच्या वृत्ती । तेव्हां जीवनकळा चित्तीं । तोचि आत्मा. ॥ १११ ॥ तोचि आत्मा जीवनकळा । जो जडभागावेगळा । परि तो होतां चित्तानिराळा । अनुभवा नये. ॥ ११२ ॥ विनाचित्त अनुभवा येतां । तरी सुषुप्तींत मोक्ष होता । न दिसे डोळे झांकितां । रज्जु अथवा सर्प. ॥ ११३ ॥ दिसोनी न दिसे दोरी । मिथ्या भुजंग भासे वरी । चित्तास आत्मा ऐसे परी । न दिसे असोनि प्रत्यक्ष. ॥ ११४ ॥ तोचि डोळे उघडोनी । मिथ्या सर्पत्व निरसोनी । रज्जु देखे नयनीं । ते समर्थी निःसंशय. ॥ ११५ ॥ ओळखिला आपण म्हणूनी । आत्मा गुरुकृपेंकरूनी । त्यानें सचेतन होऊनी । चित्त चिंती विषयातें. ॥ ११६ ॥ ते चित्ताची पराग्वृत्ती । नाना आकार चित्तीं दिसती । स्फुरद्रूप आत्मा चित्तीं । परि ते नव्हे स्थिर तेथें. ॥ ११७ ॥ आतां आपणातें आपण । परतोन जें कां पाहणें । प्रत्यग्वृत्तीचें लक्षण । इतुकेंचि. ॥ ११८ ॥ वृत्ति ऐसी अंतर्मुख । करितां नाठवे कांहीं आणिक । तेव्हां जाणावें ब्रह्मसुख । अनुभवा आलें. ॥ ११९ ॥ निर्वात जें कां स्थळ । दीप तेथें निश्चळ । तैसेंचि उदकीं नसे डळमळ । बुद्बुद तरंग हें कांहीं. ॥ १२० ॥ तैसें जेव्हां वृत्तिशून्य । चित्तचैतन्य दोनी अनन्य । सत्तामात्र आत्मचैतन्य । अनुभवा आलें निर्धर्म. ॥ १२१ ॥ ब्रह्मसमाधि तो होय । तोचि कोश आनंदमय । येऊं लागले विक्षेपलय । अभ्यास तेव्हां बोलिला. ॥ १२२ ॥ लय निद्रेस म्हणती । विक्षेप म्हणिजे कल्पनावृत्ती । यां दोंवेगळी आत्मस्फूर्ति । तोचि समाधी. ॥ १२३ ॥ याचि कारणें श्रुती । आत्मयोग कोशाचा म्हणती । येथें अभ्यास सूचविती । समाधिसुखाकारणें. ॥ १२४ ॥ उपदेश पडला कानीं । अभ्यास न धरी मनीं । अनुभवी नव्हे शब्दज्ञानी । तो जाणावा. ॥ १२५ ॥ नलगे येथें वायुधारण । अथवा नलगे लोळी करणें । स्वरूपाकार अंतःकरण । तोचि योग. ॥ १२६ ॥ जरी समाधि पावला । तरी जीवन्मुक्तचि जाला । चित्त नावरितां आरंभिला । सर्वात्मयोग. ॥ १२७ ॥ सर्वात्मकत्वें भजतां

स्मरतां । निर्विशेषीं होय स्थिरता । साधकांसि याचिकरितां । योग दोनी बोलिले. ॥ १२८ ॥ अभ्यासीं उठे कल्पना । जेव्हां आवरूं न शके मना । आठवावी ब्रह्मांडरचना । सर्वब्रह्म या भावें. ॥ १२९ ॥ जें आठवे तेंचि ब्रह्म । तेथेंचि वृत्तीचा उपरम । न घडे वृत्तीचा उगम । स्वरूपावांचुनी. ॥ १३० ॥ तंतूवांचूनि पट । मृत्तिकेवांचूनि घट । न दिसे ऐसें मनीं उत्कट । तेव्हां स्मरावें संस्कारें. ॥ १३१ ॥ संस्काररूपें स्मरावें । शब्दास सर्वया आवरावें । आपण आपणा न विसरावें । सर्वात्मना. ॥ १३२ ॥ आपणपणाची वृत्ती । ते चरमवृत्ति असतां चित्तीं । वृत्ति उठतांचि वितळोनि जाती । अभ्यास हा मुख्यत्वें. ॥ १३३ ॥ याही अभ्याससाधना । नावरे जेव्हां कल्पना । चतुर्दशभुवनांची रचना । आत्मभावें स्मरावी. ॥ १३४ ॥ सृष्टि आणि संहार । हे दोनी प्रकार । मनन करितां जे संस्कार । ते तेव्हां स्मरावे. ॥ १३५ ॥ प्रकृतीपासूनि अन्नमय । तोंवरी सृष्टीचा अन्वय । प्रकृतीपर्यंत मागुती लय । संस्काररूपें स्मरावा. ॥ १३६ ॥ ऋग्वेदीं वर्णिला प्रळय । तेव्हां ब्रह्म अद्वय । मनीं स्मरतां ब्रह्ममय । चित्त होय मागुती ॥ १३७ ॥ ऐसेंही नव्हे स्थिर । तरी मागुती सचराचर । मनीं आठवावें सादर । भगवद्भावें. ॥ १३८ ॥ सुवर्ण सर्वा अलंकारीं । ब्रह्म तैसें चराचरीं । दृष्टि आधीं सुवर्णावरी । तेव्हां दिसती भूषणें. ॥ १३९ ॥ हे गुरुकृपेची किल्ली । जोंवरी असे मनीं धरिली । सर्व ब्रह्म ऐसी ठसावली । बुद्धि राहे तोंपर्यंत. ॥ १४० ॥ ऐसें विश्वमूर्तीचें ध्यान । करणें ब्रह्मानुसंधान । स्वरूपीं चित्त सावधान । तोचि योग निर्विशेष. ॥ १४१ ॥ चित्त धांवे जेथें जेथें । आत्मा स्फुरे तेथें तेथें । व्यापक आत्मा परंतु येथें । चित्तें करूनि अनुभव. ॥१४२॥ चित्त जेथें पावलें । आत्मा तेथें असे पहिलें । ऐसें जेव्हां कळों आलें । तेव्हां सर्वत्र आपण. ॥१४३॥ चित्तें करूनि व्यापक । सचराचरीं आपण एक । ऐसें कुका कौतुक । पाहतां योगसिद्धी. ॥ १४४ ॥ व्यापकत्वें ऐसें कळे । चित्त तेव्हां पांगुळें । मग स्वरूपींहूनि न ढळे । योगियाचें. ॥ १४५ ॥ आठवितां चराचर । चैतन्य दिसे अनंत अपार । ज्या चैतन्यें विश्वविस्तार । चित्तासि गवसे. ॥ १४६ ॥ तें चैतन्य तों आपण । धरूनि ऐसी दृढ खूण । आकारमात्र स्मरण । सोडूनि द्यावें. ॥ १४७ ॥ करूनि उफराटी वृत्ती । आपणांत आपण ऐसी स्मृती । जोंपर्यंत वृत्ति न उठती । समाधि तोंपर्यंत. ॥ १४८ ॥ निमिषापासूनि जितका काळ । स्थिरता

अधिक तितुका सुकाळ। तोंवरी समाधि जों विटाळ। नव्हे कल्पनेचा. ॥ १४९ ॥ जरी उठली कल्पना। सोडूं नये अनुसंधाना। कल्पनेच्या अधिष्ठाना। स्मरतां तेही न राहे. ॥ १५० ॥ आपणपणाचें स्मरण। व्यापक आत्मा ऐसी खूण। जें आठवे तेथें आपण। तरी कल्पना मग कैंची? ॥ १५१ ॥ पुतळ्यांची विणकरी। वस्त्रांत विणिती नानापरी। पाहतां वस्तु दूसरी। न दिसे तंतूवांचुनी. ॥ १५२ ॥ त्याचि वस्त्रीं दुसरीकडे। न ते दृष्टीस रचना पडे। प्रत्यग्वृत्तींत तैसी सांपडे। निर्विशेषता. ॥१५३॥ तंतु मानावें अधिष्ठाना। पटाकार बुद्धीची कल्पना। पट पाहतां प्रपंचरचना। तंतु पाहतां परब्रह्म. ॥ १५४ ॥ वस्त्र सुफराटें पाहती। प्रतिमा विणिल्या देखती। जे उफराटें अवलोकिती। त्यांसि दिसे तंतुमात्र. ॥ १५५ ॥ कांहीं उठतां कल्पना। अवलोकावें अधिष्ठाना। ते प्रत्यग्वृत्तिरचना। न दिसे तेथें प्रपंचाची. ॥ १५६ ॥ ऐसी कल्पना निवारी। चित्त चैतन्यीं आवरी। तरी या अभ्यासें लवकरी। समाधिसिद्धी. ॥ १५७ ॥ येथें सर्वांस कारण। आर्जवावा नारायण। थोर तें त्याचें स्मरण। स्मरणांत थोर अभ्यास. ॥ १५८ ॥ जंव चित्ताचें समाधान। तंव न सोडिजे अनुसंधान। चित्त होतां उत्साहहीन। पुरे करावा अभ्यास. ॥ १५९ ॥ श्रवणकीर्तनादि भक्ती। वासुदेव सर्व ऐशा युक्ती। प्रारब्ध भोगितांही विरक्ती। हृदयीं असावी. ॥ १६० ॥ दृष्टीस जें जें दिसे। भगवद्रूप तें तें असे। सविशेषयोगीं हेंचि गवसे। विश्वरूप. ॥ १६१ ॥ विश्वरूपें केलें ध्यान। वर्ततां तेंचि अनुसंधान। त्या विश्वमूर्तीतें वंदन। यथाकाळें करावें. ॥ १६२ ॥ ब्रह्मांड आवरणासहित। तेथें व्यापक करावें चित्त। सर्वांगें दंडवत। विश्वरूपासी. ॥ १६३ ॥ विश्वाकार माझें मन। त्याहीपुढें चैतन्यघन। तें तों आपण हें अनुसंधान। हृदयीं असावें. ॥ १६४ ॥ एक तंतु सर्वा पटीं। एक मृत्तिका सर्वा घटीं। एक सुवर्णें नाना गोमटीं। दिसती भूषणें. ॥ १६५ ॥ स्मरतां प्रपंचाकार। आकारीं नसावा आदर। आकारयोगें चित्तविस्तार। विस्तारीं स्वरूप लक्षावें. ॥१६६॥ चित्त जों जों पसरे। तों तों तितुकें स्वरूप स्फुरे। निर्धर्मकत्वें तें उरे। त्याहीपुढें. ॥ १६७ ॥ उत्साहें चित्त सादर। तोंवरी ऐसे नमस्कार। सर्वत्र हाचि प्रकार। कीर्तनादिकीं. ॥ १६८ ॥ एका गव्हांचे बहुत। प्रकार असती

---

१. चित्रांची. २. उलट वृत्तीत. ३. अभेद. ४. मूलाधारातें. ५. व्यवस्था, रचना.

तरी चित्त। एकत्र विटोनी निश्चित। अन्यत्र घरी आवडी. ॥ १६९ ॥ कारण असावी क्षुधा। आणि अन्नाच्याही परी विविधा। एकत्र आवडीस होतां बाधा। तेंचि अन्न अन्यत्र. ॥ १७० ॥ गोड पथ्य आणि पवित्र। प्रकार त्या अन्नाचे विचित्र। मन जरी धांवे सर्वत्र। तरी अन्न तों तेंचि. ॥ १७१ ॥ त्यांतही ज्या प्रकाराची। अधिक चित्ता वाटे रुची। निग्रह न करितां त्या पदार्थांची। तृप्ति होऊंच द्यावी. ॥ १७२ ॥ तैसें श्रवण कीर्तनादिक। जेथें जेव्हां प्रीति अधिक। तें तेव्हां करावें एक। अद्वैतभावें सर्वत्र. ॥ १७३ ॥ अद्वैतभावें कथाश्रवण। अद्वैतभावें गावे गुण। सर्व भूतीं वसे आपण। वासुदेव ऐसा स्मरावा. ॥ १७४ ॥ अंत नाहीं तो अनंत। कधीं च्यवेना तो अच्युत। इत्यादिभावें निश्चित। हाचि आत्मा आपुला. ॥ १७५ ॥ कोणे एके प्रकारें। कोणे एकें विचारें। सर्वही ब्रह्म या संस्कारें। करावें भजन. ॥ १७६ ॥ याकारणें या कोशीं श्रुती। महत्पुच्छ ऐसें बोलती। 'महत्'शब्दें महत्त्व म्हणती। ईश्वराचें. ॥ १७७ ॥ ईश्वर तेव्हां सगुण। महिमा त्याचा निर्गुण। ऐसें जाणोनि निपुण। सर्वात्मभावें भजती. ॥ १७८ ॥ एक स्वयें झाला अनेक। हेंचि महत्त्वाचें कौतुक। जडचैतन्य करितां विवेक। पाहतां दोनी तोचि कीं. ॥ १७९ ॥ जें सर्वत्र चैतन्य। तो तें एकचि सामान्य। जडभागही नसे अन्य। सूर्यकिरणीं मृगजळ. ॥ १८० ॥ हेंचि तत्त्व वदती श्रुती। हेंचि शास्त्रें पुराणें बोलती। हेंचि गुह्य अर्जुनाप्रती। गीतेंत बोलिलें श्रीकृष्णें. ॥ १८१ ॥ विश्व नव्हे तें अर्जुना! । येथें पदार्थ कांहीं असेना। माझ्या युक्तीची रचना। इतुकेंचि पाहें. ॥ १८२ ॥ जीवदृष्टीं विश्व भासे। ईश्वरदृष्टीं कांहीं नसे। ज्ञानियांस ब्रह्म अवघें दिसे। माझे दृष्टीनें. ॥ १८३ ॥ अर्जुना! मी ब्रह्म केवळ। मजमाजी माया मृगजळ। तिच्याच दों शक्तींचा खेळ। प्रपंच अवघा. ॥ १८४ ॥ माझी दृष्टि ते विद्या। दृष्टि जीवाची अविद्या। या दोनी शक्ति अनाद्या। माझ्या एकाच मायेच्या. ॥ १८५ ॥ विद्यादृष्टीनें पाहतां। प्रपंचाची नसे वार्ता। अविद्यादृष्टीस तत्त्वता। विश्व दिसे. ॥ १८६ ॥ ऐसा अभिप्राय मनीं। तो दीड श्लोकेंकरूनी। राजविद्या राजगुह्य म्हणोनी। उपदेशिता झाला. ॥ १८७ ॥ अर्जुना मी ब्रह्म केवळ। मजकरितां हें सकळ। विस्तारलें किरणीं जळ। तैसीं भूतें मजमाजी. ॥ १८८ ॥ मृगजळ दिसे मृगासी। भूतें दिसती हीं जीवासी। परि नातळती त्या जळासी।

१. एकास्थळीं.

सूर्यकिरण. ॥ १८९ ॥ तैसीं मजमाजी भूतें । परि मी नातळें तयांतें । तत्त्वता पुससी मातें । तरी तींही नसती मजमाजी. ॥ १९० ॥ जैसें सूर्याचे किरणीं । कधींच देखिलें नाहीं पाणी । अर्जुना! धरीं अंतःकरणीं । हे दृष्टी माझी. ॥ १९१ ॥ आतां अर्जुना! चराचर । माझे युक्तीचा बडिवार । ऐसेंचि पाहें आणि आदर । टाकीं सत्यत्वाचा. ॥ १९२ ॥ याकरितां हें सकळ । परब्रह्मचि केवळ । अविवेविवेकरूनी खेळ । जीवेश्वरांचे. ॥ १९३ ॥ 'मा' म्हणिजे नाहीं, । 'या' म्हणजे जें कांहीं, । 'माया' ऐसें दों अक्षरेंही । हाचि अर्थ पूर्वी वर्णिला. ॥ १९४ ॥ तिचा धनी ईश्वर । त्याच्या युक्तीचा बडिवार । नसोनि दिसे चराचर । हें महत्त्व तयाचें. ॥ १९५ ॥ या अभिप्रायें श्रुती । महत्पुच्छ या कोशीं वर्णिती । आणि पुच्छीं प्रतिष्ठा म्हणती । कोशमात्राची. ॥ १९६ ॥ प्रकर्षेकरूनि स्थिती । तीस प्रतिष्ठा ऐसें म्हणती । सर्वात्मत्वें तरीच भजती । अभ्यासक. ॥ १९७ ॥ ब्रह्मात्मत्वीं आदर । ते श्रद्धा याकोशीं शिर । पक्ष दोनी जीवेश्वर । ऐक्य त्यांचें. ॥ १९८ ॥ आत्मयोग बोलिला । तो दों प्रकारें वर्णिला । अभ्यास करितां काळ उरला । भजन तेव्हां ईश्वराचें. ॥ १९९ ॥ पुच्छ तें उरला काळ । भजन अभ्यासाचें मूळ । ईश्वरप्रसादें सकळ । पुरुषार्थसिद्धी. ॥ २०० ॥ अभ्यासकाळीं विश्वमूर्ती । जे ब्रह्मत्वें भाविली चित्तीं । वर्ततांही तेचि स्थिती । ते बुद्धीची प्रतिष्ठा. ॥ २०१ ॥ सर्व ब्रह्म ऐसी निष्ठा । तें पुच्छ तेचि प्रतिष्ठा । या कोशाची पराकाष्ठा । सर्व ब्रह्म पाहणें. ॥ २०२ ॥ सर्व ब्रह्म ऐशी बुद्धी । हाचि परमेश्वराचा उपाधी । येथें स्थिरता तो समाधी । सर्वदा त्याचे कृपेनें. ॥ २०३ ॥ याचि करितां श्रुती । महत्पुच्छ ऐसें म्हणती । त्या महिमेतेंचि भजती । योगी ऐसें. ॥ २०४ ॥ नानाकारें भासे । तेंही योगियांस ब्रह्म दिसे । यास विज्ञान ब्रह्म ऐसें । वेद म्हणती. ॥ २०५ ॥

श्रुति—विज्ञानं ब्रह्म चेद्वेद तस्माच्चेन्न प्रमाद्यति ।
शरीरे पाप्मनो हित्वा सर्वान्कामान्समश्नुते ॥

टीका—विज्ञानकोशाचे अंतीं । ऐसेंचि बोले श्रुती । विज्ञान ब्रह्मीं ज्यास स्थिती । तोचि जीवन्मुक्त. ॥ २०६ ॥ परंतु जो निर्विशेष पाहे । त्याचेंच चित्त स्थिर राहे । याकारणें बोलिला आहे । योग आत्मा या कोशीं. ॥ २०७ ॥ त्या योगाचा निर्धार । सविशेष निर्विशेषप्रकार । जैसा अभ्यास तदनुसार । दोहीं योगीं स्थिरत्व. ॥ २०८ ॥ साधकाची बुद्धी । अभ्यास करितां पावे सिद्धी । तो निर्गुणसमाधी । शेवटील कोश. ॥ २०९ ॥ आनंदमय ऐशी

श्रुती । या कोशातें वर्णिती । उत्तराध्यायीं त्याची स्थिती । निरोपिजेल. ॥२१०॥ ऐसा कोश विज्ञानमय । सकळ साधनाचा निर्णय । साधनसार हा अध्याय । याकरितां. ॥ २११ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदभूलोकभाषावतारे । सप्तमोऽध्यायः ॥ २१२ ॥

---

## अध्याय आठवा.

श्रीसच्चिदानंदतीर्थे । परमानंद दाता समर्थ । नित्यानंद पुरुषार्थ । स्मरणमात्रें जयाच्या. ॥ १ ॥ सच्चित्पदा प्रकटला । जो मलयाचळीं भेटला । ज्याच्या कृपेनें तुटला । भेदभ्रम. ॥ २ ॥ विद्या भार्गवी वारुणी । स्वयें बोलिला चक्रपाणी । पंचकोश उपनिषद्वाणी । अर्थपूर्वक. ॥ ३ ॥ अर्थ वर्णिला तदनुसार । ग्रंथ आरंभिला निगमसार । अनुभवाचे चमत्कार । ते कृपा त्याची. ॥ ४ ॥ पूर्वकोशीं योगियांस । द्विविध बोलिला अभ्यास । आनंदमयीं उल्हास । ब्रह्मानंदाचा. ॥ ५ ॥ अभ्यास करितां सर्वदा । योगी पावला निजानंदा । तो पांचवा कोश मर्यादा । शब्द जेथें परतती. ॥ ६ ॥ सरले कल्पनेचे विकार । चित्त जालें चिदानंदाकार । अनुभवाचा निर्धार । कोश याकरितां म्हणावा. ॥ ७ ॥ मनाची कल्पना सरली । परा वाणी तेहि निमाली । स्फूर्तिमात्र जेथें उरली । आत्मत्वाची. ॥ ८ ॥ यास्तव या कोशीं श्रुती । प्रिय तेंचि शिर ऐसें म्हणती । चंद्र शाखेवरी वर्णिती । आत्मा तैसा या कोशीं. ॥ ९ ॥ जो चंद्रातें देखतो । तो सर्वज्ञ ईश्वर वर्णितो । शब्दशाखेपर्यंत जातो । बुद्धि पाहते चंद्रासी. ॥ १० ॥ जरी वाचा परतली । अनुभवीं बुद्धि उरली । ते वाचेसि घेऊनि बोलिली । मागुती बुद्धी. ॥ ११ ॥ तेही खुणेनें दाविती । प्रिय तेंचि शिर ऐसें म्हणती । प्रियशब्दें अनुभवी घेती । आत्मा आपुला. ॥ १२ ॥ सकळ देहादि प्रिय । आत्मयाकारणें निश्चय । तोचि आत्मा अद्वय । प्रधानअंग कोशाचें. ॥ १३ ॥ आदीं उपजे शिर । मग प्रगटे शरीर । चित्त होतां स्वरूपाकार । आनंदकोश ते समयीं. ॥ १४ ॥ आणि आत्मा प्रिय । इतर अवघें अप्रिय । ऐसा वैराग्याचा निश्चय । प्रधानअंग या कोशीं. ॥ १५ ॥ जोंवरी देहाभिमान । जोंवरी देह आपण ऐसें ज्ञान । तोंवरी न राहे एकाग्र मन । स्वस्वरूपीं. ॥ १६ ॥ स्वरूपाचीच आवडी । प्रीति देहाची सोडी । देहात्मतेचा संस्कार मोडी । समाधिसुख तो पावे. ॥ १७ ॥ दों स्थळीं जे

प्रीती । ते व्यभिचारिणी प्रीति म्हणती । परपुरुष आणि पतिप्रीती । पुंश्चलीची उभयत्र. ॥ १८ ॥ देहीं आत्मतेची प्रीती । हे तों अनादि याची भ्रांती । वैराग्यावीण तिची निवृत्ती । सहसा नव्हे. ॥ १९ ॥ आत्मा जरी कळला । पूर्वसंस्कार नाहीं मोडला । आवडीचा व्यभिचार मांडला । कळोनिही आत्मतत्त्व. ॥ २० ॥ वैराग्यावीण मन । अभ्यासीं करी विषयचिंतन । स्वरूपीं निपजे समाधान । याचिकरितां. ॥ २१ ॥ तैसेंचि वैराग्य अंतरीं । आणि योगाचा अभ्यास न करी । मन तत्काळ संग धरी । देह आत्मा मानुनी. ॥ २२ ॥ याकरितां योगियांस । वैराग्य आणि अभ्यास । दोहीं करितां अध्यास । तुटे देहात्मतेचा. ॥ २३ ॥ अव्यभिचारिणी प्रीति होय । आत्मा प्रिय देह अप्रिय । ऐसा जेव्हां दृढ निश्चय । समाधि तेव्हां. ॥ २४ ॥ याकरितां प्रिय शिर । ऐसा श्रुतीचा निर्धार । जेणें चित्त स्वरूपाकार । होय मग ते उन्मनी. ॥ २५ ॥ कल्पनेची लहरी नाहीं । मन निमग्न चैतन्यडोहीं । स्वरूपावांचूनि नाठवे कांहीं । तेंचि उन्मनी. ॥ २६ ॥ चित्त जेव्हां वृत्तिशून्य । ध्येय ध्याता न दिसे अन्य । अनुभवा आले शुद्धचैतन्य । आनंदकोश ते समयीं. ॥ २७ ॥ सनत्कुमार नारद । उपनिषदीं यांचा संवाद । त्यास म्हणावें आनंद । अंत नाहीं जयासी. ॥ २८ ॥ नारदें सुखाचा प्रकार । पुसतां बोलिला सनत्कुमार । कीं जें का अनंत अपार । तेंचि सुख. ॥ २९ ॥ एक आत्मत्वाची खूण । कांहीं नाठवे त्याविण । तें सुख अनंत आपण । दुःखरूपें कल्पना. ॥ ३० ॥ आपण आत्मा अनंत । त्यासि कल्पना आणि ते अंत । जें आठवे तितुकियांत । आत्मा तितकाच ते समयीं. ॥ ३१ ॥ केवळ आत्मप्रतीति । नांदे स्मृति ना विस्मृती । ते सदोदित आत्मस्थिती । तो आनंदाचा अनुभव. ॥ ३२ ॥ ऐसा आत्मा सहज प्रिय । प्रिय शिराचा अभिप्राय । या अनुभवास आनंदमय । कोश ऐसें म्हणावें. ॥ ३३ ॥ येथें पक्ष मोद प्रमोद । आत्मा येथें आनंद । हे आनंदाचेचि नामभेद । तैसेंच पुच्छ तें ब्रह्म. ॥ ३४ ॥ प्रियशब्दही आनंद । तोचि मोद तोचि प्रमोद । ब्रह्म तें तों आनंदकंद । कोश अवघा सुखाचा. ॥ ३५ ॥ प्रिय तेंचि शिर ऐशा श्रुती । हा आवडीचा आनंद वदती । आपण ऐसा ऐसी प्रतीती । आनंद येथें हा प्रथम. ॥ ३६ ॥ अभ्यासीं घेतली गोडी । चित्त चैतन्यातें न सोडी । आदीच आत्मयाची आवडी । त्याकरितां प्रिय शिर. ॥ ३७ ॥ ऐसा अनुभव

आपुला । जे समयीं स्थिरता पावला । तो एक पक्ष बोलिला । मोदशब्दें. ॥३८॥ चित्त ऐसें निश्चय । समाधीचा वाढला काळ । सुखाचा झाला सुकाळ । तो पक्ष दुसरा प्रमोद. ॥ ३९ ॥ प्रकर्षेकरूनि मोद । त्यास म्हणावें प्रमोद । मोद म्हणजे आनंद । बहु फार. ॥ ४० ॥ शरीरास जीव । तैसा आनंदत्वें अनुभव । आनंदशब्दें यास्तव । आत्मा बोलिला या कोशीं. ॥ ४१ ॥ सनत्कुमार नारद । यांचा वर्णिला संवाद । कीं जो अनंत तो आनंद । तो अनुभव आत्मा या कोशीं. ॥ ४२ ॥ ब्रह्मांड आवरणासहित । अभ्यासयोगीं व्यापी चित्त । त्याहीपुढें असे अनंत । आत्मा चैतन्य. ॥ ४३ ॥ ऐसा अभ्याससंस्कार । स्वरूपीं धरी चित्त विस्तार । पसरे तों तों अनंत अपार । राहे तदाकार होउनी. ॥ ४४ ॥ चित्त विस्तारें पसरे । पसरतां पसरणेंही सरे । अनंतत्वें अनुभव उरे । घटाकाश जैसें आकाशीं. ॥ ४५ ॥ धांवायाची अपेक्षा पुरे । बळाचा अश्व तेव्हां थारे । नाहीं तरी तो वावरे । चहूंकडे. ॥४६॥ कुचराईच्या खोडी । त्या अभ्यासयोगींच सोडी । या धावण्यांत अत्यंत गोडी । अनुभवी जाणती. ॥ ४७ ॥ आत्मा अनंत अपार । हाही शब्दातीत संस्कार । तदाकारीं संकोचविस्तार । न स्फुरती दोनी. ॥ ४८ ॥ आत्मत्वाचें स्फुरण । स्वरूपाकार अंतःकरण । त्रिपुटीचें तुटे स्मरण । ध्याता ध्यान तें ध्येय. ॥४९॥ याकरितां वेदश्रुती । आनंद आत्मा येथें म्हणती । अनंतत्वें उरली स्थिती । अनुभवा आलें निर्धर्म. ॥ ५० ॥ सधर्मकत्वीं अंत । निर्धर्म तें अनंत । सधर्मता तेचि कीं चित्त । म्हणे हें किती केवढें? ॥ ५१ ॥ चित्त जों जों पसरे । तों तों तितुका आत्मा स्फुरे । तेंचि संकोचोनि थोडें उरे । तितकीच तेव्हां प्रतीती. ॥ ५२ ॥ तेंचि आपुलें चित्त । मूढत्व पावे सुषुप्तींत । प्रतीति न उरे तरी निश्चित । आपण असे निर्धर्म. ॥ ५३ ॥ याकरितां चित्त । चैतन्य नव्हे निश्चित । सुषुप्तींत त्याचें अत्यंत । जडत्व अनुभवीं देखिलें. ॥ ५४ ॥ आत्मा जरी चित्ताविण । नेदी अनुभवाची खूण । तरी प्रकाशक पूर्ण । म्हणावा तोचि. ॥ ५५ ॥ काष्ठ दीप अथवा तृण । कशा आणिका एकाविण । वेंगळा अग्नि आपण । न दिसे कोणा. ॥ ५६ ॥ तरी म्हणतील चतुर । कीं प्रकाशक वैश्वानर । काष्ठादिक पदार्थ इतर । प्रकाश ज्याचा न म्हणावा. ॥ ५७ ॥ काष्ठामध्यें अग्नि असे । तथापि आहे ऐसा न दिसे । मंथनीं निघे तरी प्रकाशे । काष्ठाच्या आश्रययोगें. ॥ ५८ ॥ काष्ठ जाळितां देखिला । काष्ठावांचूनि नाहींसा झाला । तरी प्रकाश तोचि बोलिला । प्रकाशहीन तें काष्ठ. ॥ ५९ ॥ तैसें चित्ताविण । नव्हे आत्मयाचें स्फुरण । तरी प्रकाशक

परिपूर्ण । म्हणावा आत्मा. ॥ ६० ॥ तोचि आत्मा ब्रह्म म्हणती । आत्मा म्हणावा स्फुरतां चित्तीं । तें ब्रह्म या कोशीं श्रुती । म्हणती पुच्छ. ॥ ६१ ॥ अनुभवीं चित्ताची लहरी । निमग्न झाली सुखसागरीं । तथापि सुखसागराची थोरी । ते तों अनंत. ॥ ६२ ॥ ऐसें अनंतत्वें उरलें । तें ब्रह्म पुच्छ ऐसें बोलिलें । जें कां अनुभवा आलें । चित्ताकरितां. ॥ ६३ ॥ सुषुप्ति आणि प्रळय । तेव्हां न म्हणवे आनंदमय, । अनुभवधर्माचा निश्चय । कोश येथें वास्तव. ॥ ६४ ॥ चित्त जेथवरी जाय । तेथपर्यंत अनुभव होय । तेथें तो चिन्मात्र अद्वय । असे सहज. ॥ ६५ ॥ ऐसें चित्तावेगळें । सहजसत्तारूपें निराळें । तें ब्रह्म जेथें कोणे काळें । धर्म न दिसे. ॥ ६६ ॥ चित्त ज्याकरितां सचेतन । बहिर्मुख करी विषयचिंतन । अंतर्मुखत्वें चैतन्यघन । तेंचि पाहे. ॥ ६७ ॥ त्या चित्तासि अनुभवा आलें । तें कोश म्हणोनी बोलिलें । चित्तावेगळें सहज उरलें । तें ब्रह्म पुच्छ कोशाचें. ॥ ६८ ॥ तेंचि पुच्छ तेचि प्रतिष्ठा । प्रकर्षेंकरूनि जेथें निष्ठा । ते गति ते पराकाष्ठा । सत्तामात्र. ॥ ६९ ॥ तेंचि स्वरूप आपुलें । गुरुकृपेनें अनुभवा आलें । ऐसें सर्वदा स्फुरों लागलें । तेचि प्रतिष्ठा. ॥ ७० ॥ जें कां अनुभवीं उरे । तेंचि सर्वदा चित्तीं स्फुरे । त्या स्मरणेंचि संचरे । तेचि प्रतिष्ठा. ॥ ७१ ॥ प्रकर्षेंकरूनी स्थिती । तीस प्रतिष्ठा ऐसें म्हणती, । समाधींत झाली प्राप्ती । ज्या स्वरूपाची. ॥ ७२ ॥ वाचा राहती आलीकडे । परेस जेथें मौन पडे । त्या सुखसागरीं जेव्हां बुडे । तरंग चित्ताचा. ॥ ७३ ॥ तेंही वेगळें असतें । तरी कोणास अनुभवा न येतें । मनासहित वाचेतें । न उरे ठाव जे ठायीं. ॥ ७४ ॥ जें इंद्रियांपलीकडे । वाचेसि जेथें मौन पडे । प्राप्ति त्याची कैसी घडे । जीवांसी. ॥ ७५ ॥ सांगणार कैसे सांगते, । श्रोते कैसे ऐकते, । अनुभवी कैसे पावते, । त्या वस्तूसी ? ॥ ७६ ॥ प्राप्तीस इतुकेंचि साधन । कीं तें आपण चैतन्यघन । त्याचिकरितां सचेतन । चराचर. ॥ ७७ ॥ जरी वाचा परतली । तरी अनुभवीं बुद्धि उरली । ते वाचेसि घेऊनि बोलिली । श्रीगुरूची. ॥ ७८ ॥ शाखेपासोनि शब्द फिरे । चंद्रदर्शनीं बुद्धि उरे । चित्तीं चैतन्य तैसें स्फुरे । शिष्यासी. ॥ ७९ ॥ तोचि एक अनुभवी । प्रारब्धें देह लोकीं वर्तवी । तथापि मिथ्या ऐसें भावी । वासनारहित. ॥ ८० ॥ लिंगदेह वासनामय । तो दग्धवस्त्रासारिखा होय, । जे समयीं वासना जाय । निजसुखाच्या अनुभवें. ॥ ८१ ॥ भोग प्रारब्धाचे सरती । तोंवरी इंद्रियांच्या वृत्ति असती । मन इंद्रियें मिळोनि मूर्ती । लिंगदेहाची. ॥ ८२ ॥ जळलें

वस्त्र दिठीं दिसे । हात लावितां रक्षा असे, । लिंगदेहीं वर्तती ऐसे । जीवन्मुक्त. ॥ ८३ ॥ सुखदुःख तरी भोगिती । मागुती सुखदुःखा नातळती । ऐशा कौतुकें वर्तती । जीवन्मुक्त. ॥ ८४ ॥ मी सुखी दुःखी ऐसी । प्रतीति सर्वां जनांसी । चेतदूनि त्या मीपणासी । सुखदुःख भोगी प्रतिबिंब. ॥ ८५ ॥ ज्ञान जेव्हां झालें । बुद्धीचें मीपण गेलें । तथापि भोगणें उरलें । पूर्वकर्माचें. ॥ ८६ ॥ आत्मा ओळखिला तो बिंब । साक्षित्वीं नसे प्रतिबिंब । सुखदुःख भोगितां अवलंब । बुद्धीस प्रतिबिंबाचा. ॥ ८७ ॥ चैतन्यें सारिखीं दोन्ही । बुद्धि ते एक म्हणोनी । भोक्ता अनुभवी ऐसी जनीं । अंधपरंपरेनें ख्याती. ॥ ८८ ॥ बुद्धिप्रतिबिंबयोगें कर्म । तैसाची सुखदुःखभोगाचा धर्म । हें अनुभवाचें वर्म । जाणती विरळ. ॥ ८९ ॥ बिंबास न घडे भोग । भोगकाळीं प्रतिबिंबयोग । बुद्धि झाली जरी असंग । अनुभवी तथापि सुखदुःख. ॥ ९० ॥ साक्षित्वें जेव्हां असणें । प्रपंच मिथ्या पाहणें । बिंबचैतन्य तेव्हां आपण । बुद्धि पहिलीच निश्चित. ॥ ९१ ॥ बुद्धीस साक्षित्वाचा अनुभव । सहजसाक्षी तो वासुदेव । बुद्धिबिंबीं न म्हणवे जीव । देहतादात्म्य नसतां. ॥ ९२ ॥ प्रपंचासहित देह । मिथ्या मानी विदेह । तेव्हां मानी निःसंदेह । कर्ता भोक्ता मी नव्हे. ॥ ९३ ॥ सुखासारिखें सुख । दुःखासारिखेंचि वाटे दुःख । तेव्हां मानी प्रतिमुख । बुद्धींत माझें ये समयीं. ॥ ९४ ॥ बाह्य सुखातें उपेक्षी । सुखदुःखभोगाचा साक्षी । सुखदुःखानुभवीं लक्षी । बुद्धीमध्यें प्रतिबिंब. ॥ ९५ ॥ चैतन्यें दोनी सारिखीं । तरी अनुभवी हा पारखी । आपण सुखी अथवा दुःखी । वाटे तेव्हां प्रतिबिंब. ॥ ९६ ॥ मी सुखी मी दुःखी न म्हणे । तरी सुखदुःखातें बुद्धि जाणे । त्या बुद्धींत भोगाचे खुणे । अनुभवी प्रतिबिंब. ॥ ९७ ॥ हा सर्वदा साक्षीपणें । नेणे सुखदुःखाचें भोगणें । तथापि प्रारब्धाचे गुणें । भोग होणार न चुके. ॥ ९८ ॥ बुद्धीसि घडती भोग । तेव्हां प्रतिबिंबाचा योग । तथापि बुद्धि निःसंग । बिंबयोगें सर्वदा. ॥ ९९ ॥ केव्हां भोगिलें सुख । केव्हां भोगिलें दुःख । पुढें भोगणें आहे आणिक । तिनी गोष्टी तो नेणे. ॥ १०० ॥ लेंकरूंही सुखदुःख जाणे । परि मी सुखी दुःखी न म्हणे । केव्हां भोगिलें हेंही नेणे । न करी चिंता भविष्याची. ॥ १०१ ॥ या प्रकारें योगी । आलें प्रारब्ध तें भोगी । भोगूनि भोगाचे संगीं । मागुती नाहीं. ॥ १०२ ॥ देह संस्कारें फिरे । साक्षी होऊनि आपण उरे । या प्रकारें त्याचें सरे । पूर्वकर्म. ॥ १०३ ॥ आपण नव्हे एकदेशी । देह हिंडे देशोदेशीं । जैसा फिरे महदाकाशीं । भ्र

कुंभ. ॥ १०४ ॥ ऐसा याचा अनुभव । आत्मत्वाचें वैभव । उत्तराध्यायीं अभिनव । बोलिजेल. ॥ १०५ ॥ ऐसा आनंदमय कोश । जेथें पूर्णत्वाचा प्रकाश । सकळ जेथें उपदेश । श्रीगुरूचा. ॥ १०६ ॥ येथें कोश आनंदमय । आनंदमयचि हा अध्याय । उत्तराध्यायीं उदय । सच्चिदानंदाचा. ॥ १०७ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदमूलोकभाषान्तरे । अष्टमोऽध्यायः ॥ १०८ ॥

---

## अध्याय नववा.

जय जय श्रीसच्चिदानंदा! । जय जय आनंदकंदा! । भक्ति करिती तुझी मुकुंदा! । जीवन्मुक्तही. ॥ १ ॥ जे पावले तुझी भक्ती । ते उपेक्षिती चारी मुक्ती । धन्य धन्य त्यांची विरक्ती । ते मोक्ष न घेती दिल्याही. ॥ २ ॥ शुकसनकादिक नारद । भक्तियोगीं विशारद । ते स्वयें मोक्षाचे वरद । उद्धरिती जनासी. ॥ ३ ॥ तुझ्या भक्तांची दृष्टी । ज्यांवरी करी अमृतवृष्टी । त्यांसि हे सर्व सृष्टी । ब्रह्म होय. ॥ ४ ॥ गंगासागरसंगमा । लक्षूनि देती उपमा । तुझ्या भक्तांचा महिमा । श्रुति वर्णिती. ॥ ५ ॥ बिंदु मेघाचे अपार । सागरीं होती तेही सागर । परंतु न घडे परोपकार । तैसें न करवे दुसरियांसी. ॥ ६ ॥ भक्त तुझे जान्हवी । सुखसागरीं नित्य नवी । नाना जळें समुद्रीं मेळवी । भक्त तैसे जीवांसी. ॥ ७ ॥ नाना नद्या ओहळ । गंगेंत मिळतां गंगाजळ । सुखसमुद्र होती केवळ । तिच्या योगें समुद्रीं. ॥ ८ ॥ ऐक्य भक्तांसी अखंड । भक्तीकारणें उरला पिंड । त्यांच्या कृपेनें तरती उदंड । जीवराशी. ॥ ९ ॥ तूं स्वयें ब्रह्म नित्यमुक्त । तैसेच भागवत तुझे भक्त । जे सर्वत्रही विरक्त । अनुरक्त तुझ्या श्रीचरणीं. ॥ १० ॥ याकरितां सृष्टयादि कर्म । नलगे म्हणती ईश्वरत्वधर्म । तुझें सर्वात्मकत्वाचें वर्म । तें पूर्ण तितुक्या अनुभवें. ॥ ११ ॥ सर्वात्मतेची आवडी । तुज ईश्वरत्वीं हेंचि गोडी । कीं तोडिसी अविद्येची बेडी । इतुकें भक्तही लावले. ॥ १२ ॥ सृष्टयादि कर्मी विरक्त । तूं परमेश्वर नित्यमुक्त । सृष्टयादि कर्में होती व्यक्त । सत्तामात्रें. ॥ १३ ॥ सत्ता तों दुसरी नसे । चराचरीं जे उल्लसे । भक्तांमध्यें उणें न दिसे । वैभव तुझें याकरितां. ॥ १४ ॥ ऐसा पाहतां विवेक । एका गुणें भक्त अधिक । मोक्ष टाकूनि धरिलें एक । दास्य तुझें. ॥ १५ ॥ तुज न सुटती पुरुषार्थ । ते दास्यमात्रें कृतार्थ । तुझ्या चरणींचें तीर्थ । तेंही पवित्र ज्याकरितां. ॥ १६ ॥ मोक्षास

हा नसे बडिवार । दास्य न घडे वारंवार । मोक्ष याकरितां निःसार । दास्यापुढें. ॥ १७ ॥ तुझें आणि भक्तांचें सुख । एक परि तूं नेणसी आणिक । तिहीं पूर्वी भोगिलें दुःख । अधिक सुखसोहळे तयांचे. ॥ १८ ॥ सूर्यकिरणें तापल्यासी । छाया सुखावह अत्यंत जैसी । जो सर्वदा छायावासी । तो तितकें सुख नेणे. ॥ १९ ॥ येथेंचि कळलें तुझें वर्म । याकरितांचि जीवात्मधर्म । तूं अवलंबूनि भोगूनि कर्म । भक्तिसुख अत्यंत भोगिसी. ॥ २० ॥ भक्त होऊन करिसी भक्ती । आणि उपेक्षिसी चारी मुक्ती । मोक्षाविषयीं भक्तां विरक्ती । याचिकरितां. ॥ २१ ॥ राजा टाकूनि सिंहासन । पारधी हिंडे वनोवन । श्रम पावोनि करी साधन । सुखप्राप्तीसी. ॥ २२ ॥ जीव होऊनि दुःखासी । याप्रकारें तूं भोगिसी । लाभ मोठा मानिसी । आत्मबोधाचा. ॥ २३ ॥ नित्य सुखाचा सोहळा । त्याहूनि भक्तीचा आगळा । चिरकाळ देखिला डोळां । पति जैसा सतीनें. ॥ २४ ॥ नित्य सुखाची गोडी । तया सुखापुढें थोडी । अलभ्यलाभाची जोडी । आवडी मोठी ते आम्हां. ॥ २५ ॥ नित्य संयोग असतां । तरुणी नेणे विरहचिंता । चिरकाळें भेटली कांता । सुख तीचें अपार. ॥ २६ ॥ तुझी सहज विद्याशक्ती । नित्यमुक्ताची नित्यमुक्ती । आम्ही लाधलों सर्वात्मभक्ती । सुख तें मोटें आमुचें. ॥ २७ ॥ तूं परमेश्वर नित्यमुक्त । जेथें पाहावें तेथें विरक्त । तो तूं अत्यंत अनुरक्त । दासावरी. ॥ २८ ॥ तुजसारिखा नाहीं दूसरा । तो तूं आमुचा सोयरा । तूं सांग पां सर्वेश्वरा ! । ऐसा आहे दुजा कोण? ॥ २९ ॥ तूं भक्तजनकैवारी । द्वारपाळ तूं त्यांचे द्वारीं । तूं सांग पां श्रीहरी ! । ऐसा आहे दुजा कोण? ॥ ३० ॥ आम्ही भजों एका शरीरें । तूं प्रकटसी विश्वाकारें । नाममात्राच्या उच्चारें । देऊं येसी सायुज्यता. ॥ ३१ ॥ आहे म्हणों जयासी । तेथें सत्पदें तूं प्रकटसी । हा सर्प म्हणतां आयता होसी । दिव्य हार. ॥ ३२ ॥ जें जें आठवे चित्तासी । तेथें चित्पदें तूंचि दिससी । आनंद तूं आत्मा अससी । सच्चिदानंद. ॥ ३३ ॥ जें काळत्रयीं असे । तेंचि असे ऐसें दिसे । कितेक काळ त्यांत भासे । तें त्यावेगळें न म्हणवे. ॥ ३४ ॥ सत्पदें म्हणावें सत्य । जें सत्य तेंचि नित्य । असत्य आणि अनित्य । तेंही तेंची. ॥ ३५ ॥ जें सत्य तेंचि असे । जें असत्य तें तों नसे । ज्याकरितां जें भासे । तेंचि तें. ॥ ३६ ॥ रज्जु सर्वदा असे । मिथ्या सर्प केव्हांही दिसे । सर्पाकार दृष्टीस दिसे । तोही दोर. ॥ ३७ ॥ हा सर्प ऐसें म्हणावें । तों तो रज्जु असे स्वभावें । तैसीं चराचरांचीं नांवें । अवघें ब्रह्म. ॥ ३८ ॥ देहासहित चराचर । नाममात्र हें आकार । आकार-

मात्रीं निर्विकार । अवघें ब्रह्म. ॥ ३९ ॥ जळाभास देखती नेत्र । बुद्धि म्हणे हें किरणमात्र, । इंद्रियांस विश्व भासे विचित्र । बुद्धि म्हणे हें ब्रह्म. ॥ ४० ॥ पांचा इंद्रियांसी गोचर । प्रपंच अवघा चराचर । मृगजळासि यासि अंतर । काय असे? ॥ ४१ ॥ एका इंद्रियासि मृगजळ । पांचा इंद्रियांसि प्रपंच सकळ । अविद्यायोगें बुद्धीस अकळ । जैसें मृगजळ मृगासी. ॥ ४२ ॥ नरदृष्टीसही उदक भासे । किरणावांचूनि कांहीं नसे । बुद्धींत ऐसा निश्चय वसे । मनुष्याच्या. ॥ ४३ ॥ जैसा पांचां विषयीं प्रपंच । सेविती जरी इंद्रियें पांच । तरी न वाटे बुद्धीस साच । ज्ञानियांच्या. ॥ ४४ ॥ वेगळा देह वेगळीं इंद्रियें । वेगळा आत्मा हा निश्चय । सत्यपणासि आला क्षय । ते समयीं प्रपंचाच्या. ॥ ४५ ॥ जडचैतन्य करितां विवेक । आत्मा कळला व्यापक । त्या एकाविणें अनेक । कांहींच न दिसे बुद्धीसी. ॥ ४६ ॥ बुद्धि म्हणिजे चिच्छक्ती । चित्पदीं तिची प्रत्यग्वृत्ती । तेथें पांचही विषय नसती । चिद्रूप मात्र. ॥ ४७ ॥ तेचि बुद्धि चिच्छक्ती । तीच्याच उठती पराग्वृत्ती । तेव्हां विषय पांचही दिसती । चित्पदमात्र चैतन्यें. ॥ ४८ ॥ बुद्धि चैतन्यें सचेतन । ती करूनि इंद्रियांतें ज्ञान । त्या इंद्रियांकरितां सेवन । विषयांचें. ॥ ४९ ॥ विषय इंद्रियें दोनी । बुद्धीस चैतन्यावांचुनी । गोचर नव्हती येणेंकरुनी । स्पष्ट मिथ्या हें विश्व. ॥ ५० ॥ दृष्टि दोरातें आतळे । तरीच मिथ्या सर्प आढळे । रज्जु न देखतां न कळे । भास मिथ्या सर्पाचा. ॥ ५१ ॥ इंद्रियें आणि विषय । दोनी मिळतां प्रपंच होय । प्रपंचीं प्रपंचाचा निश्चय । प्रपंच दिसे प्रपंचासी. ॥ ५२ ॥ स्वरूपीं हें कांहीं नसे । आणि त्यावांचूनि हें न दिसे । या विवेकें तों तेंचि असे । प्रपंचवार्ता मात्र. ॥ ५३ ॥ जैसी कां स्वप्नींची सृष्टी । ते दिसे स्वप्नींच्याच दृष्टी । जागा होऊनि सांगे गोष्टी । प्रपंच तेव्हां तो कोठें? ॥ ५४ ॥ अवलंबूनि स्वप्नदृष्टी । मनीं आठवी स्वप्नसृष्टी । जागृतींत सांगे गोष्टी । तैसा प्रपंच ज्ञानियांसी. ॥ ५५ ॥ हें चिच्छक्तिविंदाणि । पाहतां तेंही नसे आपण । कार्य लटिकें त्याचें कारण । सहजचि लटिकें. ॥ ५६ ॥ रज्जूचें जें न कळणें । त्यानें केला सर्प निर्माण । सर्प आणि त्याचें कारण । न दिसती दोनी दोरांत. ॥ ५७ ॥ ऐसी अविद्या निरसली । तेव्हां विद्याही नाहीं उरली । रज्जु म्हणतां ओळखी झाली । तेंही न दिसे त्या दोरीं. ॥ ५८ ॥ प्रारब्ध जेव्हां सरलें । तेव्हां अविद्येचें नांव गेलें । अधिष्ठान मात्र उरलें । लटिकिया सर्पाचें. ॥ ५९ ॥ आतां सर्प जो गेला । दोर मात्र शेवटीं उरला । परंतु दृष्टीसि अनुभव आला । हा इतुकाही. ॥ ६० ॥ तेचि माया तेचि प्रकृती ।

तेचि ब्रह्मीं अनादिशक्ती । तीकरितां बंधमुक्ती । अविद्या विद्या या नांवें. ॥ ६१ ॥ तें आतां त्रिगुण । प्रळयीं निर्गुणीं निर्गुण । जैसें मृगजळ आणि किरण । काळभेदें म्हणावीं. ॥ ६२ ॥ मध्यान्हीं दिसे मृगजळ । इतर काळीं किरण केवळ । याप्रकारें यथा काळ । ब्रह्मीं माया. ॥ ६३ ॥ सृष्टिकाळीं विलक्षण । जैसें मृगजळ आणि किरण । प्रलयकाळीं एकपण । मायाब्रह्मीं. ॥ ६४ ॥ कोणी येथें यथामती । चित्पदें करूनि माया म्हणती । सत्पदें ब्रह्म वाखाणिती । आनंदपदें ईश्वर. ॥ ६५ ॥ माया ब्रह्म विलक्षण । किंवा दोघांचें सारिखें लक्षण । दोहींस म्हणतां सारखेपण । द्वैत मानावें. ॥ ६६ ॥ तेव्हां मानावी विलक्षण । तरी चित्पद न घडे मायालक्षण । मायेसि जरीं चैतन्य गुण । तरी ब्रह्म जड हें तों न म्हणवे. ॥ ६७ ॥ माया न म्हणतां विलक्षण । न बोलवे सगुण निर्गुण । तें चैतन्य तेव्हां जडपण । ब्रह्मीं हें तों न म्हणवे. ॥ ६८ ॥ कोणी म्हणती विचक्षण । माया सदसद्विलक्षण । तरी चित्पदें तीचें लक्षण । बोलतां नये. ॥ ६९ ॥ ब्रह्ममाया अभेदें । माया म्हणावी चित्पदें । तेव्हां तेही सत्पदें । कां न म्हणावी ? ॥ ७० ॥ सत्पदेंही माया म्हणावी । तरी चित्पदें वेगळी कां ध्यावी । याकारणें जाणावी । कल्पना अयुक्त. ॥ ७१ ॥ दृश्य तितुकें मायिक । जें नानात्वें दिसे अनेक । जें अदृश्य जें कां एक । तें चैतन्य चित्पदें. ॥ ७२ ॥ चित्पदेंकरूनि ज्ञान । जें चैतन्यधर्महीन । तें तों ब्रह्म हें सज्जन । अनुभविती आत्मत्वें. ॥ ७३ ॥

श्रुति—चिन्मात्रोऽयं पुरुषः ॥

टीका—ब्रह्म चिन्मात्र ऐशा श्रुती । प्रज्ञान ब्रह्म ऐसें म्हणती । सत्य ज्ञान ऐसें वदती । श्रुति एक. ॥ ७४ ॥ चित्पदें आत्मा स्फुरे । जो माया निषेधितां उरे । अनुभवासहित शास्त्र अंतरे । माया म्हणतां चित्पदें. ॥ ७५ ॥ चित्पदें चैतन्य सत्य । चित्पदें चैतन्य जें कां नित्य । माया सर्वथा असत्य । ते चित्पदें कैसी म्हणावी ? ॥ ७६ ॥ अंतरीं उठती मनोवृत्ती । त्या ज्ञानरूप वाटती । म्हणोनि चित्पदें माया म्हणती । हे बुद्धीची स्थूलता. ॥ ७७ ॥ आकाश घटीं घटाकार । मठीं दिसे मठानुसार । तरी आकाश निर्विकार । तैसें चैतन्य चित्पदें. ॥ ७८ ॥ वृत्तीच मायेचे विकार । चैतन्य दिसे तदनुसार । परि तें स्वयें निराकार । चित्पदवाच्य चैतन्य. ॥ ७९ ॥ रंग हिरवा पिवळा । अथवा तांबडा निळा काळा । समीप आणितां स्फटिकशिळा । दिसे तैसी परिशुद्ध. ॥ ८० ॥ आरसीं प्रतिबिंबें दिसती ।

त्यांस कांहीं न स्पर्शती । तैशा नाना विकारवृत्ती । चैतन्यांत. ॥ ८१ ॥ अथवा माया चिच्छक्ती । म्हणोनि जरी चैतन्य म्हणती । तरी जडें इंद्रियें त्यातें श्रुती । म्हणती ज्ञानेंद्रियें. ॥ ८२ ॥ नेत्रीं लाविती उपनेत्र । तरी पाहती तों नेत्र । चित्पदें ब्रह्म चैतन्यमात्र । विषयप्रकाशीं चिच्छक्ती. ॥ ८३ ॥ शुद्धचित्पदें जें चैतन्य । तेंचि ब्रह्म जें धर्महीन । तेथें चिच्छक्तियोगें ज्ञान । वृत्तिरूप होय. ॥ ८४ ॥ हृदय भेदिती बाण । तेचि बाण हरिती प्राण । तथापि सामर्थ्याचें कारण । धनुर्धर. ॥ ८५ ॥ चिच्छक्ति न म्हणवे चैतन्य । आणि चैतन्य आपण धर्मशून्य । योग दोघांचा अन्योन्य । बाह्यव्यवहार ते समर्थी. ॥ ८६ ॥ चित्पदें शुद्धज्ञान । तेंचि कालत्रयीं विद्यमान । तें परब्रह्म धर्महीन । सत्पदें म्हणावें. ॥ ८७ ॥ तोचि केवळ आनंद । सकळ आनंदांचा कंद । होतां मायेचा स्पंद । तेथेंचि ईश्वरत्व. ॥ ८८ ॥ ईश्वरचि आनंद ऐसें । हेंही बोलणें दिसे तैसें । ब्रह्म आनंद नव्हतां कैसें । आनंदत्व ईश्वरासी? ॥ ८९ ॥ ईश्वरींच आनंद वसे । जरी परब्रह्मीं नसे । आनंद तेव्हां गुण दिसे । मायेचा. ॥ ९० ॥ ब्रह्मत्वीं आनंद म्हणतां । ईश्वरीं अनुभव आयता । तेव्हां ब्रह्मचि आनंद तत्त्वतां । कां न म्हणवे? ॥ ९१ ॥ परब्रह्मीं धर्म नसे । सुखविलास ईश्वरीं दिसे । याकरितां बोलती ऐसें । स्थूळ दृष्टी. ॥ ९२ ॥ अमृतमाधुर्य रसनेसी । इच्छा गोडीची नसे त्यासी । तथापि अमृतापासीं । काय असे गोडीविण? ॥ ९३ ॥ अग्नि आपणा आपण । जाळूं न शके याकारणें । त्यासि उष्णत्वगुण । नाहीं न म्हणवे. ॥ ९४ ॥ तैसा आनंद केवळ । ज्ञान चित्पदें तेंचि निष्कळ । तेंचि विद्यमान सर्वकाळ । सत्पद म्हणावें यास्तव. ॥ ९५ ॥ आतां अनिर्वाच्य म्हणोनी । ईश्वर आनंदपदेंकरूनी । तरी सत्पदें ब्रह्म वाखाणुनी । अनिर्वाच्यत्व दवडिलें. ॥ ९६ ॥ ब्रह्म सत्पदें म्हणावें । मागुती कां अनिर्वाच्य मानावें । जें अनिर्वाच्य तें न यावें । वाचेसी. ॥ ९७ ॥ आतां वाचे नये तें ब्रह्म । ब्रह्म म्हणतां होतें सधर्म । वाचे नये तें निधर्म । ऐसें म्हणणें तें वाच्य. ॥ ९८ ॥ अहो सधर्म निधर्म कांहीं । तें बोलतांच येत नाहीं । ऐसें बोलतां न बोलवे तेंही । बोलिलेंच कीं. ॥ ९९ ॥ तें कांहीं एक आहे । ऐसें म्हणतांचि शब्द साहे । आहे शब्द तोही आलीकडे राहे । हेंही शब्दचि बोलतो. ॥ १०० ॥ शब्द अलीकडे राहे । तें पलीकडे आहे । पलीकडे आहे हेंही पाहें । शब्दचि बोलतो. ॥ १०१ ॥ शब्दें बोलवेल गूळ । परि न बोलवे गोडी केवळ । ऐसें बोलती परि त्याचें मूळ । न विचारिती. ॥ १०२ ॥ गूळ आणि गोड

शब्द दोनी । बोलावे वाचेकरूनी । गूळपण देखिलें नयनीं । गोडपण रसनेनें. ॥ १०३ ॥ सारखीं पांचही इंद्रियें । आपुलाला ओळखिती विषय । एकास एकाचा न होय । विषय गोचर. ॥ १०४ ॥ गूळ आणि गोडी दोनी । न कळती शब्देंकरूनी । गूळ दावितां कळे नयनीं । चाखितां गोडी रसनेसी. ॥ १०५ ॥ शब्दाचे संकेत केले । पदार्थ इंद्रियें ओळखिले । संकेत तितुके घेतले । बुद्धीकरूनी. ॥ १०६ ॥ घृतशब्द घेतला कानीं । त्याचें रूप देखिलें नयनीं । घ्राणें गंध रसनेंकरूनी । स्निग्धत्व स्पर्शत्व घेतलें त्वचेनें. ॥ १०७ ॥ शब्दगोचर इंद्रियें । शब्दगोचर विषय । शब्दगोचर अतींद्रिय । वाचेसि म्हणती. ॥ १०८ ॥ शब्दगोचर जें कांहीं । शब्दगोचर जें नाहीं । आकाशपुष्प वंध्यासुतही । शब्दचि म्हणे. ॥ १०९ ॥ शब्द जड कांहींच नेणे । शब्दाचा अर्थ बुद्धि जाणे । आहे त्यासि होय म्हणे । नव्हे म्हणे इतरांसी. ॥ ११० ॥ शब्द बुद्धी आधीन । बुद्धि चैतन्यें सचेतन । ब्रह्म अनुभवोनि बोले वचन । तेचि बुद्धी. ॥ १११ ॥ जें अनुभवा आलें । तें वाचेनें वर्णिलें । अनिर्वाच्य याकारणें बोलिलें । कीं तें न सांगवे दुसरियासी. ॥ ११२ ॥ जो देखेल तो मुखें । बालचंद्र वर्णील सुखें । दाखवा म्हणोनि आणिखें । पुसतां न दाखवे तयासी. ॥ ११३ ॥ परब्रह्म निर्गुण । अनिर्वाच्य इतकियाच कारणें । सच्चिदानंदादि लक्षणें । सुखें बोलावीं. ॥ ११४ ॥ जें वाचे न बोलवे । तें असत्य जड हें तों न म्हणवे । याकारणें तें स्वभावें । सच्चिदानंद. ॥ ११५ ॥ सच्चिदानंद ईश्वर तरी । कीं सच्चिदानंद ब्रह्म जरी । शास्त्र न कळोनि नानापरी । ऐशा करिती कल्पना. ॥ ११६ ॥ कोणी संतांचीं वचनें । कांहीं एक ऐकोनि कानें । तर्क बुद्धीच्या बळें ज्ञानें । ऐसें कथिती. ॥ ११७ ॥ कोणी म्हणती आकाश । ब्रह्म तें हाचि अवकाश । ब्रह्मांडाचा समावेश । याचिमध्यें. ॥ ११८ ॥ यास नाहीं आकार । यास नाहीं विकार । आणि दिसे अपरंपार । हेंचि ब्रह्म. ॥ ११९ ॥ ऐसें जे कां बोलती । त्यांस दाखवाव्या श्रुती । तरी वाचेनें म्हणती । कीं श्रुत्यर्थ आम्हांसि न कळे. ॥ १२० ॥ आणि पाहतांही खरें । जरी बोलते शास्त्राधारें । तरी हें थोतांड आदरें । न धरितें मनीं. ॥ १२१ ॥ शास्त्र मागुतीं न सोडिती । ब्रह्म ईश्वर माया म्हणती । ग्रंथ करूनि मिरविती । सर्वज्ञपणें. ॥ १२२ ॥ ऐसी कल्पना करावी । तरी पांच भूतें न म्हणावीं । चारी भूतें मानावीं । पांचवें ब्रह्म. ॥ १२३ ॥ दृष्टीस जें जें दिसतें । तें तें अवघें नाशतें । आकाश कैसें वांचतें । प्रलयकाळीं? ॥ १२४ ॥ ब्रह्म सर्वांस दिसे । तरी कां हो! त्यांस मुक्ति नसे? । दिसोनि कां

हो! न नासे। अज्ञान त्यांचें? ॥ १२५ ॥ म्हणती गगनीं कांहींच नसे। याकरितां काय दृष्टीस दिसे? । युक्ति बोलती ऐसें। न कळोनी. ॥ १२६ ॥ दृष्टीस न दिसे आकाश। तरी असावया कोण अवकाश? । तेंचि आकाश तेथें समावेश। सकळ देहांचा. ॥ १२७ ॥ दृष्टीस न दिसे आकाश। तरी आकाश म्हणावें कशास? । वायु नव्हे कीं होतां स्पर्श। त्वचेसि ओळखावा. ॥ १२८ ॥ हेंचि आकाश जरी ब्रह्म। तरी वेद वृथा कां करिते श्रम? । किमर्थ करावे नाना धर्म। ब्रह्म प्रत्यक्ष दीसतां? ॥ १२९ ॥ लोक ऐसें बोलती। याकारणें वेदांची प्रवृत्ती। वेदविरुद्ध कल्पना करिती। ते वेदबाह्य. ॥ १३० ॥ ब्रह्म सत्य माया असत्य। ब्रह्म अधिष्ठान माया विवर्त; । कोणी एक दुर्वृत्त। हेंही न मानिती. ॥ १३१ ॥ 'असत्य सत्यापासुनी। कैसें प्रकटलें?' म्हणोनी। माया स्वतंत्र मानुनी। बोलती थोतांड. ॥ १३२ ॥ दोर सत्यत्वें असे। त्यांत लटिका सर्प भासे, । शिंपी सत्य रजत भासे। लटिकेंचि तीपासुनी. ॥ १३३ ॥ किरणीं जैसें जळ। ब्रह्मीं तैसे तिचे खेळ। सत्य असत्याचें मूळ। कां न घडे? ॥ १३४ ॥ मायेस म्हणती ईश्वर। मायेचेच अवघे अवतार। तेव्हां जीवांचा उद्धार। मायेचि करितां. ॥ १३५ ॥ मायेंकरूनी श्रुती। ब्रह्म ईश्वरत्व म्हणती। मायाच ईश्वर ऐसें बोलती। ते पाषांड. ॥ १३६ ॥ मायेचें स्वतंत्रपण। तेव्हां ब्रह्म नव्हे तिचें कारण। तरी सत्य माया ही आपण। मग कैचें अद्वैत? ॥ १३७ ॥ जरी माया सत्य निश्चित। तरी बोलूं नये अद्वैत। लटकी तेव्हां ते विवर्त। ब्रह्म अधिष्ठान. ॥ १३८ ॥ अलंकार म्हणावा सुवर्ण। सुवर्णास म्हणावें भूषण। मायाच ईश्वर आपण। तरी सोन्यावेगळा अलंकार. ॥ १३९ ॥ ऐसी कल्पना करावी। त्याणें अद्वैतवार्ता टाकावी। अद्वैत तेव्हां न म्हणावी। माया स्वतंत्र. ॥ १४० ॥ ज्यास शास्त्र ना अनुभव। कांहीं बुद्धि कविता वैभव। ते दांभिक ऐशा अभिनव। कल्पना करिती. ॥ १४१ ॥ वेदशास्त्रें उडविती। आपण सिद्ध म्हणविती। ग्राम्यशिष्यांत मिरविती। आपुले ग्रंथ. ॥ १४२ ॥ पृथ्वीवरी पाषांडें। कलियुगीं होती उदंडें। ते नरकीं त्यांचीं तोंडें। न पहावीं साधकें. ॥ १४३ ॥ साधकाचें मन निर्मळ। दुःसंगें चढे मळ। बुद्धिभ्रंश केवळ। पाषांडसंगें. ॥ १४४ ॥ असो पाषांडियांची वार्ता। ब्रह्म सच्चिदानंद तत्त्वता। तेंचि तूं स्वयें अनंता!। मायेकरितां ईश्वर. ॥ १४५ ॥ तूं

---

१. मोवरा.

मायेकरितां ईश्वर । मायायोगेंचि अवतार, । परि तूं सुवर्ण ते अलंकार । वेगळी न म्हणवे. ॥ १४६ ॥ सोनें अलंकाराविण । असों जाणे आपण । परंतु नसतां सुवर्ण । अलंकार कैंचे? ॥ १४७ ॥ जैसे मृगजळाविण । सहज असों सकतीं किरण । किरणांवांचोनि आपण । कां दिसेना मृगजळ? ॥ १४८ ॥ होतां मध्यान्हकाळ । दिसती किरणीं उदककल्लोळ । इतरकाळीं मृगजळ । त्यांत न दिसे. ॥ १४९ ॥ तैसी आतां माया दिसे । प्रळयीं माया कोठें असे? । तेंही मायेस कैसें । म्हणती स्वतंत्र? ॥ १५० ॥ मायेची करिती भक्ती । वास्तव बोलती ऐशा युक्ती । ते परब्रह्मीं शक्ती । म्हणतांचि तीचें थोरपण. ॥ १५१ ॥ मातेची अत्यंत प्रीती । तीस म्हणती नाहीं पती । आपुल्यामुखें उपपादिती । अमंगलत्व. ॥ १५२ ॥ यांस इची प्रीती । परि तीस आवडे तिचा पती । हे तयातें निंदिती । पतिव्रता क्षोभे यांवरी. ॥ १५३ ॥ वेदविरुद्ध बोलणें । लोकीं मिरविती संतपण । मानिती तिचीच कृपा पूर्ण । परि तेचि अवकृपा. ॥ १५४ ॥ याकारणें मुकुंदा! । तुझ्या चरणावांचोनि धंदा । इतर देवतांचा गोविंदा! । नसो तुझिया भक्तांसी. ॥ १५५ ॥ म्हणोनि तुझा दास । तुझे ठायीं उदास । क्षुद्रदेवतांचा विश्वास । जळो जिणें तयांचें. ॥ १५६ ॥ असो, इत्यादि ऐशा वार्ता । ब्रह्म सच्चिदानंद तत्त्वता । येथें मायायोगें सधर्मता । तोचि ईश्वर. ॥ १५७ ॥ तोचि श्रीसच्चिदानंद । परमहंसरूपें गोविंद । मलयाचळीं आनंदकंद । गुरुत्वें प्रगटला. ॥ १५८ ॥ क्षरभाग ज्याणें निरसिला । जो अक्षरत्वें स्वयें उरला । हा निगमसार ग्रंथ केला । त्यावांचूनि कवणें? ॥ १५९ ॥ जो स्वयें चराचर । वामन कैसा म्हणावा इतर? । विशेषें जो कां निरंतर । शरण त्याचिया चरणासी. ॥ १६० ॥ ग्रंथ हा निगमसार । शब्द थोडे अर्थ फार । कृपेकरूनि याचा अर्थविचार । करावा संतीं. ॥ १६१ ॥ याचे अध्याय नव । नवही निधि अभिनव, । अनंत वेदांचें वैभव । या इतुकियामध्यें. ॥ १६२ ॥ शके पंधरा शतें पंचाण्णव । तैं ग्रंथ प्रगटला अभिनव । जो अनादि अनुभव । सकळ संतांचा. ॥ १६३ ॥ इति श्रीमन्निगमसारे । उपनिषत्तात्पर्यानुसारे । वेदभूलोकभाषावतारे । नवमोऽध्यायः ॥ १६४ ॥

# सिद्धांतविजय.

(श्लोक.)

श्रियं शेषोऽशेषैर्नयनयुगलैर्मंगलतनोः
सदा पश्यन्गायन्गुणगणमथास्यैर्द्विरसनैः ।
न तृप्तोऽसौ भूत्वा नखशिखसुखांगस्य शयनं
कथं श्लाघां कुर्मो वयमपि च भक्ता इति हरेः ॥ १
अशेषस्वामित्वात्तव विधिकरत्वाय यदहं
भवाम्यहो दिष्ट्या तदिति विदितत्वान्न तु गुणैः ।
प्रसादाज्ज्ञेयं.....स कुत इति चेत्तव भगव-
न्यमेवेति श्रुत्वा तव हि करुणाकारणमहो ॥ २
गुणा यांति त्वामिन्निगमनिपुणानां सुगुणतां
गृहीतानां दास्ये सहजकृपया ते भगवतः ।
हृषीकेशप्राणे सति किल हृषीकत्वघटना
भुवि श्रोत्रादीनां भवति विषयेषु प्रचरताम् ॥ ३
यथा रक्ते कांते युवतिगुणलावण्यविभवः
सुखायान्यस्मिन्स्यादथ परमदुःखाय भगवन् ।
गृहीतस्यान्यस्य स्वपदभजनायाखिलगुरो
गुणा एवंभूता इति मतिरहो मे व्यवसिता ॥ ४
गृहीतस्यान्यस्य स्वपदभजनायाखिलगुण-
प्रदोऽपि श्रीदातास्यजित भृतकस्येति विदितम् ।
सुधा देवैः पीता न समसमवायैः सविभवै-
स्तदा खिद्यत्प्राणैरपि दितिसुतैः सिंधुमथने ॥ ५
स्वतः श्रीगोविंदे सहजकृपयानुग्रहवति
त्वयीशे दासानां किमथ परमोत्कंठमिति चेत् ।
यथाभ्रौ संवायां स्तुतकुचयुगायामपि हरे
त्वरावंतः संतः सततमिति कृष्णे भगवति ॥ ६
सततस्त्वं गृह्णासि स्वपदभजनायेति सुभगं
गुणं ते न ज्ञात्वा पतति खलु विद्वानपि पदात् ।
स्वविद्वन्मानित्वाच्छ्रुतिरिह च तत्त्वेव भयमि-
त्यहो ज्ञानीत्येवं ...................................... ॥ ७

गुणैर्यस्मात्सेव्यस्त्वमसि तव सद्धर्मनिरतै-
रतो धर्मोणीति श्रुतिनिगदितत्वादपि हरे ।
तदानंत्यं विष्णोर्नु कमिति च वेदोदितमत-
स्त्वमस्यत्कल्याणायतनमिति चेत्त्वत्स्मृतिरलम् ॥ ८
अचिंत्यायां शक्तौ विविधफलदायामपि हरे
यदि ज्ञातश्चिन्तामणिरिति ददातीप्सितममुम् ।
अनंतानंतत्वे तव शुभगुणानां मम हृदि
स्त्वमस्यत्कल्याणायतनमिति चेत्त्वत्स्मृतिरलम् ॥ ९
स्मृतिः प्रीत्यै श्रुत्वा तव शुभगुणानां भवति सा
परोक्षे कन्याया इव वरपरत्वश्रवणतः ।
अतो यान्गृह्णासि स्वपदभजनायाखिलगुरो
ददासि स्वस्यैवामृतमधुरवार्तास्वतिरुचिम् ॥ १०
हरेः सद्धर्माणां विहितविधिनाधारणतया
मुरारेः कर्माणि श्रवणमननात्पश्यत जनाः ।
अतो धर्माणीत्याद्युपदिशति षण्णां पदरसा-
च्छ्रुतिः श्रीमद्विष्णोः पदकमलयोः षट्पद इव ॥ ११
तवाशेषात्मत्वाच्छ्रुतिषु विबुधा यद्यपि वरा
अतो धर्माण्येवं श्रवणमननादौ न विषयः ।
न तेषां धर्माणामपि निगदितं धारणमथा-
प्यहं सेवे देवांस्तव सुचरणाम्भोजमधुपान् ॥ १२
पदाक्रान्तं लोकैः सह भगवता सप्तभिरिदं
पृथिव्या देवानामखिलनिलयैश्च क्षितिपदा ।
अवंत्वस्मानस्मद्धरिचरणपूता अनिमिषा
अतो देवा इत्याद्युदितमिति वेदेन भगवन् ॥ १३
तवात्र प्रत्यक्षं परमपददानं ध्रुवपदे
मुहुर्दृष्ट्वाप्यन्यं कमथ शरणं यामि भगवन् ।
विचित्रं दातृत्वं दृशि गतमनेकस्य भवतः
पुरस्कृत्वानन्त्यं फलमपि ददास्यन्तवदपि ॥ १४
पदं तुच्छं वांछञ्शिशुरपि कियन्मासतपसा
ध्रुवं स्थानं यातस्तदपि भुवि भुक्त्वातिविपुलम् ।

दद‌ातीष्टान्भोगान्हृतगदमपथ्यान्भिषगिव
    त्वमानंत्यं दत्त्वा फलमपि ददास्यंतवदपि ॥ १५
जरासंधग्रंथिग्रथितचरणा यस्य शरणा
    जरामृत्योर्बंधादपि खलु विमुक्ताः क्षितिभुजः ।
पुनः प्राप्तश्रीका भगवदुपदिष्टा भगवता
    कृतार्थास्ते राज्यं बुभुजुरिति चित्रं प्रभुकृतम् ॥ १६
मुकुंदो नीवीनामिति रहसि यास्त्वां विदुरिमाः
    कृता जीवन्मुक्ता इह किल मुकुंदेन भवता ।
तव श्रीकांतस्याधरमधुरदिव्यामृतरता
    अहो गोप्यः प्राप्ता मुनिभिरपि दुष्प्राप्यममृतम् ॥ १७
सकामान्स्वक्ष्वेलाश्रवणविमुखांस्तत्र च रुचिं
    प्रदातुं संसारात्सहजकृपयोद्धर्तुमशुभात् ।
त्वया गोपस्त्रीभिः किल कुमुदकुंदेंदुललिता
    निशा नीता गीता भुवि विविधभाषासु कविभिः ॥ १८
त्रयं ते प्रत्यक्षं शिशव इह दत्तं ध्रुवपदं
    भवाब्धौ मग्नानामभयकरवत्सेतुरुदधेः ।
प्रणंतुं सर्वांगैस्तव चरणभूता क्षितिरियं
    परत्वं सौलभ्यं द्वयमपि च दृग्गोचरमहो ॥ १९
सकृत्पुत्रव्याजोच्चरितनिजनाम्नाप्यभयदः
    सकृच्छ्वश्च्छ्रीदो हरिरुपहृतैर्मुष्टिपृथुकैः ।
परत्वात्सौलभ्यादखिलसदुपास्यांघ्रिकमलः
    परो लभ्योपेक्ष्यः सुलभतरतुच्छेऽपि च यतः ॥ २०
गजो मुक्त्यै नक्राच्छरणमखिलेशं कमपि तं
    गतोऽसौ संसारादपि भगवता मोचित इह ।
प्रभावादर्चाया अनुचिरचिताया गतभवे
    करित्वेऽपीश त्वत्स्मृतिगतिरगाद्धाम परमम् ॥ २१
कुचैलः श्रीकामः क्वचिदपि न यं पूर्वमभज-
    द्दरिद्रो यः शश्वत्स च भगवता मुष्टिपृथुकैः ।
समृद्धः संपद्भिर्विबुधपतिभ्यश्चाधिकतरः
    कृतः पत्न्या यत्नात्स्वपदमधिगम्यापित इति ॥ २२
कुचैलेनानीतेष्वपि कतिपयानेव पृथुका-

न्कृतं जग्ध्वा तृप्तं त्रिजगदुदरेण त्रिभुवनम् ।
अदत्तं वा दत्तं श्रिथिलिखितशाश्वत्कृपणता-
प्यहो भाग्याय स्यात्त्वयि सुमुख ईशे भगवति ॥ २३
यदृच्छासंतृप्तं जगदुदरमुक्त्याखिलमतः
कृता हेतुप्रायाः कृपणपृथुका दातुममितम् ।
न चेत्प्राप्तं मृत्योः सदनमवशं कार्यवशगं
किमानेतुं व्याजं कृतमपि तु सांदीपनिसुतम् ॥ २४
